
उद्यम प्रकाशन

# आदर्श गांव




IRBK-0105336
IRBK-0105336

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा.वा.
द्वा. क्र. ५३३६

ठा. वृ.-4335.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

IRBK-0105336

जुलै ] [ १९५५

IRBK-0105336

म. श्री. सी. ... वाचनालय ...
प्र. क्र. ५३३९ ...
दि. ...

# प्रस्तावना

भारताच्या नवनिर्मितीत ग्राम विकासाला सर्वोच्चय स्थान आहे याबद्दल शंका नाही, तरीपण हे कार्य होण्याकरिता प्रेरणा मिळावी म्हणून कांही ठिकाणी समाजसेवकांच्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांनी आदर्श गांवें निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. या कामाला हाताळण्यासाठी 'आदर्श गांव' हे पुस्तक कोणालाहि अत्यंत उपयोगी होईल असे मला वाटते. या पुस्तकांत गांवाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण सूचना आणि उपयुक्त मार्गदर्शन ग्रथित झाले आहे. हल्ली विकास योजनांच्या मार्फत ग्रामसेवक या कामासाठी नियुक्त झाले आहेत. त्यांना सुद्धा या पुस्तकाचा फार उपयोग होऊ शकतो. विकासाच्या प्रत्येक क्षेत्रांत ज्या तांत्रिक माहितीची आवश्यकता आहे ती या पुस्तकांत फारच विशेष रितीने विशद केली गेली आहे. हे या पुस्तकाचे वैशिष्टच म्हणता येईल आणि त्याला कारण ग्रंथकर्त्यांचा अनुभव आणि चिंतन हेच असले पाहिजे.

तसेच या पुस्तकांत कायद्याने प्रस्थापित ग्रामपंचायतीच्या उपयोगासंबंधी सुद्धा विशेष माहिती दिली गेली असती आणि तिच्या द्वारा ग्रामविकासाचे कार्य केल्याने ग्रामीण जनतेच्या विकासाला जे प्रातिनिधीक स्वरूप येऊ शकेल याचीहि दखल घेतली गेली असती तर फार बरे झाले असते. तरीपण एकूण ग्रामविकासामध्ये रूची असलेल्या कोणत्याहि कर्मचाऱ्याला या पुस्तकाचा उपयोग होऊ शकेल याबद्दल शंका नाही.

नागपूर १
दि. २५ ऑगस्ट १९५५

**दीनदयाल गुप्त**
**समाज कल्याण मंत्री,**
**मध्यप्रदेश.**

# लेखकाचें निवेदन

सरकारी नोकरीनिमित्त गेल्या १२ वर्षांत मला शेकडों खेडीं पाहण्याचा योग आला. खेडुतांशी मिसळून व त्यांच्यांत राहून त्यांच्यांशी पुष्कळ विचारविनिमयहि केला. गांवांतील कांही गांवगुंड सोडून दिले तर बाकीच्यांचे डोळे आता उघडले आहेत. खेड्यांची होत असलेली अवनति त्यांना आता बघवत नाही. देश सुधारावयाचा असेल तर प्रथम खेडीं सुधारलीं पाहिजेत, देशांत सुराज्य किंवा रामराज्य करावयाचें असेल तर प्रथम तें खेड्यांत झालें पाहिजे असें आजपर्यंत फक्त शहरांतील विद्वान लोक म्हणत होते; आता खेडुतांना ती गोष्ट पटली आहे. खेडीं सुधारण्यासाठी आपण कांही तरी केलें पाहिजे, आपला गांव आदर्श झाला पाहिजे, सभोंवतालच्या १०–५ खेड्यांत आपल्या गांवाची कीर्ति झळकली पाहिजे असें आता त्यांना मनापासून वाटूं लागले आहे. एवढेंच की प्राप्त परिस्थितींत प्रयत्न कसे करावेत हें त्यांना समजत नाही. आपला गांव आदर्श करावयासाठी नेमकें काय करावयास पाहिजे ह्याबद्दल असंख्य खेड्यांतील लोक मार्गदर्शनाची वाट पाहत आहेत असा मला अनुभव आला.

त्यांना सांगतां येण्यासारखें आपणाजवळ कांही आहे काय ? ह्या विचारांतूनच या पुस्तकाचा जन्म झाला आहे. हें पुस्तक लिहिण्यापूर्वीं पुष्कळशा विचारांचें प्रात्यक्षिक करून पाहतां आलें. कांही विचार अनुभवानेहि सिद्ध झालेले आहेत. कांही विचार निरनिराळ्या प्रयोगांनंतर स्पष्ट झाले आहेत व कांही योजना त्या त्या विषयांतील तज्ञांच्या सल्ल्यानंतर, खेडुतांशी व खेड्यांतील कार्यकर्त्यांशी विचारविनिमय करून निश्चित केल्या आहेत. भंडारा जिल्ह्यांतील साकोली तहसीलमधील पिपळगांव हें तेथील तरुण कार्यकर्त्यांच्या मदतीने आदर्श करण्याचा प्रयत्न केला व

मध्यप्रदेशांतील राज्यपालांनी त्या गांवाला भेट देऊन 'असें सुंदर गांव मी क्वचित्च पाहिलें असेल' असे प्रशंसोद्‌गार काढले. तेव्हा माझ्या विचारांची दिशा पुष्कळ बरोबर आहे व प्रत्यक्षांत यशस्वी होण्यासारखी आहे असा आत्मविश्वास वाटूं लागला. सारांश हें पुस्तक शहरांतील ऐषारामांनी सुसज्ज अशा खोलींत बसून लिहिलेलें नसून असंख्य खेड्यांचा अनुभव लक्षांत घेऊन लिहिलें आहे. त्याचा खेडुतांना उपयोग होऊन त्यांना त्यांतील कांही भाग प्रत्यक्षांत उतरवितां आले तर माझ्या श्रमाचें सार्थक होईल.

ह्या पुस्तकांतील सर्वच योजना साऱ्या गांवांत यशस्वी होतील असा माझा दावा नाही. पण माझ्या विचारांची दिशा त्यांना समजून त्यांना या पुस्तकापासून मार्गदर्शन होईल असा आत्मविश्वास वाटतो. आणखी पुष्कळ सांगतां येण्यासारखें असेल. पुष्कळशा गोष्टी राहून गेल्या असतील, कांही गोष्टींबद्दल कोणाचा मतभेद असेल; तरी विचारवंतांनी, खेड्यांत काम करणाऱ्यांनी, खेडुतांनी व ग्रामोद्धाराची कळकळ बाळगणाऱ्यांनी देशाचें हें निकडीचें काम समजून सूचना द्याव्या व आपले विधायक विचार उद्यममध्ये प्रकाशित करण्यासाठी पाठवावे. त्यांचा मी आनंदाने विचार करीन. या महत्त्वाच्या विषयाला तोंड फुटून जेवढे विचार व विधायक योजना पुढे येतील तेवढ्या देशाच्या हिताच्या दृष्टीने हव्याच आहेत. खेड्यांच्या उन्नतीसाठी कळकळ बाळगणारा येवढीच माझी भूमिका आहे. तुकारामांच्या शब्दांत थोडा बदल करून असें म्हणतां येईल की–

काय म्या पामरें लिहावीं लिखाणें ।
परि त्या "कळकळीने" लिहविलें ।।

**यशवंत त्र्यंबक गद्रे.**

# आदर्श गांव

## अनुक्रमणिका


### प्रकरण १ लें

घर स्वच्छ तर गांव स्वच्छ आणि — पान नं.
गांव स्वच्छ तर शहर तुच्छ — १–११

ग्रामसेवकांपुढील कार्य, स्वतःचें घर स्वच्छ व आकर्षक ठेवा, बोधप्रद म्हणी, खतांचे खड्डे, खड्यांचा आकार व रचना.

### प्रकरण २ रें

वार्डाची सफाई व व्यवस्था — १२–१८

सर्वांना घेऊन चला, वार्ड–विभागणी, वार्ड-प्रमुखाची जबाबदारी, श्रमदानाने गांवाचें सौंदर्य वाढवा, कंदीलांची सोय, कचरा–पेट्या, योग्य चुरशीचा पायंडा.

### प्रकरण ३ रें

सामुदायिक कार्यें

१. सामुदायिक कार्यांची रूपरेषा — १९–४०

एकमेकां साह्य करूं; अवघे धरूं सुपंथ, सार्वजनिक सभा, ग्रामविकास मंडळ, उपसमित्या व सभासदांची निवड, ग्रामविकास मंडळ; त्यांच्या शाखा व कामें, शेती–सुधार–समिति, पशु–सुधार–समिति, जन–स्वास्थ्य–समिति, शिक्षण

व मनोरंजन–समिति, स्थापत्य वा बांधकाम–समिति, ग्रामोद्योग–समिति.

२. शेती–सुधार–समितीचीं कामें व त्यांसंबंधीचें मार्गदर्शन
खतें; प्रत्येक गांवांत सहज साध्य खतांचे प्रकार, जमिनीची मशागत, जमिनीची धूप थांबविण्याचे उपाय, नवीन जमीन लागवडीखालीं आणणें.

## प्रकरण ४ थें

पाणी–पुरवठा व इतर प्रश्न ४१–५०
शुद्ध बियाण्यांचा पुरवठा, पिकांचें संरक्षण, निरनिराळ्या पिकांवरील रोगांवर प्रतिबंधक उपाय, शेती–उत्पादन–स्पर्धा, प्रचार व व्याख्यानें.

## प्रकरण ५ वें

पशु–सुधार समितीचीं कामें व त्यांसंबंधीचें मार्गदर्शन ५१–५५
पशु–सुधारणेचीं मुलतत्वें, जातिवंत सांड, वासरांची निगा, चारा–दाण्याचा प्रश्न, मेलेलीं गुरें पुरण्याची व्यवस्था, इतर आनुषंगिक धंदे.

## प्रकरण ६ वें

आरोग्य–समितीच्या कामाबद्दलचें मार्गदर्शन ५६–७०
आरोग्य–समितीची कामें, थोड्या शारीरिक श्रमाने सर्व शक्य आहे, प्रभातफेरीचा उपक्रम, आरोग्य–समितीच्या सभासदांची जबाबदारी, गांवांतील सार्वजनिक स्वच्छता, हॉटेल-वाल्यांना मार्गदर्शन.

## प्रकरण ७ वें

**शिक्षण व मनोरंजन-समितीचें कार्य व मार्गदर्शन** ७१-८४

शिक्षणाची हेळसांड,खेड्यांतील शिक्षण, प्रसन्न वातावरणाची आवश्यकता, शिक्षणाची आवड वाढवा, सामाजिक कार्याची गोडी, ग्रामोद्योगाच्या शिक्षणाची सोय, शारीरिक विकासाची जोड, स्त्री-शिक्षण, प्रौढ-शिक्षण, प्रौढ-शिक्षणाची व्यापकता, वाचनाची गोडी, मनोरंजन समितीचें कार्य.

## प्रकरण ८ वें

**स्थापत्य-समितीचीं कामें व त्यांसंबंधीचें मार्गदर्शन** ८५-१००


एक पंथ दो काज, समितीच्या सभासदांची पात्रता, मदतीचे मार्ग, श्रमदानाची थोरवी, पैसा उभारणें, गांवांतील सडका, मोठ्या सडका, सार्वजनिक व खाजगी संडास, फिरते संडास.

## प्रकरण ९ वें

**ग्रामोद्योग समिति** १०१-११५

ग्रामोद्योग-समितीचीं कामें,शेती व ग्रामोद्योगांची सद्य:स्थिति, समितीचें व्यापक कार्यक्षेत्र, तकावीचा योग्य विनियोग, पतपेढ्यांद्वारे कर्जाची सोय, कर्जाचा योग्य विनियोग, शेतकऱ्यांची असहाय्य स्थिति,एक योजना, सहकारी दुकानांची आवश्यकता, ग्रामोद्योगांकरिता पूर्वतयारी, ग्रामोद्योगांचें महत्त्व, यांत्रिक युगाचें प्राबल्य, जुनें तेंच सोनें, कारागिरांना उत्तेजन द्या, मानवाचा शत्रु : आळस.

सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली.



# शिवणकला

— लेखक —

श्री. ज. पां. दांडेकर

किंमत रु. २–८–०; म. ऑ. ने रु. ३–२–० पाठविल्यास पुस्तक रजि. पोस्टाने पाठवूं. व्ही. पी ने मागविल्यास रु. ३–३–० पडतील.

**प्रस्तुत पुस्तकांत**

लहान मुलांचें झबलें, टोपरें, लाळेरें, लंगोट, सॉफ्ट बूट, बाबा–सूट, सेलर–सूट शिवण्याची माहिती.


स्त्रिया व मुलींच्या फॅशनेबल चोळ्या, बॉडिस्, ब्रेसिअर, हाय–पफ् जम्पर, योक फॅशन जम्पर, अंडर–फ्रॉक, परकर–पेटिकोट, अम्रेला स्कर्ट फ्रॉक, स्कूल–ड्रेसबद्दलची माहिती.

पुरुषांचे फॅशनेबल कपडे, कोट, हाफ-पॅन्ट, फुल-पॅन्ट, नेहरू शर्ट, नेहरू जॅकेट, स्पोर्ट–शर्ट, शेक्स्पीअर कॉलर फुल–शर्ट, बुशकोट, धोतरपैजामा इ. शिवण्याची माहिती.

याशिवाय छत्री, मच्छरदाणी शिवणें, कपड्यासंबंधी काटकसर, तयार कपड्यांचा व्यापार, शिवण्याच्या यंत्राची काळजी व दुरुस्तीची सविस्तर माहिती दिली आहे. — **उद्यम प्रकाशन**, धर्मपेठ, नागपूर.

अनुक्रम
वि. भाग
क्रमांक

# आदर्श गांव



## प्रकरण १ लें

## घर स्वच्छ तर गांव स्वच्छ
## आणि
## गांव स्वच्छ तर शहर तुच्छ

आपल्या भारताला अनेक वर्षांच्या संघर्षानंतर व अनेक वीरांच्या त्यागानंतर स्वराज्य मिळाल्यावर तें टिकविण्याची जबाबदारी आज आपल्यावर येऊन पडली आहे. त्यासाठी स्वर्गीय बापूजींनी रामराज्याचा आदर्श आपणापुढे ठेविला आहे. तो साध्य करण्याकरिता आपण सर्वांनी कंबर कसून पुढे सरसावलें पाहिजे.

## ग्रामसेवकांपुढील कार्य

आपले असंख्य बांधव आज खेड्यांत आहेत त्यांना पोटभर अन्न मिळत नाही की अंगभर वस्त्र मिळत नाही, अठरा विश्वे दारिद्र्याने ते गांजले आहेत, असंख्य रोगांनी रोज मृत्युमुखी पडत आहेत, अज्ञानामुळे आपलें कर्तव्य विसरले आहेत, आपापसांत भांडत आहेत, एकमेकांना लुबाडीत आहेत, गरिबांच्या श्रमाचें शोषण तेथे चालूं आहे म्हणून अज्ञान निद्रेंतून त्यांना जागे करणें आपलें आद्य कर्तव्य आहे. ते जागे झाले की प्रचंड शक्ति त्यांच्यांत संचारेल आणि आपलें रामराज्याचें स्वप्न साकार होण्यास मुळीच वेळ लागणार नाही. खेडत जागा होण्यास वेळ लागेल हें खरें पण तो एकदा जागा झाला की आपल्यापेक्षा शतपटीने कार्य करून दाखवील.

खेडुताला जागा करण्याचे व कर्तव्याची जाणीव करून देण्याचे आतापर्यंत जे जे प्रयत्न झाले ते मुलग्राही नव्हते; त्यांत बराचसा देखावा होता असेंच म्हणण्याची पाळी आली आहे.

वास्तविक दारिद्र्यच अनेक अडचणी निर्माण करतें. घराची स्वच्छता, मुलाबाळांची स्वच्छता ह्या सर्व गोष्टी त्याला पटून सुद्धा दुपारची भूक भागवितांना त्याला इतर गोष्टींकडे लक्ष देण्यास उसंत मिळत नाही. त्याच्या आर्थिक गरजा भागविण्याची शिकस्त केल्या-शिवाय इतर गोष्टींकडे त्याचें लक्ष वेधणें कसें शक्य होईल ? त्याकरिता त्याचा मुख्य धंदा जो शेती तो सुधारण्याकडे प्रामुख्याने लक्ष दिलें पाहिजे व पैसा मिळविण्याचे निरनिराळे सचोटीचे मार्ग, उद्योगधंदे त्याला शिकविले पाहिजेत. शेतीसाठी उत्तम कंपोस्ट खत, पाण्याची व्यवस्था, सुधारलेलीं अवजारें, उत्तम निवडक बीं–बियाणें व माल विक्रीस नेण्यासाठी चांगल्या पक्क्या सडका व साधनें, सहकारी विक्री-केंद्रे, इत्यादि गोष्टींत आपलें सरकारहि अलिकडे आस्थेने लक्ष घालूं लागलें आहे.

या बाबतींत ग्रामसेवकाचें कार्य मर्यादित व प्रचाराच्या

स्वरूपाचें असतें. परंपरागत गोष्टी एकदम सोडण्यास खेडूत सहसा तयार नसतो. त्याला नव्या गोष्टींचें महत्व ग्रामसेवकाने शिकस्तीने व चिकाटीने पटवून देऊन त्याचें मन वळवावयाला पाहिजे. कंपोस्ट खतांत सडण्याची क्रिया अधिक चांगली होते व त्यामुळे त्यांत नायट्रोजनचें प्रमाण जास्त असतें हें खेडुताला पटवून दिलें पाहिजे. असें खत तयार करण्यासाठी खताचा खड्डा मातीने झाकून बंद केला पाहिजे तरच चांगलें खत निर्माण होईल हें एकदा त्याला पटलें की मग ती गोष्ट तो कधीच विसरणार नाही.

नहराची योजना, चांगल्या बियाण्याचें वाटप, तगाई, सुधारलेल्या यांत्रिक अवजारांची मदत इ. गोष्टी सरकारी मदतीनेच होण्यासारख्या आहेत. परंतु त्याचा फायदा घेण्यासाठी खेडुतांस ग्रामसेवकाने सर्व प्रकारे सहाय्य केलें पाहिजे. सरकारी योजना खेडुतांपर्यंत पोचविण्याचें व त्या समजावून सांगून त्यांचा प्रचार करण्याचें कार्य गांवांतील सुशिक्षित लोकांनी केलें पाहिजे. तें करतांना चिकाटी, प्रेमळपणा, खेडुतांत मिसळून त्यांच्या जीवनांत प्रगति करण्याची तळमळ इत्यादि गोष्टी प्रयत्नपूर्वक हस्तगत केल्या पाहिजेत.

## स्वतःचें घर स्वच्छ व आकर्षक ठेवा

खेड्यांतील लोकांना एकदम मोठमोठ्या योजना सांगून त्यांना घाबरवून सोडण्यापेक्षा अगदी त्यांच्या घरापासून सुरुवात करावी. आपापलीं घरें प्रत्येकाने स्वच्छ ठेवलीं, त्यांत घाण साठूं दिली नाही, सांडपाण्याची नीट व्यवस्था केली, घरांत हवा नीट खेळती ठेविली, गुरांची स्वतंत्र गोठ्यांत नीट व्यवस्था केली, घराच्या दर्शनी भिंती सारवून स्वच्छ केल्या व आपल्या घरापुढील आणि घराभोवतालची जागा साफ केली तर पुष्कळसें काम आपोआप होऊन गांव साफ दिसेल. ग्रामसेवकाने प्रथम स्वतःचें घर स्वच्छ ठेवून लोकांपुढे त्याचा आदर्श ठेवला पाहिजे.

स्वतःचें घर स्वच्छ ठेवण्यास कोणीच नाकबूल होणार नाही

त्यामुळे खेडुताचें स्वत:चेंच कल्याण होणार आहे. सांडपाणी साचून डांस उत्पन्न होतात व मलेरियासारखे रोग उत्पन्न होतात. घरांत हवा नीट खेळती राहिली नाही तर घरांत रोगट वातावरण निर्माण होतें वगैरे त्यांच्याच हिताच्या गोष्टींत ते प्रथम लक्ष घालावयास आनंदाने तयार होतील. म्हणून प्रथम त्यांच्या वैयक्तिक फायद्याच्या गोष्टींबद्दल विचार करावयास पाहिजे.

**दर्शनी भित**--गांवांत प्रत्येकाने आपल्या घराची दर्शनी भित स्वच्छ सारवून घ्यावी. हा कार्यक्रम बहुतेक दिवाळीच्या वेळीं प्रत्येक गांवागांवांतून होतोच. दर्शनी भित माती व शेण मिसळून सारवावी. शक्य व सोयीचें असेल तर पिवळ्या मातीने दर्शनी भित सारविणें चांगलें. साधारणत: सर्व गांवांत एकाच प्रकाराने भिती सारवून त्या सर्व सारख्या रंगाच्या दिसतील अशी खबरदारी घ्यावी. घरासमोर आगण असून भित असेल तर किंवा नुसतें कुंपण असेल तर तें कुंपणहि व्यवस्थित व साफ दिसेल असें करावें. त्यामुळे घराची शोभा वाढून गांवाची शोभा वाढण्यास मदत होईल. घरांत जाण्याचा रस्ता व्यवस्थित व स्वच्छ करावा, ओटा असेल तर सारवून साफ ठेवावा, घरांतील सांडपाणी रस्त्यावर येऊन घरापुढे चिखल होऊं देऊं नये. त्यामुळे आपलें घर तर अस्वच्छ दिसेलच पण इतरांनाहि त्रास होऊन गांव गलिच्छ दिसेल. आपणास गांवांत राहावयाचें आहे तेव्हां आपलें जसें आरोग्य आपणांस चांगलें ठेवावेसें वाटतें तसें आपल्या गांवकऱ्यांचें आरोग्यहि ठीक राहण्यासाठी आपण झटलें पाहिजे; नाहीतर गांवाचें आरोग्य बिघडून गांवांत रोग पसरेल व त्याची झळ आपणासहि लागेल ह्याची प्रत्येकाने जाणीव ठेवावी व ग्रामसेवकानेहि ही जाणीव खेडुतांना करून द्यावी. घरांत जाण्याच्या पायऱ्याहि व्यवस्थित असाव्या व त्याखालची घाण नेहमी स्वच्छ करीत जावी. घराबाहेरील पण आपल्या हद्दींतील नालीहि आपण स्वच्छ करावी व स्वच्छ सारवून ठेवलेल्या भितीवर उपयुक्त म्हणी लिहाव्या म्हणजे नवाक्षर लोकांना व प्रौढ साक्षरांना त्या नेहमी वाचतांना आनंद होईल व

## कंपोस्ट खताचे तुलनात्मक फायदे

| उकीरड्यावरील खत | कंपोस्ट खत |
|---|---|
| १. खत पूर्ण सडलेलें नसतें. | १. खत पूर्णपणे सडून मातीसारखें होतें. |
| २. शेतांत टाकल्यावर तें सडतें व क्वचित् पिकाचें नुकसानहि करतें. | २. पूर्ण सडलेलें असल्यामुळे पिकास पोषकच होतें. |
| ३. गुणकारी वायु उडून गेल्यामुळे कमी पोषक. | ३. उपकारी वायु मुरलेले असल्यामुळे चौपट लाभदायक. |

त्यांनी अभ्यासिलेलीं अक्षरें सदैव डोळ्यांपुढे राहिल्याने त्यांची साक्षरता टिकून राहण्यास मदत होईल.

### कांही बोधप्रद म्हणी

१. करा एकी गाळा घाम; तडीस जाईल आपुलें काम.

२. आधी करावें; मग दुसऱ्यास सांगावें.

३. कंपोस्ट खताचा खड्डा म्हणजे सोन्याचा हंडा.

४. एकमेका सहाय्य करूं अवघे धरूं सुपंथ.

५. घरीं गाय कमी काय ?

६. गांवामध्ये सर्व मित्र; जिभेपाशी आहे सूत्र.

७. घरांत घाण; रोगाला नाही वाण.

८. विहिरीजवळ कपडे धुवूं नका.

९. कसाल शेती; तर पिकतील मोती.

१०. आळशी बसाल तर फसाल.

११ दूध हें पृथ्वीवरील अमृत आहे.

१२. वेंचाल तण तर कमवाल धन.

१३. सकल सुखाचें आगर; स्वच्छ ठेवा आपुलें घर.

**सांडपाण्याची व्यवस्था**--घरांतील सांडपाण्याची व्यवस्था नीट करावयास हवी; नाहीतर घरांत गलिच्छ पाणी साठून घर अस्वच्छ दिसेल व डांसांची वाढ होऊन मलेरियासारखे रोग घरांत कायमचें ठाणें देऊन बसतील. खेड्यांतील लोकांना मच्छरदाणी लावण्याची सोय नसते व आर्थिक परिस्थितीहि अनुकूल नसते. औषधपाणीहि मोठ्या मुष्किलीने मिळतें; ह्याकरिता रोगराईपासून बचावण्यासाठी खेडुतांनी स्वच्छता ठेवलीच पाहिजे ही गोष्ट त्यांच्या मनावर ग्रामसेवकांनी ठसवावी. सांडपाण्याची आबाळ खेड्यांतून नेहमीच दिसून येते, तरी प्रत्येकाने आपापलें घर स्वच्छ ठेवल्यास पुष्कळसें काम होण्यासारखें आहे.

सांडपाणी वाहून जाण्याकरिता नीट उतार ठेवून पाणी लवकर वाहून जाईल अशी नाली तयार करावी व ती नेहमी स्वच्छ ठेवावी. जेथून पाणी नालींत येतें त्याठिकाणीं मोरीशी एक जाळी बसवावी म्हणजे केरकचरा नालींत वाहून येणार नाही; नुसतें पाणीच नालींत येईल. जाळीसाठी टिनाचा एक पत्रा घेऊन त्याला जवळ जवळ छिद्रें पाडावींत, त्यांतून कचरा नालींत येणार नाही; फक्त पाणी तेवढें येईल. जाळी मिळाली तर उत्तमच. मोरीच्या तोंडाशी जाळी लावल्याने, साप वगैरेहि घरांत मोरीच्या तोंडाने येणार नाहीत. मोरीला पाणी लवकर वाहून नेण्यास उतारहि चांगला असला पाहिजे. हें सांडपाणी सोकपीट (पाणी शोषून घेणारा खड्डा) करून त्यांत सोडावें. सोकपीट रस्त्यावर नालीच्या तोंडाशी असावा; त्यासाठी चार फूट × तीन फूट व × चार फूट खोल असा खड्डा करावा व त्यांत मोठाले टोळ (गोल दगड) खाली बसवावें. त्याहून थोडे लहान परंतु गोल दगड वर बसवीत आणावे व खड्डा अशा गोल गोटयांनीच भरावा. बाजूची माती खड्डयांत वाहून येणार नाही अशीहि व्यवस्था करावी. सर्वात वर तुराट्यांचा ६ इंच थर द्यावा म्हणजे फक्त पाणीच खड्डयांत जाईल व केरकचरा किंवा माती तुराट्यांवर राहून चाळणीसारखें काम करतील.

दुसरी पद्धत अशी की नालीची धार मडक्यांत पडेल अशा बेताने एक मडकें तळाशी लहान लहान छिद्रें पाडून नालीच्या तोंडाशी बसवावें म्हणजे केरकचरा मडक्यांत साठेल; फक्त पाणी गोटयांतून खड्डयांत सांडेल व खड्डा लवकर बुजणार नाही. हें मडकें कांही दिवसांनी काढून त्यांतील गाळ स्वच्छ करावा व पुन्हा बसवावें. खड्डयांत माती किंवा केरकचरा जाऊं न देण्याची काळजी न घेतल्याने खड्डा लवकर बुजतो व तो पुन्हा उकरून काढणें अत्यंत त्रासाचें होतें. ह्याकरिताच मोरीच्या तोंडाशी जाळी व मडकें किंवा तुराटयांचा थर लावण्याकडे लक्ष द्यावें. तुराटया ठेवल्यास त्या कांही दिवसांनी काढून त्यांवरील गाळ स्वच्छ करावा किंवा त्या दुसऱ्या जागीं बसवाव्या. मोरींत पानांतील अन्न, भांडीं घासण्याची राख किंवा माती वगैरे टाकूं नये. त्यामुळे अन्न सडून घाण येते. पानांतील अन्न जनावरांच्या आंबोणांत टाकावें व तें सडण्याआधीच जनावरांना घालावें.

**खेळती हवा व प्रकाश**--खेडयांतील घरांत नेहमी हवा व प्रकाश ह्यांचा अभाव दिसून येतो. फार पूर्वीच्या काळीं खेडयांतील घरें सुरक्षीत नसत. चोऱ्या व दरोडे ह्यांचा नेहमी उपद्रव असे. त्यामुळे घराला खिडक्या वगैरे न ठेवतां बंदिस्त घरें बांधण्याची प्रथा पडली असावी. पण तीच प्रथा चालू ठेवण्याची आता कांही आवश्यक नाही. घरांत प्रकाश व हवा नेहमी खेळती ठेवावी. खिडक्या व दारें समोरासमोर ठेवावीं म्हणजे हवा खेळती राहाते व प्रकाशहि भरपूर येतो. बंद घरांत धूर कोंडलेला असला म्हणजे श्वसनाचे रोग किंवा क्षयरोग उत्पन्न होतात. घर जुनें असेल तर त्याला उजेडाकरिता व हवेसाठी खिडक्या करून घ्यावयास फारसा खर्च येत नाही. ग्रामसेवकाने ही गोष्ट खेडुतांच्या मनावर चांगली बिंबवावी. स्वयंपाकघरांत धूर निघून जाण्यास धुराडे किंवा मगनचूला अशासारखी व्यवस्था करावी. ह्या सर्व गोष्टी थोडक्या खर्चात करतां येण्यासारख्या असून त्यामुळे घरांतील लोकांचें आरोग्य चांगलें राहून खेडेगांवांत दुर्मिळ अशा औषध-पाण्यासाठी लागणारा पैसा वाचण्यासारखा

आहे. अन्नान्नदशा व कमालीची महागाई यामुळे खेडुत आज पहिल्या-सारखा कणखर राहिला नाही. त्यांतच आरोग्याच्या दृष्टीने दूषित अशा घरांतील घाणीमुळे तो रोगाला लवकर बळी पडतो व खेडे-गांवांत लवकर उपचार न झाल्यामुळे दगावतो. खेडुत अडाणी असले तरी त्यांच्या फायद्याच्या गोष्टी त्यांना पटतीलच असा विश्वास ग्रामसेवकाने बाळगावा. अशा तऱ्हेने घर स्वच्छ ठेवण्यापासून गांव सुधारण्यास सुरुवात करावी.

**घरावरील पाट्या**——त्यानंतर गांवांतील लोकांना एकत्र जमवून प्रत्येकाच्या दारावर घर नंबर व त्याच्या नांवाची ४ इंच × ३ इंचाची छोटी पाटी लावावी. ह्या पाटीवर घर–मालकाचें नांव, घर नंबर, त्याच्या घरांतील माणसांची व पशुंची संख्या असावी. ह्या सर्व पाट्या एकाच रंगांत सुबक अक्षरांनी लिहिलेल्या असाव्यात. टिनाचा एखादा डबा कापल्यास पुष्कळ पाट्या बनतील; त्यांवर काळा रंग देऊन पांढरी अक्षरें काढावीं. शाळेंतील मुलें किंवा प्रौढ साक्षर ह्यांना हसत–खेळत प्रत्येक घरांतील माणसे व पशुंच्या संख्येवरून त्या गांवची लोकसंख्या व पशुसंख्या कोणाहि साक्षरमाणसाला सांगतां येईल.

## बोधप्रद–म्हणी

घराच्या दर्शनी भिंतीवरहि सुबक व सुवाच्य अक्षरांत म्हणी लिहून घ्याव्यात. त्या साधारणपणे ६ फूट उंचीवर लिहिलेल्या असाव्यात व अक्षरांची उंची ९ इंचांपासून १ फुटापर्यंत असावी. अक्षरें सारख्याच आकाराचीं काढलेली असल्यास तर तें एक प्रकारे त्या गांवचें वैशिष्टयच होऊन बसेल. कमीत कमी अक्षर ओळख करून घेण्याची वृत्ति वाढीला लागेल व प्रत्येक नागरिकाला आपल्या गांवांतील सुधारणेबद्दल साभिमान समाधान वाटेल.

घराच्या आजुबाजुची जागा प्रत्येकाने स्वच्छ ठेवावी, लहान मुलांना तेथे शौच्यास बसवूं नये. घरापुढे रोज सडा घालून रांगोळी

घालावी; त्यामुळे एकंदर वातावरण प्रसन्न राहतें व गांवांतील भांडणतंटे निकालात निघण्यास याची मदत होते.

**जनावरांची स्वतंत्र व्यवस्था**--खेडेगांवांत जनावरांसाठी स्वतंत्र गोठ्याची व्यवस्था असावी. घरांतच गुरें बांधण्याने घाण होऊन डांस व चिलटें होतात. स्वतंत्र गोठा बांधण्याची ऐपत नसल्यास घरांतील अंगणांत एक छपरी उभारून तेथे गुरें बांधावींत. नेहमी गुरांचें मलमूत्र काढून खतावर टाकीत जावें. गोठा नेहमी साफ ठेवावा. गोठा बांधतांना गोठ्यांतील हवा खेळती राहील ह्याकडे लक्ष द्यावें व जमिनीला उतार ठेवावा; म्हणजे मलमूत्र वाहून जाण्यास मदत होते.

## खताचे खड्डे

खताचा प्रश्न शेतकऱ्यांच्या अधिक जिव्हाळ्याचा व महत्त्वाचा असूनहि त्याकडे जेवढें लक्ष द्यावयास पाहिजे तेवढें दिलें गेलें नसल्याचें दुर्दैवाने आढळून येतें. कंपोस्ट खताच्या खड्ड्याचा प्रचार ह्या १--२ वर्षांत बराचसा झाला असला तरी त्याचे फायदे लोकांना नीट समजावून सांगण्यांत आलेले नाहीत. कंपोस्ट खताचा खड्डा म्हणजे खत ठेवण्यासाठी केलेला एक खड्डा एवढाच अर्थ सामान्य खेडुताला अभिप्रेत असतो. दुसरा प्रकार आपणापैकी आळशी लोकांचा असतो. केवळ आळसामुळे कोठेहि एक उकिरडा करून त्यावर शेणकचरा नेऊन टाकतात. एका खेडेगांवांत तर असें दिसून आलें की रोजचा कचरा व गुरांचें मूत्र गांवाबाहेर नेऊन टाकण्यास नोकर तयारच होत नाहीत. जणुं कामचुकारपणांत त्यांची अहमहमिका लागलेली असते. त्यांना फक्त आपल्या हक्काची जाणीव करून देण्यांत आली आहे. कर्तव्याबद्दल त्यांना कधीच कुणी सांगत नाही त्यामुळे कामावर आल्यावर कसें तरी रेंगाळत वेळ घालवावयाचा व पूर्ण मजुरीसाठी मात्र भांडावयाचें अशी परिस्थिति आहे. इतके दिवस झालेल्या मजुरांच्या पिळवणुकीचा कदाचित् हा सूडहि असूं शकेल; पण

खेड्यांत आज अशी परिस्थिति आहे खरी. ह्यावर अपाय म्हणून सर्व गांवासाठी मिळून १–२ हातगाड्यांची सोय करून त्यांतून रोजचा केरकचरा व शेण वगैरे वाहून नेण्याची व्यवस्था करतां येण्यासारखी आहे. थोड्याफार प्रयत्नांनी नोकरहि ऐकतील असा भरवसा वाटतो.

## खड्ड्याचा आकार व रचना

कंपोस्टचे खड्डे गांवकऱ्यांनी गांवाबाहेर एक नक्की जागा ठरवून तेथेच ओळीने करावे; दोन ओळींत एक बैलगाडी जाण्यापुरता रस्ता ठेवावा. गुरांच्या संख्येनुसार प्रत्येकाच्या खड्ड्याचा आकार लहान–मोठा असू शकेल. त्यातल्यात्यांत लहान खड्डे करणें चांगलें; कारण ते लवकर भरतात व बंद करणें सोयीचें होतें. साधारणत: ६ × ४ फूट व ५ फूट खोल असे खड्डे एका ओळींत व तेवढेच खड्डे, मध्ये १० फूट जागा सोडून, दुसऱ्या ओळींत करावे. प्रत्येक शेतकऱ्याने आपला खड्डा स्वत: किंवा मजूर लावून तयार करावा. एकाच माणसाचे २–४ खड्डेहि असूं शकतील. रोजचें शेण–मूत्र वा केरकचरा भरण्यापूर्वी किंवा मधून मधून त्यांत एक दोन बादल्या पाणी टाकावें. खड्डा पूर्ण भरला म्हणजे त्यावर माती टाकून व त्याला थडग्यासारखा आकार आणून बंद करावा. साधारणत: खड्डे पावसाळ्याच्या सुरुवातीला रिकामे करून ठेवावेत. खत शेतांत टाकल्यावर पाणी टाकण्याचा त्रास कमी करण्यासाठी पावसाळ्यांतील पाणी खड्ड्यांत येईल अशा बेताने पावसाळ्यांत त्या खड्ड्यांत पाणी साचू द्यावें व त्यांतच रोजचें शेण वगैरे टाकीत जावें. खताच्या खड्ड्यांत पाणी टाकून खत ओलें करणें व पुढे तें माती टाकून बंद करून टाकणें ह्या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. पाण्याच्या ओलाव्याने व हवा–बंद करून टाकण्याने शेण वा कचरा लवकर सडतो व त्यांतील उपयुक्त वायु हवेंत उडून जाऊं शकत नाहीत. उघड्यावरील खतांतील वायु निघून गेलेले असतात व त्यामुळे त्यांचा कस कमी होतो. साध्या उकीरड्यावरील खत व कंपोस्ट खत ह्यांमध्ये

जमीन–अस्मानाचें अंतर असतें तें यामुळेच. उकीरड्यावरील ४ गाड्या खत, पूर्णत: सडलेल्या फक्त १ गाडी कंपोस्ट खताइतकेंच परिणामकारी असतें. खेडुतांना ही गोष्ट पटवून दिली पाहिजे. तसेच थोडे श्रम करण्याचें मनावर न घेतल्याने, केवळ आळसामुळे, त्यांचें किती नुकसान होतें हें त्यांना वेळोवेळीं समजावून सांगितलें पाहिजे म्हणजे कंपोस्ट खत बनविण्याकडे ते जास्त लक्ष देतील. न सडलेले उकीरड्यावरील खत, पाऊस कमी झाल्यास, शेतांतच सडण्याची क्रिया होतांना जमिनीचा पोत बिघडवितें व सडतांना तयार झालेल्या उष्णतेमुळे, पाऊस कमी असेल तर, पिकाचेंहि नुकसान करतें. ह्या गोष्टी शेतकऱ्याला एकदा नीट समजल्या म्हणजेच कंपोस्ट खताचे खड्डे शेतकरी उत्साहाने करील व खरा फायदा होईल. जेथे जास्तच उन्हाळा असेल तेथे समाधी किंवा थडग्याप्रमाणे माती टाकून बुजविलेल्या खताच्या खड्ड्यावर एक मडकें पुरून तें सतत पाण्याने भरलेलें ठेवल्यास मडक्यांतील पाणी खताच्या खड्ड्यांत मुरून कंपोस्ट खत सडण्यास अधिक मदत होईल.

खतांचे खड्डे गांवाबाहेर सरळ रेषेंत दोन ओळींत असावेत व प्रत्येकावर एक पाटी लावून तीवर मालकाचें नांव, गुरांची संख्या व शेती किती एकर आहे एवढी माहिती असावी.

---

संग्रहालय,
अनुक्रम २८५३०
विभाग वा.वा.
क्रमांक ७७०२
नौ. दि. ३९१३

# प्रकरण २ रें

# वार्डाची सफाई व व्यवस्था



## सर्वांना घेऊन चला

कुटुंबांतील प्रत्येकाचें वैयक्तिक काम व कुटुंबाचें सामूहिक काम ह्यात जसें फारसें अंतर असत नाही तसेच घराची स्वच्छता व वार्डाची स्वच्छता ह्यांतहि अंतर वाटावयाला नको. प्रत्येक कुटुंबातील सारीच माणसें जशी आपापल्या कामांत नेहमीच तत्पर असू शकत नाहीत तसेच आपल्या वार्डातील लोकांचेंहि समजावें. कांही आळशी असतात, कांहींना चांगल्या कामांत खो घालण्याची संवय असतें तर कांही ह्यांत काय आहे, त्यांत काय आहे असें म्हणून इतरांचा उत्साहभंग करणारे असतात. ह्या सर्वांना घेऊनच आपणाला आपला वार्ड व पर्यायाने आपला गांव आदर्श करावयाला पाहिजे.


आपापलीं घरें साफ ठेवल्यावर आणि घरासमोरील सडक व

नाली ज्यांनी त्यांनी साफ केल्यावर वार्ड स्वच्छ राखण्याकरिता विशेष असें कांहीच करावें लागणार नाही हें खरें; तरीहि सर्वच जण नुसते सांगून ऐकणारे नसतात. त्यांना पटवून दिलें पाहिजे; प्रसंगीं आपला वार्ड सर्व गांवांत सुंदर दिसावा म्हणून कळकळीनें वार्डातून हिंडून वार्डमध्ये राहणाऱ्या एखाद्या आळशी माणसाचें घर किंवा त्याच्या घरापुढील सडक वार्डातील लोकांनी मिळून साफ करावयाला हवी. आंब्याच्या आढींत जसे एखादा आंबा सडका राहिला तर सर्वच आंबें सडण्याची भीति असते त्याप्रमाणे तुमचा एखादा शेजारी आळशी व गलिच्छ असेल तर त्याच्या घाणेरडे-पणामुळे, त्याच्या घरांतून सडकेवर वाहणाऱ्या सांडपाण्याने डांसांची उत्पत्ति वाढून त्यांचा उपद्रव शेजाऱ्याला होईल किंवा इतर रोग वगैरे वाढून सर्व वार्डात पसरण्याची शक्यता राहील. ह्याकरिता त्याचें घर किंवा नाली एक–दोनदां साफ करून द्यावी व त्याला स्वच्छतेचें महत्त्वहि समजावून सांगावें. आपला वार्ड सर्व गांवांत सुंदर दिसावा व स्वच्छ असावा अशी कळकळ वार्डातील प्रत्येकाला असावी व त्याकरिता वार्डावार्डातून चढाओढी लावाव्या म्हणजे गांव आपोआप स्वच्छ राहण्यास मदत होईल.

## वार्ड–विभागणी

गांवाच्या सोयीप्रमाणे साधारणत: ५०–६० घरांचा एक याप्रमाणे वार्ड पाडावेत. सर्व गांवकरी लोकांनी एकत्र जमून वार्डांची योजना आखावी. गांवाचा नकाशा पटवाऱ्याकडून काढून घ्यावा व त्यांत निरनिराळे वार्ड दाखवून गांवांतील वार्डांचा नकाशा तयार करावा. प्रत्येक वार्डाला नांव द्यावें.

पुष्कळ ठिकाणीं वार्डांना मोठमोठ्या देशभक्तांचीं वा ऐतिहासिक व्यक्तींचीं नांवें दिलेलीं आढळून येतात. वार्डातील सर्व लोकांच्या सलोख्याने हें ठरवावें.




## वार्ड प्रमुखाची जबाबदारी

वार्डातील मुख्य व्यक्तीने वार्डातील लोकांची आपल्या घरीं एक सभा घ्यावी व सर्वांना वरील सर्व गोष्टी नीट समजावून सांगाव्या. त्यांच्या कांही अडचणी असतील तर त्या नीट समजून घ्याव्या व त्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार करावा. आपला वार्ड सर्व गांवांत अधिक स्वच्छ व सुंदर दिसला पाहिजे अशी कळकळ त्यांच्या मनांत उत्पन्न करावी व त्यांचें साहाय्य मिळवावें. प्रत्येकाने आपलें घर साफ ठेवावें, त्यामुळे रोगराई उत्पन्न होणार नाही. वार्डातील प्रमुखाने आपलें घर स्वच्छ ठेवलें तर त्याचा लोकांवर विशेष परिणाम होईल व तेहि आपापलीं घरें स्वखुषीने साफ ठेवून आपला वार्ड साफ व सुंदर ठेवण्यास मदत करतील. आपापल्या वार्डातील लोकांसमवेत मधून मधून किंवा दर रविवारी प्रभात फेरीसारखी फेरी काढून वार्डाची पाहणी करावी व ज्याचे घर साफ नसेल त्याला बाहेर



बोलावून स्वच्छतेचें महत्त्व नीट समजावून सांगावें. वार्डातील सर्व लोक फेरीमध्ये असले म्हणजे सर्वांच्या इच्छेविरुद्ध सहसा कोणी जाणार नाही. घर स्वच्छ न राखल्याबद्दल तो शरमिंदा होईल. ही पद्धति अनुभवान्ती अत्यंत यशस्वी ठरली आहे. सर्वांचा मान राखण्याकरिता तरी कमीत कमी त्याला आपलें घर स्वच्छ राखणें भागच पडतें.

---



वार्डातील सडका त्या त्या वार्डातील लोकांच्या साहाय्याने दुरुस्त करून घ्याव्यात व दोन्ही बाजूंनी नाली करून पाणी वाहून जाण्याची सोय करावी.

## श्रमदानाने गांवाचें सौंदर्य वाढवा

दर्शनी भिंती एकसारख्या दिसतील अशा पद्धतीने शेणाने किंवा पिवळ्या मातीने सारवून त्यांवर सुंदर अक्षरांत म्हणी लिहिण्याबद्दल पहिल्या लेखांकांत सांगितलेंच आहे. वार्डातील रस्ता श्रमदान पद्धतीने तयार करावा. वार्डांत कोणी आजारी असल्यास कळकळीने त्याची चौकशी करावी. आवश्यकता वाटल्यास डॉक्टरांचा सल्ला त्याला मिळवून द्यावा.



कोणी आजारी झाल्यास किंवा कोणी अडचणींत असल्यास त्याला मदत करावी.

## कंदीलांची सोय

वार्डांत कंदीलांची सोय करण्यासाठी वर्गणी जमवावी. प्रत्येक कंदीलाला १६ ते २० रुपये खर्च येतो. कंदील लावतांना वार्डाच्या लोकांचा सल्ला घ्यावा. गांवांतील लोकांना बोलावून सर्वांच्या संमतीने गांव-नकाशावर कंदीलासाठी वार्डा-वार्डांतून खुणा कराव्या व त्या जागीं कंदील लावावें. वळणावर किंवा गल्लीच्या तोंडाशीं दिवे लावावे. शक्य झाल्यास आपल्या घरासमोर कंदील लावण्याचें कसोशीने टाळावे, लोक मोठे चिकित्सक असतात. स्वतःच्या घरापुढे सार्वजनिक कंदील लावण्याचा आग्रह धरल्यास ते टीका करतील व त्यामुळे वार्ड प्रमुखाचें वजन राहणार नाही. वार्ड प्रमुखांनी थोडी झीज सोसून नेहमी निस्पृह राहण्याचा प्रयत्न करावा. कांही गोष्टींत तर



वार्डांत कंदील लावून रात्रीच्या प्रकाशाची सोय करावी.

त्याग करण्याचीहि तयारी ठेवली पाहिजे. कंदीलाची व्यवस्था वर्गणी जमवून करावी; तेलासाठीहि वर्गणी जमवून तेल आणून ठेवावें व तें काटकसरीने खर्च करावें. तेलाचा खर्च घरामागे महिन्याला एक दोन आण्यांपेक्षा जास्त येत नाही. पावसाळा सोडून इतर ऋतूंत कंदील चांदण्या रात्रीं लावूं नयेत. ६० घरांच्या वार्डांत साधारणपणे ४ कंदील लावावें. प्रत्येक कंदीलास रोज १ आण्याचें तेल जाळलें तर अंधाऱ्या १५ रात्रींत साधारण एक रुपयाचें तेल जळेल व या हिशेबाने ४ कंदीलांत महिन्याला ४ रुपयांचें तेल लागेल. ६० घरांच्या वार्डांत प्रत्येकीं १ आणा दिला तरी, महिना चार रुपये सहज जमूं शकतात. ज्या गांवांत ग्रामपंचायत आहे तेथे कंदील ग्रामपंचायतीतर्फेच लाविले जावेत. जेथे ग्रामपंचायत नाही तेथे वर सांगितल्याप्रमाणे व्यवस्था करणें सहज शक्य आहे.

## कचरा–पेट्या

केरकचरा टाकण्याकरिता वार्डांतील सडकेच्या एका बाजुला एक–दोन जागीं पेट्या ठेवाव्यात. ह्यासाठी डांबराचे रिकामे गोल ड्रम फार चांगले. ड्रमाचीं दोन्हीं तोंडें काढून टाकून फक्त गोल कडी कचरा टाकण्यास उभीं करून ठेवावी. दर रविवारीं सकाळीं ग्राम-सफाईचा कार्यक्रम ठेवावा. त्यावेळी ह्या ड्रमांतील कचरा काढून गांवाबाहेरील कंपोस्ट खताच्या खड्ड्यांत टाकावा व त्याचें खत करून विकावे. डांबराच्या ड्रमाला ३ ते ५ रुपये पडतात. ही रक्कम एकदा वर्गणी जमवून उभी करावी. हे ड्रम बरींच वर्षे टिकतात.



### योग्य चुरशीचा पायंडा

वार्डाचा प्रमुख नेमतांना वा वार्डाला नांव देतांना पक्षाभिनिवेश (Party spirit) निर्माण होऊन सर्व कामाचा विचका होईल अशी परिस्थिति असल्यास जरा सावधगिरीने कार्यभाग उरकावा. वार्डांना त्या त्या भागांतील धंद्यांवरून नांवें दिल्यासहि चालेल. जसे–लोहार वार्ड, हरिजन वार्ड वगैरे. वार्डातील भांडणें गांवांतील एखाद्या तिऱ्हाइत माणसाकडून सामोपचाराने मिटवितां येतील किंवा त्या भांडणांचा कल बदलवून वा त्याला सौम्य स्वरूप देऊन प्रत्येकाचा वार्ड अधिक सुंदर कसा दिसेल अशी आदर्श चुरस लावून त्याचा गांव आदर्श करण्याकडे उपयोग करून घेतां येईल.

---


सुबुद्ध पालक व चिंतनशील विद्यार्थ्यांचें
मार्गदर्शक पुस्तक

**अभ्यास कसा करावा ?**

लेखक–**प्रा. स. अ. रानडे**, एम्. ए., बी. टी.

किंमत रु. १–४–०, म. ऑ. ने रु. १–१२–० पाठविल्यास पुस्तक रजिष्टर पोष्टाने पाठवूं. व्ही. पी. ने मागविल्यास रु. १–१४–० पडतील.


— **प्रस्तुत पुस्तकांत** —

लेखन, वाचन, पाठान्तर, प्रश्नोत्तरें, पुनरावृत्ति (Revision), शाळा–कॉलेजांतील अभ्यास, परीक्षेचा अभ्यास, दैनंदिन व मासिक वेळापत्रक, उत्तरांतील आटोपशीरपणा, अभ्यास–विषयाची मूलभूत तत्वें, आत्मशोधन इ. अभ्यासाच्या सर्व अंगांचें सोपपत्तिक विवेचन केलेलें आहे. विद्यार्थ्यांच्या पालकांसाठीहि त्यांत योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत. आपली प्रत तावडतोब मागवा.

**उद्यम प्रकाशन, धर्मपेठ, नागपूर.**

प्रकरण ३ रें

# सामुदायिक कार्यें




## १. सामुदायिक कार्यांची रूपरेषा

स्वतःचीं कामें व आपल्या वार्डांतील कामें करून झाल्यावर आपल्या गांवासाठी सामुदायिक (सर्व गांवकऱ्यांच्या हिताचीं) कार्यें करावयास घ्यावीत. आपला वार्ड सर्व गांवांत सुंदर व स्वच्छ असावा ह्या चुरशीचें स्वरूप व्यापक करून आपला गांव संपूर्ण तहसिलीत, जिल्ह्यांत किंवा प्रांतात सुंदर, स्वच्छ व आदर्श असावा अशी ईर्ष्या

गांवकऱ्यांत निर्माण करावी. भोवतालच्या गांवांनी आपल्या गांवाकडे बोट दाखवून त्याबद्दल प्रशंसोद्गार काढल्यास आपणांस कितीतरी आनंद होईल व एकदा मिळविलेली ही कीर्ति टिकवून ठेवण्यासंबंधी एक प्रकारचा हुरूप निर्माण होईल. ह्याकरिता आपापलीं भांडणें विसरून त्यांना कामाला लावावें. असल्या गांवाकडे व त्यांतील लोकांच्या सुखी जीवनाकडे पाहून आपलेंहि गांव सुधारण्यासाठी आपोआप व हिरीरीने प्रयत्न होऊं लागतात व अशा रीतीने हें लोण पसरत जातें. खेडुतांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून, प्रसंगीं झीज सोसून, स्वत: अंगमेहनत करून आपल्या प्रेमळ भाषणाने व वागण्याने खेडुतांना वश करून घेण्याची कला ग्रामसेवकाने हस्तगत केली पाहिजे. त्यांच्यासारखा साधा पोषाख, त्यांच्यांत मिसळण्याची, त्यांच्याशी त्यांच्याच भाषेंत हास्यविनोद करण्याची व आपल्या आदर्श वागण्याने त्यांच्यावर छाप पाडण्याची मनोवृत्ति ग्रामसेवकाने प्रयत्न-पूर्वक आत्मसात केली पाहिजे. खेडूत जितके रूढीप्रिय असतात तितकेच खात्री झाल्यानंतर वाटेल तें करावयासहि तयार होतात. चिकाटी ठेवून आपल्या आदर्श वागण्याने व त्यागी वृत्तीने त्यांचीं मनें ग्रामसेवकाने जिंकावयास पाहिजेत.

**एकमेकां साह्य करूं; अवघे धरूं सुपंथ**

सामुदायिक कामांत लोक तितके आस्थेने लक्ष घालीत नाहीत हा सर्वांचाच अनुभव आहे. स्वत:चीं घरें साफ ठेवण्यास ते सहज तयार होतील; कारण त्यांत त्यांचा स्वार्थ असतो. पण ग्रामसफाई-साठीं हातांत झाडू घेणें त्यांना अजूनहि कमीपणाचें वाटण्याचा संभव आहे. मी माझ्या घरासमोरील आंगण साफ ठेवीन; आळशी शेजाऱ्याच्या घरासमोरील आंगण मी काय म्हणून झाडावें ही वृत्ति स्वाभाविक असली तरी तिचे दुष्परिणाम नीट समजून सांगितल्यास तींत बदल घडवून आणणें कांहीं फारसें कठीण नाही. शेजाऱ्याच्या घरांतील घाणीमुळे निर्माण होणाऱ्या डांस–चिलटांचा उपद्रव, तुमचें घर कितीहि स्वच्छ असलें तरी, तुम्हाला झाल्यावाचून कसा



राहील ? ह्यासाठी आपल्या घराप्रमाणेच शेजाऱ्याचेंहि घर स्वच्छ राहणें आवश्यक आहे. एवढे एकदा पटलें की मग साम, दाम, दंडभेदादि नीतीने त्याला योग्य तें करावयाला लावलेंच पाहिजे. मग त्याकरिता त्या माणसाला सांगून, शिकवून किंवा प्रसंगी त्याचें काम करून देऊन देखील आपला हेतु साध्य करवून घेतला पाहिजे. त्याचें घर साफ करून देण्याने तो शरमेल व केव्हां ना केव्हां तुमच्याबरोबर हातांत फडा घेईलच. एवढेच नव्हे तर तिसऱ्या आळशी माणसाला कामाला लावील. दुसरें असें की आपलें गांव हेंच आपलें घर ही भावना एकदा निर्माण झाली की ज्याप्रमाणे आपल्या घरांतील एखाद्या आळशी माणसाचें काम आपण स्वतः करून आपलें घर स्वच्छ व साफ ठेवतों तसेंच गांवांतील एखाद्या आळशी माणसाचें काम केलें तर कुठे बिघडलें ? चारदोन आळशी किंवा हट्टी माणसांसाठी आपलें गांव आदर्श करण्याचें ध्येय सोडून देणें कोणाला तरी आवडेल काय ?



**सार्वजनिक सभा**

सामुदायिक कार्य हाती घेण्यापूर्वी गांवांतील सर्वसाधारण लोकांची एक सभा घ्यावी व त्या सभेंतून लोकांना निहीत सामुदायिक कार्याविषयी कल्पना द्यावी. गांवांतील वजनदार अनुभवी वृद्ध लोक

किंवा स्थानिक पुढारी आणि गांव आदर्श करण्याची तळमळ असलेले लोक ह्या सर्वांनी मिळून एकेका विषयाचें महत्त्व पटवून द्यावें. सभेच्या सुरुवातीस पुढील ग्रामधून एकाने सांगावी व सर्वांनी मिळून एकत्रित उच्च सुरांत गावी; त्यामुळे एक पवित्र व अनुकूल असें वातावरण निर्माण होऊन 'आदर्श गांव' निर्माण करण्याचा निश्चय दृढमूल होण्यास मदत होईल व आत्मविश्वासाने सर्वांचीं पाऊलें त्या मार्गाने वळूं लागतील.

**ग्रामधून** (चाल : रघुपती राघव राजाराम)

करा एकी गाळा घाम, तडीस जाईल आपुलें काम ।
तडीस नेईल प्रभु तें काम, रघुपती राघव राजाराम ।।
रघुपती राघव राजाराम, आम्हां सन्मति दे भगवान ।

ही ग्रामधून रामधूनसारखीच प्रथम सावकाश व नंतर थोडी जलद एकाने सांगून सर्वांनी उंच आवाजांत गंभीरतेने म्हणावी.

सामुदायिक कार्याची विभागणी करून त्यांची अंमलबजावणी निरनिराळ्या समित्यांकडून करावी म्हणजे मोजक्याच माणसांवर नेहमी कामाचा भार पडत नाही. प्रथम एक ग्रामविकास मंडळ नेमावें. त्यांत गांवांतील एक उत्साही कार्यकर्ता अध्यक्ष नेमावा. त्यानंतर एक उपाध्यक्ष, १–२ चिटणीस व एक कोषाध्यक्ष. हे सर्व लोक त्यागी वृत्तीचे, गांवांतील लोकांच्या विश्वासास पात्र व कळकळ बाळगून व गांवासाठी प्रसंगीं झीज सोसूनहि प्रत्यक्ष काम करणारे असावेत. त्यानंतर गांवांतील लोकसंख्येप्रमाणे सदस्यांची संख्या असावी. पुढे सुचविलेल्या पोट–समित्यांचे सर्व सभासद व गांवांतील सर्व निष्ठावंत कार्यकर्ते ह्यांचा ह्या ग्रामविकास मंडळाच्या सभासदांत समावेश करावा. सभासद किती असावेत ह्याला बंधन नाही. पण विनाकारण अडगळ होणार नाही तसेच कोणी उत्साही कार्यकर्ता वगळला जाणार नाही अशी काळजी घ्यावी. कांहीं कारण न दाखवितां ३ सभांना हजर न राहणारा सभासद विनाकारण अडगळ

समजण्यास हरकत नाही. अशा सभासदास एकदां–दोनदां समजावून सांगावें व पुनः गैरहजर राहिल्यास सर्वांच्या संमतीने त्याचे सभासदत्व रद्द करावें. अशा वेळीं अध्यक्षाने थोड्या खेळीमेळीने काम घ्यावें. नंतर गांवांतील निरनिराळ्या व्यवसायांतील लोकांच्या साहाय्याने खालीलप्रमाणे आदर्श गांव करण्यासाठी ग्रामविकास मंडळाच्या पोट-समित्या नेमाव्या व प्रत्यक्ष कार्याला सुरुवात करावी. ग्रामविकास मंडळांतील सभासद ह्या पोट-समितीत काम करूं शकतील व पोट–समित्यांचे सर्व सभासद ग्रामविकास मंडळाचे सभासद राहतील. ह्या पोट-समित्या ग्रामविकास मंडळाच्याच उपसमित्या असल्यामुळे ग्राम-विकास मंडळ त्यांनी केलेल्या कार्याला जबाबदार राहील. प्रत्यक्ष काम मात्र ह्या पोट-समित्यांच्या लोकांनी करावयाचें आहे.

ग्रामविकास मंडळाच्या पोट-समित्या खालीलप्रमाणे राहातील. त्यांत साधारणतः गांवांतील सर्व धंद्याच्या लोकांचा समावेश व्हावा म्हणजे त्याच्या व्यावसायिक ज्ञानाचा फायदा गांवांतील इतर लोकांनाहि मिळेल व गांवांतील सर्व दर्जाच्या लोकांना विकास मंडळात स्थान मिळून आदर्श गांव बनविण्यांत आपलाहि हात आहे अशा भावनेने त्यांना काम करण्यास हुरूप वाटेल.

## ग्रामविकास मंडळ

### उपसमित्या व सभासदांची निवड

(१) **शेती–सुधार–समिति**––सुशिक्षित शेतकरी व शेतीचा व्यासंग असणारे.

(२) **पशु–सुधार–समिति**––गवळी, गायी चारणारे, गांवांतील पशु चिकित्सक व पशुविषयक आवड असणारे सुशिक्षित.

(३) **स्वास्थ्य–समिति**––गांवांतील वैद्य, वैद्यकी जाणणारे व या विषयाचे व्यासंगी सुशिक्षित.

(४) **शिक्षण–मनोरंजन–समिति**–गावांतील शिक्षक, भजनी

मंडळी व नाटक करणारे गुरुदेव मंडळाचे लोक आणि या विषयाचे व्यासंगी सुशिक्षित.

(५) **स्थापत्य-समिति**--गवंडी, सुतार, लोहार, ठेकेदार व या विषयाचे व्यासंगी मातकाम करणारे व मजूर वर्गातील लोक.

(६) **ग्रामोद्योग-समिति**--तेली, विणकाम करणारे, बुरड, कुंभार, दुकानदार व ह्या विषयाचे व्यासंगी सुशिक्षित.


ह्या समित्या नेमतांना गांवांतील साधारण त्या त्या व्यवसायांतील लोकांना त्यांत स्थान मिळून गांवांतील बहुतेक सर्वच धंद्याच्या लोकांना प्रतिनिधित्व मिळेल अशी खबरदारी घ्यावी. त्यामुळे सर्वच लोकांना समाधान वाटून सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या व सर्व व्यवसायांच्या लोकांना एकत्रित येऊन कार्य करण्यास हुरूप वाटेल व गांवाचें कार्य एकदिलाने व एकमनाने मोठ्या हुरूपाने व्हावयास मदत होईल.

या समितींतील सभासदांनी करावयाच्या कार्याची रूपरेषा पुढील प्रकरणांतून सविस्तरपणे देण्यांत येईलच. याप्रमाणे कार्य करतांना ज्या अडचणी येतील त्या अडचणी ग्रामविकास मंडळाची बैठक घेऊन सोडवाव्यात. साधारणतः ग्रामविकास मंडळाची बैठक प्रत्येक शनिवारीं रात्रीं घ्यावी. त्या बैठकींत गांवकऱ्यांनाहि बसू द्यावें व प्रत्येक समितीच्या कार्याचा आढावा घेऊन पुढील आठवड्यांत करावयाच्या कार्याचा आराखडा तयार करावा. गांवकरी ह्या सभेंत हजर असतील तर आपल्या गांवांत काय चाललें आहे ह्याची त्यांना कल्पना येईल. प्रत्येक सभेंतील अहवालाची नोंद ठेवावी. समितींतील विषयाची जबाबदारी त्या त्या समितीवर असली तरी ग्रामविकास मंडळाची संयुक्त जबाबदारी दृष्टिआड होऊं देऊं नये. सर्वांचें काम सर्वांनी करावें. अशा प्रसंगीं दर सभेनंतर एखादें भजन किंवा प्रहसन करून मनोरंजन-समितीने आलेल्या गांवकऱ्यांची करमणूक करावी.

सभेला येण्यासाठी ते एक आकर्षण होऊन सभेला पुष्कळ गांवकरी हजर राहतील.

## ग्रामविकास मंडळ, त्याच्या शाखा व कामें

### शेती–सुधार–समिति



(१) शेणाचा खताकडे उपयोग. गोवऱ्या, शेण्या न बनविण्याबद्दल प्रचार. सर्पणाची सोय.

(२) संयुक्त खत बनविणें, खड्डे करणें.

(३) कृत्रिम खताचा प्रचार व सहकारी पद्धतीवर विक्री. अँमोनियम सल्फेट वगैरे.

(४) नांगरण्यासाठी भाड्याने ट्रॅक्टर किंवा बैलजोडीने नांगरण्याची सोय करून देणें.

(५) सुधारलेलें बीं–बियाणें शेतकऱ्यांना मिळवून देणें. तगाईच्या रूपाने किंवा सहकारी दुकानांतून विकणें.

(६) शेतांतील कुंदा, गोखरू इत्यादिंचा नाश करण्यास वा इतरहि शेतीकामांस सामुदायिक रीतीने गांवकऱ्यांची मदत मिळविणें.

(७) नवी जमीन लागवडीखाली आणणें.

(८) पाट–बंधारे घालून जमिनीची धूप थांबविण्याचा सल्ला देणें व मदत करणें.

(९) कीड, गुरें, पक्षी व चोर ह्यांपासून पिकांचें सामुदायिक पद्धतीने संरक्षण करणें.

(१०) पाण्याची सोय–

अ. विहिरीसाठी तकावी मिळवून देणें व तकावीच्या योग्य विनियोगाकडे लक्ष देणें.

ब. विहिरींची डागडुजी करणें.

क. भाड्याने पंप किंवा खरेदीसाठी सल्ला देणें.

ड. पाटबंधारे वगैरेंची सोय करणें.

(११) सामुदायिक शेती आदर्श करून नव्या औजारांचा व नव्या शास्त्रीय पद्धतीचा प्रचार करणें.

(१२) शेती–उत्पादन स्पर्धा लावणें व चांगल्या धान्यांचें व गुरांचें प्रदर्शन भरविणें.

(१३) प्रचारासाठी तज्ञांची व्याख्यानें व प्रात्यक्षिकें.

(१४) गांवांतील शेतांचा तपशील व पिकें ह्यांचा आराखडा तयार करून तज्ञांकडून बीवड सुचविणें.

## पशु–सुधार–समिति

(१) सांडाची गांवांत सोय करणें व त्यांची जोपासना करून त्यावद्दलचें हिशेव ठेवणें.

(२) नव्या सांडाच्या वासरावर लक्ष ठेवून त्यांची नीट जोपासना करण्याचा सल्ला देणें.

(३) गुरांच्या डॉक्टरांकडून प्रति वर्षी गुरांना टोंचून घेणें.

(४) गोन्हे, खोंड खच्ची करून घेणें.

(५) सामान्य औषधें संग्रहीं ठेवून प्राथमिक उपचार करणें.

(६) मुर्गी : कोंबड्या : पालन सहकारी केंद्र स्थापणें. गांवांत लोकांना सल्ला देणें. उत्तम जातीच्या अंड्यांचा प्रचार करणें.

(७) जनावरांच्या चाऱ्याची सोय करणें.

(८) कडवा कापून घालण्यासाठी सहकारी पद्धतीवर कडवा कापणारीं यंत्रें भाड्याने देणें.

(९) प्रचारासाठी तज्ञांचीं व्याख्यानें व प्रात्यक्षिकें.

(१०) निर्भेळ दूध विकणारीं सहकारी केंद्रें किंवा दुधाचें पदार्थ मिळण्याची व्यवस्था.

(११) डेअरीची सहकारी संस्था काढणें.

(१२) गुरांसाठी खुराक सहकारी दुकानांतून किफायतशीर भावाने विकणें.

(१३) गुरांच्या रोगांसंबंधी रिपोर्ट डॉक्टरसाहेबांकडे पाठवून गुरांच्या डॉक्टरांची मदत मिळविणें.

(१४) ढोर-फोडीची अलग व दूर व्यवस्था.

## जन-स्वास्थ्य-समिति

(१) गांवांतील व घरांतील सांडपाण्याची नीट व्यवस्था पाहाणें. सोक-पिट्स बनविणें व सडकेची नाली साफ ठेवणें.

(२) मलेरिया-प्रतिबंधक म्हणून डबकीं किंवा अन्य जागीं पाणी साठूं न देणें. त्यांत रॉकेल किंवा फिनेल टाकून डांस न होऊं देणें.

(३) ग्रामसफाईचा कार्यक्रम निदान आठवड्यांतून एकदां ठेवणें व गांव स्वच्छ ठेवण्याचा प्रचार करणें.

(४) विहिरीजवळ सांड-पाणी मुरूं न देणें. विहिरीस कठडें तयार करणें, स्नान, धुणी वगैरेचें पाणी विहिरींत न जाईल अशी व्यवस्था करणें.

(५) पिण्याचें पाणी स्वच्छ ठेवण्यास मदत करणें.

(६) रात्रीं सडकेवर दिवाबत्तीची सोय करणें.

(७) कॉलरा, प्लेग वगैरे संसर्गजन्य रोगांच्या साथीच्या वेळीं प्रतिबंधक टिका लावून घेणें आणि रोगाचा रिपोर्ट करून सरकारी डॉक्टरांची मदत मिळविणें.

(८) घरांत हवा–प्रकाश खेळता ठेवण्याचा प्रचार करणें. मगनचुल्यांचा प्रचार करून घरांत धूर न होऊं देणें.

(९) सार्वजनिक संडास व मुत्रीघरें साफ ठेवण्याचा प्रचार करून त्यांवर देखरेख ठेवणें.

(१०) प्रथमोपचार व सूतिकागृह ह्यांची व्यवस्था.

(११) कचरा टाकावयास गांवांत पेटचांची सोय.

(१२) गांवांतील हॉटेलांवर स्वच्छतेसाठी देखरेख.

### शिक्षण व मनोरंजन–समिति

(१) प्रौढ साक्षरतेचे वर्ग चालविणें व नवाक्षर खेडुतांना वाचनासाठी सोपीं पुस्तकें देऊन त्यांची साक्षरता वाढविणें व टिकविणें.

(२) गांवांत वाचनालयाची सोय करणें.

(३) मुलींना शाळेंत नियमित पाठविण्यासाठी पालकांचीं मनें वळविणें.

(४) तज्ञांचीं व्याख्यानें व करमणुकीच्या कार्यक्रमांद्वारे गांवांतील लोकांचें सामान्यज्ञान वाढविणें.

(५) व्यायाम–आखाडे व सांघिक खेळ ह्यांची आवड उत्पन्न करणें व व्यवस्था करणें.


(६) भजन मंडळें, कलापथकें, प्रचारात्मक नाटकें, पोवाडे इत्यादि साधनांचा उपयोग करणें.

(७) रेडिओची व्यवस्था व उपस्थितिपत्रक ठेवणें.

(८) गांवांतील जुगार, भांडणें व इतर सार्वजनिक उपद्रव ह्यांकडे लक्ष देणे व ते कमी करण्याचा प्रयत्न करणें.

(९) सामुदायिक वार्ताफलक तयार करणें व त्यांवर बातम्या व रोजचे कार्यक्रम लिहिणें.

## स्थापत्य वा बांधकाम–समिति



(१) गांवांत लहान–मोठ्या सडका तयार करणें व पक्क्या सडकेपासून गांवापर्यंतची सडक तयार करणें. त्यांची देखरेख व दुरुस्ती करणें.

(२) विहिरींची दुरुस्ती, नव्या विहिरींसाठी सल्ला.

(३) शाळेची इमारत, चावडी, ग्रामविकास इ. च्या इमारती ह्यांसाठी सल्ला व देखरेख.

(४) सार्वजनिक मुत्रीघरें, संडास, सोक–पिट्स वगैरेंबद्दल माहिती, रचना व देखरेख.

(५) गुरांचे गोठे बांधण्याविषयी सल्ला.

(६) नवीं घरें गांवांत बांधतांना सल्ला.

(७) दवाखाना बांधतांना सल्ला.

## ग्रामोद्योग समिति

(१) गांवांतील उद्योगधंद्यांना उत्तेजन देऊन नवें उद्योगधंदे सुरू करणें.

(२) तयार मालाची जाहिरात करणें.

(३) विक्रीसाठी गांवांत तयार झालेला माल सहकारी दुकानांत ठेवणें.

(४) प्रदर्शनें भरवून गांवांत तयार होणाऱ्या मालाला उत्तेजनार्थ बक्षीसें देणें व स्थायी स्वरूपाचें, गांवांतील मंडळाच्या कचेरींत, स्थानिक तयार मालाचें प्रदर्शन ठेवणें.

(५) सहकारी स्वरूपाचीं दुकानें स्थापून त्यांत गांवाला लागणारा माल विक्रीस ठेवणें. खतें, बीं व शेतीसाठी आवश्यक माल गांवांतच मिळण्याची सोय करणें.

(६) गांवांतील धंद्यांना शास्त्रीय स्वरूपाचें वळण देऊन व अद्यावत् सामुग्री मिळवून देऊन त्यांची वाढ करणें.

---


# आंब्याची लागवड व व्यापार

किंमत रु. २–०–०, म. ऑ. ने. रु. २–९–० पाठविल्यास पुस्तक रजिस्टर पोस्टाने पाठवूं. व्ही. पी. ने मागविल्यास रु. २–१०–० पडतील.

**प्रस्तुत पुस्तकांत**

आंब्याचीं झाडें तयार करणें, सुरुवातीची मशागत व झाडें लावणें, पाणी देण्याच्या सोयी, खतांची व्यवस्था, आम्रवृक्षांची छाटणी, निंदण. खुरपण व जोडपिकें, आंब्याचा नियमित हंगाम घेणें, आंबे तोडणें, पार्सल बांधणें व विक्री, आंब्यावरील कीड, रोग व त्यांचें निवारण करण्याचे उपाय इ. माहिती दिली आहे

**आंब्याची लागवड करूं इच्छिणाऱ्यांकरिता**

**हें पुस्तक निश्चित् मार्गदर्शक ठरेल.**

**उद्यम प्रकाशन**, धर्मपेठ, नागपूर (म. प्र.).

# २. शेती–सुधार–समितीचीं कामें

## व

# त्यासंबंधीचें मार्गदर्शन

शेती–सुधार–समितींत गांवांतील साधारण वृद्ध शेतकरी व सुशिक्षित लोक ह्यांचा समावेश असावा. वृद्ध शेतकऱ्यांचा मोलाचा अनुभव व तरुण सुशिक्षितांचें शेतकीविषयक नवीन ज्ञान ह्यांचा सुंदर समन्वय साधण्यावरच ह्या समितीच्या कार्यांतील यश अवलंबून राहील. वृद्धांनी शेतीच्या जुन्याच पद्धतींना चिकटून न राहतां नवे नवे अनुभव व नवे उपाय अमलांत आणावयाची तयारी दाखवावी. ताज्या दमाच्या सुशिक्षित लोकांनीहि वृद्धांचा अनुभव दृष्टिआड करूं नये. खेडेगांवांत शेती हा प्रमुख धंदा असून शेतकरी सुखी झाल्यासच गांव सुखी म्हणतां येईल. चांगलें खत मिळालें, तगाईवर चांगलें बीज मिळालें, पाण्याची नीट सोय झाली, सामुदायिक पद्धतीनें शेती–कामांत परस्पर साहाय्य करतां आलें, शेतांत चांगलें धान्य पिकलें, पिकाची नासाडी झाली नाही की शेतकरी सुखी झालाच म्हणून समजावयाचें. परिणामत: गांवांत सुबत्ता होईल, गांवची आर्थिक परिस्थिति सुधारेल व शेतकरी आणि खेडूत सहकार्यानें गांवची सुधारणा करून गांव आदर्श करण्यासाठी वाटेल तें ऐकतील. उलटपक्षी शेतींत नुकसान आलें, शेत पिकलें नाही तर सर्वांच्याच उत्साहावर पाणी फिरेल ही गोष्ट शे. सु. स. च्या लोकांनी लक्षांत ठेवावी. गांवची आर्थिक स्थिति सुधारून गांव आदर्श करण्याची बरीचशी जबाबदारी ह्या समितीवरच पडते. हें जाणूनच ह्या समितींतील लोकांची निवड काळजीपूर्वक व्हावयाला पाहिजे तरच कामें कळकळीनें होतील व गांव आदर्श होण्यास मुळीच वेळ लागणार नाही.

शेती हा खेडेगांवांतील लोकांचा आज कित्येक पिढ्यांचा प्रमुख धंदा आहे. शेतीचीं मूल सुत्रें कांही त्यांना नवीन नाहीत. पण नव्या नव्या गोष्टींची ओळख करून देऊन त्यांचे फायदे त्यांना समजवून सांगावयालाच पाहिजेत. आजपर्यंत आपलें कोठें चुकत आलें तें वृद्ध शेतकऱ्यांनाहि कळेल व खेड्यांतील इतर कमी समजूतदार लोकांना तें समजून सांगण्यास ह्यांची फार मदत होईल.

## खतें

खतांचें वर्गीकरण ४ प्रकारे करतां येईल--

१. **वनस्पतीजन्य खतें**--पालापाचोळा, हिरवें खत, ढेप वगैरे.

२. **प्राणिजन्य खतें**--हाडें, मलमूत्र, शेण वगैरेंपासून मिळणारें खत.

३. **खनिज खतें**--माती, नदी-तलावांतील गाळ वगैरे.

४. **रासायनिक किंवा कृत्रिम खतें**--ॲमोनियम सल्फेट, नायट्रेट वगैरे बाजारांत विकत मिळणारीं खतें.

**सेंद्रिय खतें**--ह्यांपैकी कृत्रिम खतें सोडून बाकीचीं सर्व थोड्याशा मेहनतीने गांवांतच प्राप्त होण्यासारखीं आहेत. पिढ्यानुपिढ्या आपले वाडवडील हीं खतें उपयोगांत आणीत आहेत. ह्या खतांनी जमिनीचा पोत बिघडत नाही व ती जास्त गुणकारीहि असून सहजसाध्य आहेत. त्यांचा फायदा खेडुतांनी घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे व तो फायदा खेडुतांना कसा देतां येईल ह्याकडे समितीतील लोकांचें सदैव लक्ष पाहिजे.

समजा गांवाशेजारीं बुजलेलें एखादें तळें किंवा तलाव असेल तर खेड्यांतील लोकांनी तो उपसून काढून पाण्याची व त्याबरोबरच खताचीहि सोय करून देतां येईल. ह्या दृष्टीने समितींतील लोकांनी पुढाकार घेतला पाहिजे. नदीतील गाळ शेतांत आणून टाकून त्याचेंहि खत करतां येईल.


अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नों. दि.

### प्रत्येक गांवांत सहज साध्य खतांचे प्रकार

१. बोरुच्या पिकापासून हिरवें खत.

२. नदीचा गाळ किंवा तळ्यांतील माती.

३. दलदलींत कुजविलेला पालापाचोळा.




६. गुरांच्या हाडांचें खत.

५. कचऱ्यापासून कम्पोस्ट खत.

४. गोठ्यांतील मातींत मुरलेलें मूत्र.

---

पालापाचोळा खड्ड्यांत पुरून किंवा दलदलीच्या जागीं टाकून पावसाळ्यांत तो कुजविला पाहिजे व त्यापासून खत तयार करण्यास समितींतील लोकांनी स्वतःच्या उदाहरणाने उत्तेजन दिलें पाहिजे.

गांवांतील साठलेला केरकचरा गल्लीगल्लींत कचरा–पेट्या ठेवून तो प्रथम एकत्रित करावयाचा व गांवाबाहेर एके ठिकाणी

खड्डा करून त्यांत पुरावयाचा की चार–सहा महिन्यांत त्याचें कंपोस्ट खत वापरावयाला मिळतें.

गोठ्यांतील मलमूत्र उताराच्या साह्याने पक्क्या नाल्यांतून वाहवून नालीच्या तोंडाशी ठेवलेल्या मडक्यांत साठवावें व तें खताच्या खड्ड्यावर टाकावें किंवा गोठ्यांत भुसभुशीत माती टाकून तीत जिरवावें. कांही दिवसांनी ती माती खताच्या खड्ड्यावर नेऊन टाकावी व पुन: नवीन माती गोठ्यात पसरावी. मुबलक असेल तर गोठ्यांत गवत पसरूनहि त्यावर गुरांचें मूत्र जिरवितां येईल व त्या गवतापासून खड्ड्यांत पुरून; कंपोस्ट खत बनवितां येईल.


शेणाचा उपयोग गोवऱ्यांकडे करूं न देतां त्यापासून बहुमोल सेंद्रिय खत तयार करण्याचा प्रचार करावा. वनमहोत्सवाच्या निमित्ताने बाभळीचीं वनें लावून ईंधनसरपणाची सोय केल्यास शेणाचा ईंधनासाठी उपयोग करण्याची प्रथा आपोआपच बंद होईल. गांवाशेजारीं जंगल असेल तर त्यांतील जळण शेतकऱ्यांना अत्यल्प मोबदल्यांत वापरण्यास मिळेल अशी सोय करून द्यावी. नुसतें गोवऱ्या जाळूं नका असें सांगण्यापेक्षा जळणाची सोय करून नंतर तसा प्रचार करणें अधिक सयुक्तिक व परिणामकारक ठरेल विधायक सुचनांचा लोक नेहमीच तत्परतेने स्वीकार करतात.

गांवाच्या अवतीभवती मेलेल्या जनावरांची हाडेंहि पुष्कळच मिळतात. त्यांच्यापासून हाडांचें खत करतां येण्यासारखें आहे. अशीं हाडें मुलांकडून जमवून घ्यावीं. १–२ आणे दिले तर टोपलीभर हाडें कोणीहि वेचून आणून देईल. अशीं हाडें जमवून त्यांचा एकावर एक थर द्यावा व मध्ये लाकडें रचून भट्टी पेटवावी. हाडें खूप तापलीत की तीं ठिसूळ होतात. हीं ठिसूळ झालेलीं हाडें चुन्याच्या घाणीत पिसून बारीक करावींत व खत म्हणून त्यांचा उपयोग करावा. हें खत अत्यंत उत्तम असून त्यापासून जमिनीला अनेक वर्षे फायदा होईल व जमिनीचा पोतहि सुधारेल. ग्रामोद्योग म्हणून हा

धंदा सहज करतां येण्यासारखा आहे. खत कोणीहि हौसेने विकत घेईल; मात्र सल्ला देणाऱ्या व मजुरांकडून काम करवून घेणाऱ्या अस्थेवाइक माणसांची आवश्यकता आहे. तें काम ह्या समितींतील लोकांनी करावें. ह्यासाठी भांडवलहि फार नको, स्वतःचे काम-धंदे सोडावयास नकोत; फक्त कळकळ तेवढी हवी.

समितींतील लोकांनी असे प्रयोग आपल्या शेतीवर लहान प्रमाणावर करून पहावेत व गांवकऱ्यांनाहि दाखवावेत म्हणजे ते आपोआप आपल्या शेतांत खताची व्यवस्था करतील. प्रयोगाखातर केलेल्या शेतींतच शेजारीशेजारीं हीं खतें वापरून पाहावीत म्हणजे दोहोंतील अंतर स्पष्ट दिसून येईल व प्रत्यक्ष खात्री पटल्यावर विनाकारण शंका कुशंकांना जागा राहणार नाही. खेड्यांतील शाळांना थोडी जमीन मिळवून दिल्यास फावल्या वेळेंतील उद्योग म्हणून मुलांकडूनहि शाळामास्तर हे प्रयोग करून घेऊं शकतील. त्यामुळे बालपणीं अभ्यासिलेले हे प्रयोग स्वभावतः पुढील पिढ्यांच्या अंगवळणी पडून जातील व गांवांतील लोकांनाहि चांगलें ज्ञान लाभेल. मुलें अत्यंत उत्साही असतात; त्याचा उत्साह सत्कारणीं लावणारा मार्गदर्शक मात्र पाहिजे. प्रत्येक वर्गातील एका गटाकडे प्रत्येक प्रकारचें खत तयार करण्याचें काम देऊन लहान लहान प्लॉट्समध्ये प्रयोगादाखल निरनिराळीं पिकें घ्यावीत. १–२ प्लॉट्स खताशिवाय किंवा गांवांतील ठराविक पद्धतीनुसार पेरावेत म्हणजे खताचा फायदा किती होतो तें प्रत्यक्षपणेच कळून येईल. हा प्रयोग मोठा गमतीचा, बोधप्रद व खेडुतांच्या विचारांना चालना देणारा होईल ह्यांत शंका नाही. नुसता प्रचार व प्रयोगसिद्ध ज्ञानांत पुष्कळच फरक पडतो हें ह्या उदाहरणावरून समजून येईल.

**कृत्रिम खतें**—हीं खतें शेतकीखात्याच्या सल्ल्याने वापरावी. शेतकी–समितीच्या सभासदांनी ह्या बाबतीत पुढाकार घेऊन शेतकी-



खात्याच्या अधिकाऱ्यांचें साहाय्य गांवांतील शेतकऱ्यांना मिळवून द्यावें. शक्यतों खतें खरेदी करण्यापूर्वीं एखादी आम सभा घेऊन ह्या खतांच्या उपयुक्ततेसंबंधी चर्चा करावी. शेतीखात्याच्या अधिकाऱ्यानाहि ह्या सभेला बोलवावे व त्यांच्याकडून व्याख्यान किंवा चर्चेद्वारे शेतकऱ्यांची,हीं खते फायदेशीर असल्याबद्दल खात्री करून द्यावी. वेळीं त्यांचा सल्लाहि घ्यावा. हें खत तकावीवर मिळविण्याचा प्रयत्न करावा किंवा गांवच्या सहकारी दुकानांतून विकत घेतल्यास खतावरील फायदा गांवांतील सहकारी दुकानासच मिळेल. ह्याकरिता ग्रामविकास मंडळाच्या निरनिराळ्या शाखांतून सहकार्य असणें कसें आवश्यक आहे हें ह्यावरून सहज ध्यानांत येईल. कृत्रिम खत किती द्यावयाचें व कसें द्यावयाचें वगैरे गोष्टी, पिकें, जमीन, पाणी–पुरवठा आदि गोष्टींवर अवलंबून असतें व शेतकीखात्याचे अधिकारी ह्या बाबतीत योग्य तें मार्गदर्शनहि करतात. निरनिराळ्या जागीं तें प्रमाण भिन्नभिन्न राहील. शेती–सुधार–समितीच्या वतीने ॲग्रिकल्चर असिस्टंटला बोलावणें गेलें तर हातचीं १०० कामें सोडून ते आनंदाने खेडुतांना सल्ला देण्यास धावत येतील. सरकारी नोकरांतहि आता बरेंच परिवर्तन झालें आहे. माझा देश ही भावना खेडुतांइतकीच किंबहुना ते सुशिक्षित असल्यामुळे खेडुतांपेक्षा काकणभर जास्तच सरकारी नोकरांतहि रुजावयाला लागली आहे. त्याचा उपयोग करून घेणारा मात्र पाहिजे. कित्येकदां तर त्यांच्या काम करण्याच्या उत्साहावर पाणी फिरण्याचीच पाळी येते. तेव्हां सरकारी नोकरांच्या ज्ञानाचा पुरेपूर फायदा घेण्यास खेडुतांनी शिकलें पाहिजे. तो त्यांचा हक्क आहे. संघटित समित्यांच्या हांकेकडे लक्ष द्यावयास सरकारी नोकरांना केव्हांहि आनंदच होईल.

**कंपोस्ट खत**--समितीच्या सभासदांनी शेतकऱ्यांना कंपोस्ट खताचें महत्त्व पटवून देऊन गांवाबाहेर एका ओळींत आपापले खड्डे तयार करून घेण्यास सांगावें व वेळोवेळीं त्यांना मार्गदर्शन करीत जावें. खताच्या खड्ड्यावर मालकाचें नांव, गुरांची संख्या व जमीन किती हें लिहून पाटी लावावी म्हणजे आकडे-शास्त्रज्ञांना त्याचा उपयोग होईल. खताचे खड्डे एका ओळींत असल्याने शिस्तीची संवयहि लागेल व दिसावयालाहि चांगलें दिसेल.


## जमिनीची मशागत

जमिनीची मशागत सर्वच करतात; त्यांत मार्गदर्शन करण्यासारखें काय आहे असें वाटण्याचा संभव आहे. पण याहि बाबतींत शेती-सुधार-समितीने पुष्कळच मार्गदर्शन करण्यासारखें आहे. शेत नांगरावयास हवें हें पटतें; पण सर्वांनाच तें शक्य होत नाही. अशा वेळीं एखाद्या गरीब शेतकऱ्याचें छोटेसें शेत सर्व गांवकऱ्यांच्या मदतीने नांगरून देणें शक्य होईल काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. गांव म्हणजे एक कुटुंब ही भावना एकदा दृढमूल झाली म्हणजे तें अशक्य कां असावें? "एकमेका साह्य करूं" अशी आपली वृत्ति नको का व्हावयाला? त्याबद्दल तो गरीब शेतकरी दुसऱ्या शेजाऱ्याच्या शेतांत मेहनत करावयास सहज तयार होऊं शकेल. ज्याप्रमाणे सरकार तगाई देते त्याप्रमाणे गांवांतील नांगर व जोडी आळीपाळीने घेऊन ह्या शेतकी-समितीला गरीब शेतकऱ्यांचीं शेतें नांगरून देतां येण्यासाठी एखादी योजनाहि सहज आंखता येण्यासारखी आहे. ह्या शेती-सुधार-समितीच्या सभासदांच्या सल्ल्याने दर एकरी भाव ठरवून टाकतां येईल व गांवांतील जोड्यांकडून किंवा ट्रॅक्टर भाड्याने आणून गांवांतील गरीब शेतकऱ्यांची जमीन नांगरून देतां येईल. पीक आल्यावर तगाईप्रमाणे त्याची किंमत वसूल करावी म्हणजे झालें. संघटित स्वरूपाची मागणी करून सरकारकडूनहि कांही मदत मिळवितां आल्यास प्रयत्न करून पाहावेत. गांवांतील जमीन मग ती कोणतीहि असो नांगरतां आली तर पीक

जास्त येऊन आपल्या गांवांत जास्त सुबत्ता झाली तर कोणाला नको आहे ही भावना नेहमी शेती–समितीच्या सभासदांनी प्रत्येकाच्या अंगवळणीं पाडावी.

जमीन नांगरतांनाच पावसाच्या पाण्याने जमीन धुवून जाऊं नये म्हणून शेताच्या बांधावर थोडी माती फावड्याने लोटून जरासा उंचवटा करावा म्हणजे शेताची धूप थांबण्यास अंशतः तरी मदत होईल. जास्तच उतार असेल तर एवढ्याने भागणार नाही, बांध वगैरे घालण्याची आवश्यकता राहीलच. भाताच्या शेतींत तर जमीन समपातळीत करण्याचीहि अत्यंत आवश्यकता असते, त्यामुळे शेतांतील सर्व भागांत पाणी सारखें जमून राहण्यास मदत होतें.

**कुंदा काढणें**––यासाठी वरीलप्रमाणेच सहकारी तत्वावर गांवांतील लोकांनी प्रयत्न करावेत. तगाईच्या स्वरूपांत ह्या कामासाठी मदत मिळूं शकण्यासारखी आहे. प्रत्येकाने स्वतंत्रपणे प्रयत्न करण्यापेक्षा गांवकऱ्यांनी संघटित प्रयत्न केले तर काम लौकर व कमी खर्चात होईल. शेती–सुधार–समितीने आपल्या कामांत ह्याचाहि समावेश करावा.



शेताच्या बांधावर उताराच्या बाजूस झाडें लावण्याने जमिनीची धूप थांबूं शकते.

**जमिनीची धूप थांबविण्याचे उपाय**


ह्या बाबतींत शेती खात्यांतील तज्ञांचा सल्ला घ्यावा, शेतकी तज्ञाला एक दिवस गांवीं बोलवून सर्व जमिनींची पाहणी करवून त्याचा सल्ला मिळवावा आणि त्याप्रमाणे सभासदांनी मार्गदर्शन करीत जावें. बांध घालणें, बांधावर झाडें लावणें, बाजूने नाली काढून देणें वगैरे

उपायांनी जमिनीची धूप थांबू शकते. बांधावर झाडें लावल्याने झाडांचीं मुळें लांब पसरून जमीन धरून ठेवतात व धूप थांबवितात. झाडें फार मोठी व शेतावर सावली आणणारीं नसावींत. शक्य तर त्यांचा कुंपणाकडे किंवा अन्य कांही उपयोगहि व्हावा.


### नवीन जमीन लागवडीखाली आणणें

अशा जमिनी वर सांगितल्याप्रमाणे शाळेस लावून द्याव्या वा त्या निरनिराळ्या प्रयोगांसाठी उपयोगांत आणाव्यात. मुलांना तेथे प्रत्यक्ष शिक्षण मिळावें, गांवकऱ्यांना प्रत्यक्ष ज्ञान मिळावें व खर्च वजा जातां उरलेलें उत्पन्न शाळेला द्यावें. पडीत जमिनीपासून असा तिहेरी फायदा मिळवितां येण्यासारखा आहे; मात्र तें काम कळकळीने व निःस्वार्थीपणाने करणारे सभासद शेती–सुधार–समितींत असावया पाहिजेत. प्रत्यक्ष शेतावरच मुलांना त्यासंबंधीचें ज्ञान देण्यास हरकत नाही. २ अधिक २ बरोबर ४ असें वर्गांत हाताने मोजून

रोपें मोजून बेरीज–वजाबाकी.




रोपांच्या ओळीने गुणाकार पाढे.





वजने–मापेः– प्रत्यक्ष धान्य मोजण्याचें शिक्षण.



जमिनीचें क्षेत्रफळ मोजण्याचें शिक्षण.

शिकविण्यापेक्षा हीं दोनरोपें व हीं दोन रोपें मिळून चार रोपें झालीत. अशी शिक्षणाची पद्धति शेतकऱ्यांच्या मुलांना अधिक उपयोगी होईल. जमिनीच्या क्षेत्रफळाचीं गणितें, बेरजा, वजावाक्या व गुणाकार वगैरे अनेक गोष्टी अशा प्रत्यक्ष पद्धतीने शिकविण्याने मुलांना चांगल्या समजतील व त्यांना प्रत्यक्ष व्यावहारिक ज्ञान मिळेल. वजनें व मापें ह्यांचीं कोष्टकें घोकीत बसण्यापेक्षा ४ पायली किंवा २ कुडव ज्वारी शेतावर मोजावयास लावली अगर ४ मण कापूस तोलावयास लावून त्याची किंमत काढावयास सांगितली तर अधिक व्यावहारिक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळेल. असें ज्ञान पडीत जमिनी शाळेकडे सोपवून मिळवितां येण्यासारखें आहे. गांवकरी औजारें पुरवूं शकतील व सरकारी मदत व मार्गदर्शनहि मिळवितां येईल.

---


# आंब्याची लागवड व व्यापार

किंमत रु. २–०–०, म. ऑ. ने. रु. २–९–० पाठविल्यास पुस्तक रजिस्टर पोस्टाने पाठवूं. व्ही. पी. ने मागविल्यास रु. २–१०–० पडतील.

**प्रस्तुत पुस्तकांत**


आंब्याचीं झाडें तयार करणें, सुरुवातीची मशागत व झाडें लावणें, पाणी देण्याच्या सोयी, खतांची व्यवस्था, आम्रवृक्षांची छाटणी, निंदण. खुरपण व जोडपिकें, आंब्याचा नियमित हंगाम घेणें, आंबे तोडणें, पार्सल बांधणें व विक्री, आंब्यावरील कीड, रोग व त्यांचें निवारण करण्याचे उपाय इ. माहिती दिली आहे

**आंब्याची लागवड करूं इच्छिणाऱ्यांकरिता हें पुस्तक निश्चित् मार्गदर्शक ठरेल.**

**उद्यम प्रकाशन, धर्मपेठ, नागपूर (म. प्र.).**

## प्रकरण ४ थें

# पाणी–पुरवठा व इतर प्रश्न



१. नवीन तलाव खोदणें व जुने खोल करणें. २. नदीला बांध घालून पाण्याची पातळी वाढविणें. ३. नवीन विहीर खोदणें व जुन्या खोल व दुरुस्त करणें. ४. नदीच्या पात्रांत खड्डा करून त्यांचा विहीरींसारखा उपयोग करणें. ५. पाण्यासाठी एंजिन व त्यासोबत पिठाची गिरणी चालविणें.

---

शेतीसाठी पाणी पुरविण्याचा प्रश्न खेडुतांना नेहमीच एक चिंतेचा विषय असतो. आजकाल तर पाऊस देखील पूर्वीसारखा नियमीतपणे पडत नाही. मर मर मेहनत करावी व शेवटी पावसा-

साठी आकाशाकडे डोळे लावून वसावें. पर्जन्यदेवाने कृपा केली तर बरें; नाहीतर पाऊस न पडल्यामुळे सारी मेहनत वाया जावयाची व अन्नान्नदशा व्हावयाची असें शेतकऱ्याचें जिणें केविलवाणें होऊन बसलें आहे. देशांत सर्वत्रच ही परिस्थिति थोड्या कमी–जास्त प्रमाणांत दिसून येते. ह्यावर उपाय म्हणून सरकार नवीं नवीं धरणें बांधीत आहे व नव्या नव्या योजनाहि आखीत आहे. आपलें सरकार अजून बाल्यावस्थेंत आहे व प्रयत्नाची शिकस्त करीत आहे. ते सर्व पूर्णावस्थेला पोहोंचेपर्यंत थोडा वेळ लागणारच. तोंपर्यंत गांवांतल्या गांवांत उपलब्ध साधनांद्वारे काय करतां येण्यासारखें आहे ह्याबद्दल शेती–सुधार–समितीच्या सभासदांनी मार्गदर्शन करणें ओघानेच येतें.

गांवाशेजारी खोलगट भागांत गांवकऱ्यांनी एखादा तलाव खोदणें वा मुळचे तलाव खोल करणें (१) इ. चा ह्यांत समावेश होईल. अशा कार्यासाठी चांदण्या रात्रीं किंवा सुटीच्या दिवशीं गांवांतील सर्व लोकांनी एकत्रित येऊन श्रमदान केल्यास हें सहज घडवून आणतां येईल. जुन्या तलावांतील गाळ खत म्हणून शेतांत वापरतां येऊन वैयक्तिक फायदाहि साधतां येईल. श्रमदानाची वेळ सर्वांना सोयीची असावी. हांकेसरशी सारें गांव गोळा होईल इतकी लोकप्रियता निरनिराळ्या समितीच्या सभासदांनी कमाविली पाहिजे.

नदी असलेल्या ठिकाणीं तज्ज्ञांच्या सल्ल्याने बांध बांधून (२) नदीच्या पाण्याची पातळी वाढवितां येईल व कालवे काढून आजूबाजूच्या शेतांत पाणी खेळवितां येईल. कांही पिकें एकाच पाण्याने बुडतात. अशा वेळीं नदीच्या अडविलेल्या किंवा तलावाच्या पाण्याचा हलवितां येण्यासारख्या (Portable) पंपाच्या साह्याने उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे. हे पंप गांवकऱ्यांनी सहकारी पद्धतीने विकत घ्यावेत. गाड्यांतून ते पाहिजे तेथें नेतां येण्यासारखे असतात व एका पाण्याच्या अभावी संपूर्ण पीक जाण्यापेक्षा' थोड्या खर्चात फायदेशीर पडतात. शेवटी शेवटी एक–दोन पाणी देतां आले तर कपाशीचें उत्पन्न पुष्कळच वाढतें असें आता सिद्ध झालें आहे. त्यासाठी

सहकारी तत्वावर असे पंप भाड्याने देऊन प्रत्येक गांवांतील शेती सुधारतां येण्यासारखी आहे. नव्या व जुन्या विहिरीच्या दुरुस्तीसाठी (३) सरकार तगाई देते; खेडुतांनी त्याचा फायदा घेण्यासाठी शे. सु. स. च्या सभासदांनी प्रचार करावा. ही तगाई विहिरींसाठीच उपयोगांत आणली जावी ह्यावरहि शे. सु. स. च्या सभासदांनी आस्थेने लक्ष ठेवावें. नव्या विहिरींची दुरुस्ती, तलाव किंवा नदीचें अडविलेलें पाणी इ. द्वारे पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा शिकस्तीने प्रयत्न करावा. नदीच्या कांठावर शेतें असणाऱ्यांनी नदीत खोलसा खड्डा खणून (४) त्याचा विहिरीप्रमाणे उपयोग करावा व पंपाने किंवा मोटेने शेतांस पाणी द्यावें. ही सोय अगदी कमी खर्चात करून घेतां येतें व उन्हाळ्यांतहि बागायतीसाठी त्या पाण्याचा उपयोग करतां येतो.

गांवाला लागूनच असलेल्या शेतांवरील एकाच एंजिनवर पाण्याचा पंप व दळणाची चक्की चालवितां येण्यासारखी आहे. दळण्याच्या चक्कींतून मिळणारा पैसा तेलावर खर्च करून पाणी विनामूल्य पाडतां येतें. गांवांतील सार्वजनिक विहिरींवर अशी सोय करतां आली तर नागरिकांच्या उपयोगाकरिता पिठाची गिरणी व सार्वजनिक हौदावरील पाण्याची सोयहि करतां येणें शक्य आहे. ४–५ जणांनी मिळून ग्रामोद्योग म्हणून सहकारी तत्वावर ही गिरणी चालवावी व एंजिन चालू असतांनाच गांवांच्या सार्वजनिक विहिरीवरील हौदांत पाणी भरून घ्यावें. हें पाणी स्वच्छ ठेवावें व गुरांना पिण्यासाठी उपयोगांत आणावें. त्यांत नेहमी लाल औषध (पोटॅशियम परमँगनेट) टाकीत जावें. गांवाशेजारी नदी असेल तर नदीचेंच वाहतें पाणी शक्यतोवर गुरांना पाजावें.

शेतांतून सोडलेली पाण्याची नाली शक्य तर पक्की (सिमेंटची) असावी किंवा साधीच असेल तर तीवर वेळोवेळीं लक्ष ठेवून पाणी वाया जाणार नाही ह्याची खबरदारी घ्यावी. अशा नाल्यांतून खेकडे बिळें करतात व ह्या बिळांतून पाणी गेल्याने पुष्कळसें पाणी वाया जातें. ह्याकरिता वारंवार लक्ष ठेवून खेकडे पकडावें व त्यांची बिळें बंद करीत राहावें. पक्की नाली करण्यास एकदा पैसे लागतील हें खरें;

पण त्यामुळे वाया जाणारें पाणी वांचून शेवटी फायदाच होईल. शेती-सुधार-समितीने ह्या गोष्टी खेडुतांच्या मनावर बिंबवाव्यात.

## शुद्ध बियाण्यांचा पुरवठा

शेतकऱ्यांना शुद्ध व सुधारलेल्या जातींचें बीं पुरविलें जाण्यावर शे. सु. स. च्या सभासदाचें लक्ष असावें. शेती खात्याच्या अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार गांवांतील सहकारी संस्थेंत चांगल्या शुद्ध जातीचें बीं विक्रीसाठी आणून ठेवावें. हेंच बीं शे. सु. स. ने तगाईवर शेतकऱ्यांना द्यावें. सरकारकडूनहि बीं तगाईवर मिळूं शकतें, हें बीं सुद्धा पेरण्यापूर्वी नीट निवडून घेऊन व रोगप्रतिबंधक औषधांत घोळून मगच पेरावें म्हणजे पुढे पिकास कीड वगैरे लागत नाही. एकदा चांगलें बीं मिळाल्यावर प्रत्येक वर्षी सरकारवर अवलंबून राहण्याचा प्रसंग येऊं नये. शेतांत हिंडून निकृष्ट जातीचीं रोपें उपटून फेकावींत म्हणजे भेसळीचा प्रश्न उरणार नाही व उत्कृष्ट बियाणें हातीं लागेल. ज्वारीच्या शेतांत अगदी मध्यावर मोठीं कणसें असतात; तीं अलग तोडून बियाण्यांसाठी जपून ठेवावींत. मध्यावरील कणसांतील बीं पूर्णतः शुद्ध राहतें. बीं पेरतांना तें चांगलें चाळून, निवडून व पाखडून घ्यावें. त्यासाठीं थोडी जास्त मेहनत घ्यावी लागली तरी अन्तीं तें लाभदायकच ठरतें.

## पिकांचें संरक्षण

शेतकऱ्यांच्या मनाप्रमाणे पाऊस पडून शेवटी चांगलें पीक शेतांत आलें तरी तें घरांत येऊन पडेपर्यंत शेतकऱ्याला काळजीच असते. रोग, कीड, गुरें, पक्षी, उंदीर, घुशी, चोर इ. सर्वांपासून शेतकऱ्यांना पिकांचें संरक्षण करावें लागतें. गांवांतील सर्व लोकांनी मिळून संघटीत प्रयत्न केल्यास ह्यांवरील खर्च कमी येऊन सर्व गांवाचा फायदा होतो. शे. सु. स. च्या सभासदांनी ह्या कामीं सक्रीय पुढाकार घेतला पाहिजे.

**रोग**--निरनिराळ्या रोगांचें शेती खात्यातर्फे नेहमी संशोधन चालूं असतें. आता तर ह्या रोगांवर खात्रीचे प्रतिबंधक व निवारक

उपायहि सापडले आहेत; त्याविषयींचें पत्रक पुढे दिलेलें आहेच. त्याची माहिती शे. सु. स. च्या सभासदांनी सामान्य खेडुतांना करून द्यावी. पेरावयाचें बीं नीट व उन्हांत चांगलें कडक तापवून म्हणजे त्यांतील सूक्ष्म कीटक मरतात व पुढे पिकांना रोग होत नाहीत. सरकी, ज्वारी, गहूं वगैरे पेरतांना रोगप्रतिबंधक इलाज म्हणून रासायनिक औषधाचा त्या त्या वियाण्यावर उपचार करण्याचा दंडक घालून द्यावा. बियांत औषधाची पूड मिसळण्याचा एक ड्रम विकत मिळतो; तो सर्व शेतकऱ्यांनी मिळून खरेदी करून सर्वांना अगदी मामुली किमतींत वापरण्यास द्यावा. गंधक, कॉपर-कार्बोनेट किंवा अग्रेसनची पूड पुढील कोष्टकांत दिल्याप्रमाणे वियाण्यांत मिसळून तो ड्रम फिरवावा म्हणजे औषध सर्व वियाण्याला लागतें. ड्रमच्या अभावीं एका बंद भांड्यांत रासायनिक औषध व वीं मिसळून तें हलविलें असतांहि काम भागतें. रासायनिक संस्कार केलेलेंच बीं पेरलें जाईल ह्यावर शे. सु. स. च्या लोकांनी लक्ष ठेवावें. वीं पेरल्यावर फुरसतीच्या वेळीं शे. सु. स. च्या सभासदांनी शेतांत हिंडून पिकाची पाहणी करावी व शेतकऱ्यांसहि पिकावर लक्ष ठेवून कांही रोग झाल्यास ताबडतोब कळविण्यास सांगावें म्हणजे त्यावर तावडतोब इलाज करतां येईल व माणसांच्या किंवा गुरांच्या रोगा-प्रमाणे रोग पसरणार नाही. त्यासाठी लागणारीं औषधें व साधनें, अवजारें, पावडर उडविणारे फवाऱ्याचे ड्रम किंवा हात-पिचकारी व द्रावण उडविणारे पंप गांवांत वर्गणी करून आणून ठेवावें व अगदी अत्यल्प मोबदल्यांत गांवकऱ्यांना वापरण्यास द्यावें. ह्या योजनेंत ह्या अवजारांची किंमत निघून जाईल व तीं गांवांत नेहमी-साठी उपयोगी पडतील. नेहमी लागणारीं औषधें गांवांतील विकास-दुकानांत ठेवावींत व तीं आवश्यकतेनुसार लोकांनी खरेदी करून शेतांत उडवावीं. त्याचें प्रात्यक्षिक मात्र शेतकी सु. स. च्या लोकांनी पुढाकार घेऊन अज्ञ खेडुतांना करून दाखवावें व गांवांची धान्य-दौलत वाढविण्याची शिकस्त करावी. पीक-संरक्षणाचें कोष्टक खालीलप्रमाणे आहे--

## निरनिराळ्या पिकांवरील रोगांवर प्रतिबंधक इलाज

| पीक | महिना | रोग | लक्षणें | औषधें व उपचार | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १. कपाशी | जून–जुलै | मर रोग | रोप उगवल्यानंतर ३ आठवड्यांत झाड मरतें. | बीं पेरतांनाच<br>१. गंधक<br>२. कॉपर कार्बोनेट<br>३. अग्रेसन जी. एन्. मिसळून पेरावें. | ह्यांपैकी कोणत्याहि २४ पौंड बीयांत २ तोळे. |
| २. ज्वारी | ,, ,, | कान्ही रोग | | वरीलप्रमाणेच. | ,, ,, |
| ३. गहूं | नोव्हेंबर | मर रोग | मुळ्या खाल्ल्यामुळे झाड पिवळें होऊन मरतें. | ,, ,, | ,, ,, |
| ४. कपाशी | ऑगस्ट | गेरवा, चिकटा, कोकडा | पानांतील रस शोषण केला गेल्यामुळे पानें चुरमडलीं जातात. | बी. एच्. सी. ५% किंवा डी. डी. टी. ५% पिचकारीने उडवावें. | एकरीं २० पौंड |

| पीक | महिना | रोग | लक्षणें | औषधें व उपचार | प्रमाण |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| ५. ,, | | गुलाबी अळी | कळी, फूल व बोंड पोखरतें. त्यामुळे कापूस खराब होतो व कमी येतो. | बीं पेरावयाच्या आधी उन्हांत सरकी ३–४ दिवस चांगली वाळवावी म्हणजे अळी मरून जाईल. | |
| ६. ज्वारी | नोव्हेंबर | मूर : लेण्डरा | कोवळीं पानें खाऊन ताटें, धांडें, पोखरलीं जातात. | बी. एच्. सी. ५% पिचकारीने उडवावें. | एकरीं १५ ते २० पौंड |
| ७. ,, | सप्टेंबर | टारफुला | मुळांतील अन्नरस शोषला गेल्या-मुळे पीक फारच कमी येतें. | फरनोक्झोन द्रावण ज्वारी १–२ महिन्याची असतांना पंपान उडवावें. | १ तोळा १ गॅलन पाण्यांत |

**पक्षी**--पिकांचें पक्षांपासून संरक्षण करावयासाठी थोड्या थोड्या अंतरावर डबे ठेवून ते आळीपाळीने वाजवीत गेल्यास पिकांवर पक्षी जोर करणार नाहीत. मधून मधून बंदुकीचे बायबार काढले तरी पक्षांना भय वाटेल. एकटें व दूर शेत असेल तर मात्र राखण शेतकऱ्यांनी स्वतःच करावयास पाहिजे.

**उंदीर व घुशी**--शेतांतील बिळांत उंदीर व घुशी घरें करून राहतात व शेताचें फारच नुकसान करतात. त्यांचा नाश करण्यासाठी शेतकी सु. स. च्या लोकांनी १ तोळा झिंक फॉस्फेट १ पाव आटचांत (कसलेंहि पीठ चालेल) मिसळून त्याच्या गोळ्या बिळांजवळ टाकून ठेवाव्यात. हें औषध विषारी असल्याचें ध्यानांत ठेवून योग्य ती खबरदारी घ्यावी. उंदीर व घुशी ह्या विषारी गोळ्यांनी मरतात व शेतांनाहि अनायासेच सेंद्रिय खत मिळतें. ह्यासंबंधीचें प्रात्यक्षिक शे. सु. स. च्या लोकांनी प्रत्यक्ष करून दाखवावें व सल्लाहि द्यावा. आपापल्या शेतांत लागणाऱ्या औषधाचा खर्च शेतकऱ्यांनी द्यावा. उंदीर मारण्यावर आणखी एक उपाय आहे; पण तो थोडा त्रासाचा आहे. तो शे. सु. स. च्या सभासदांनी प्रथम करून पाहावा. गांवांत मोटार किंवा ट्रॅक्टर असेल तर त्याच्या धूर सोडण्याच्या नळीला पाण्याची एक मोठी नळी लावून त्या नळीचें टोंक बिळांत सोडावें व एंजिन सुरू करावें. हा धूर विषारी असतो; बिळांचीं सर्व छिद्रें बंद करावींत. त्या विषारी धुराने उंदीर व घुशी बिळांतल्या बिळांतच मरून जातील व खोलवर उत्तम खत मिळेल. हा प्रयोग करण्यापूर्वी शेतकऱ्यांनी आपल्या शेतांतील बिळें शोधून त्यांवर झेंड्या लावून ठेवाव्या म्हणजे ऐन वेळीं बिळें शोधण्यांत वेळ जाणार नाही.

**गुरें व रानटी जनावरें**--चांगलें कुंपण घालून गुरांपासून रक्षण होऊं शकेल हें खरें; पण गांवकऱ्यांनी समंजसपणा दाखवून आपलीं गुरेंच जर मोकाट सोडलीं नाहीत तर पाळीव गुरांपासून पिकाला मुळांत त्रासच होणार नाही. मोकाट जनावरांवर लक्ष ठेवून मोकाट गुरांच्या मालकांना समज द्यावी. एवढ्यावरहि कांही गुरें चुकून

आलींच तर त्यांना मारझोड न करतां कोंडवाड्यांत घालावें. मुक्या जनावरांना मारून कांहीच फायदा नसतो. विनाकारण आपसांत वैर मात्र वाढतें.

**रानटी जनावरें व रोग**--ह्यांपासून पिकांचें रक्षण करण्यासाठी गांवकऱ्यांनी खालीलप्रमाणे संघटीत प्रयत्न करावेत व शे. मु. स.च्या सभासदांनी पुढाकार घेऊन ते यशस्वी करून दाखवावेत--

शेताशेतांतून राखण ठेवल्यास फारच खर्चाचें होतें. त्यासाठी गांवांच्या चारहि दिशांना, एकमेकाची हांक ऐकूं जाईल एवढ्या अंतरावर, राखणदार नेमावें. साधारण मोठ्या गांवांत सर्व दिशांना थोड्या थोड्या अंतरावर राखणदार ठेवल्यास ६ ते ८ राखणदार पुरे होतात. त्यांना त्यांची प्रत्येकाची सीमा ठरवून द्यावी व रात्रभर हिंडून जागल करावयास सांगावी. रात्रभर न झोंपतां त्यांनी हिंडलेंच पाहिजे असा त्यांच्यावर दंडक असावा. त्यांच्यापैकी कोणी झोपलेला सांपडल्यास त्याला प्रत्येक वेळीं १ रुपया दंड ठेवावा. नंतर गांवकऱ्यांच्या संमतीने विकास मंडळाचे सभासद व इतर कोणत्याहि समितीचे सभासद ह्यांना असा अधिकार देण्यांत यावा की त्यांच्यापैकी जो कोणी राखणदारांस झोपलेला पकडून देईल त्याचेतर्फे तो ज्या समितीचा सभासद असेल त्या समितीला दंडापैकी ८ आणे व ८ आणे शे. मु. स. ला देणगी म्हणून देण्यांत यावें. ह्याची स्पष्ट नोंद विकास मंडळाच्या ऑफिसांत लावली जाईल आणि गांवांच्या कामांत मदत केल्याचें श्रेयहि त्याला मिळू शकेल. ह्या योजनेमुळे रोज आपल्या सोयीप्रमाणे कोणी ना कोणी राखणदाराच्या पाळतीवर राहील व त्या धाकाने राखणदार आपल्या कामांत कसूर होऊं देणार नाही. राखणदारावर पाळत ठेवण्याचें काम मुख्यत: शे. मु. स. च्या लोकांचें आहे हें विसरून चालणार नाही. राखणदाराचा पगार आपापल्या शेताच्या क्षेत्रानुसार गांवकऱ्यांनी वाटून घ्यावा. गांवांत बंदुका असतील तर रानडुकरांची शिकार करावयास प्रोत्साहन द्यावें व शिकार करणाऱ्यांस बक्षीसें द्यावीत. उंदीर-घुशी मारण्याचें औषध मोहाच्या बियांत मिसळून

डुकरांच्या मार्गावर काळजीपूर्वक ठेवून दिल्यास तें औषध खाल्ल्याने डुकरेंहि मरतील. परंतु तें औषध विषारी असल्यामुळे पाळीव गुरांच्या किंवा माणसांच्या तोंडीं लागणार नाही अशी खबरदारी घ्यावयास पाहिजे. त्यासाठी तें एका विवक्षित जागीं टोपलींत ठेवावें व सकाळीं लगेच ती टोपली उचलून बाजूला करावी.

## शेती–उत्पादन स्पर्धा

ह्या दृष्टीने सरकारी शेती खात्यातर्फे नव्या नव्या स्पर्धा जाहीर होत आहेत; त्यांत खेडुतांना भाग घेण्यास प्रोत्साहन द्यावें व साह्यहि करावें. गांवांत कृषिपंडित निर्माण झाले तर तेथील शे. सु. स. ला भूषणच नव्हे काय? शक्य झाल्यास गांवांतच तशी स्पर्धा लावावी व शेती खात्याच्या ऑफीसरच्या हस्तें बक्षीसें द्यावींत म्हणजे शेती सु. स. च्या कार्यकर्त्यांनाहि ह्या स्पर्धेत भाग घेतां येईल व तिऱ्हाईत तज्ञांकडून न्याय झाल्याने गांवांत असंतोष किंवा भांडणें वाढणार नाहीत. जाहीर स्पर्धा केल्यानंतर तींत भाग घेणाऱ्यांची नांवें नोंदून घ्यावींत व स्पर्धकांना योग्य तें सर्व साहाय्य करावें.

## प्रचार व व्याख्यानें

सरकारी तज्ञांचीं व्याख्यानें गांवांत शे. सु. स. च्या सभासदांनी नेहमी घडवून आणावीं व गांवकऱ्यांना शेतीसंबंधी सदैव मार्गदर्शन करीत असावें. शक्य तर शेतीखात्याचे अधिकारी पावसाळ्याच्या सुरुवातीला मुद्दाम बोलावून त्यांच्याकडून सल्ला घ्यावा. शेजारच्या गांवी एखादा चांगला शेतकरी असेल तर त्याच्या अनुभवांचाहि फायदा घ्यावा. अशा वेळीं शास्त्रीय सत्य न डावलतां शेतकऱ्यांचा गैरसमज होईल असें कांही करूं नये. शेती-खात्यातर्फे 'मॅजिक लँटर्न' किंवा फिल्मच्या द्वारे जर खेडुतांना मार्गदर्शन करतां आलें तर तसाहि प्रयत्न अवश्य करावा. उन्हाळ्यात असे कार्यक्रम जास्त ठेवावें. तेव्हां वेळहि असतो व उघड्यावर थंड हवेंत लोकांना मोकळ्यावर अधिक उत्साह वाटतो. मनोरंजन म. तर्फे मुलांचे संवाद वगैरेद्वाराहि शेतकऱ्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा.

क्र. क्र....५३३६
वि. ....७१.९५

## प्रकरण ५ वें

# पशु-सुधार समितीचीं कामें व त्यासंबंधीचें मार्गदर्शन

### पशुसुधारणेचीं मूलतत्वें

पशु-सुधार समितीच्या कामांचा उल्लेख पूर्वी आलेला आहेच. हीं कामें करतांना ह्यासंबंधीची भूमिका ह्या समितीच्या सदस्यांना नीट समजावून द्यावयाला पाहिजे. गांवांतील शेती जितकी महत्वाची तितकीच शेती करण्याला लागणारें पशुधनहि महत्वाचें समजावयाला हवें. ट्रॅक्टर आणून शेती करणाऱ्यांची संख्या केव्हांहि कमीच असणार; कारण तें सर्वांना परवडण्यासारखें नाही. शिवाय दूधदुभतें, खताकरिता शेण-मूत्र ह्या दृष्टींनीहि जनावरें हवींतच. तेव्हा तीं जास्त दूध देणारीं व शेतीसाठी अधिक चांगले बैल निर्माण करणारीं असावींत. पशुधनासंबंधीची भूमिका एवढी स्पष्टपणे ध्यानांत घेऊनच ह्या समितीच्या सभासदांनी कामें करावयास हवींत. पशुंची सुधारणा— (१) त्यांची शास्त्रीय पैदास (२) चारा-दाण्याची आदर्श व्यवस्था आणि (३) संसर्गजन्य रोगांपासून त्यांचा बचाव ह्या तीन गोष्टींवर अवलंबून असते. तेव्हा समितीच्या सभासदांचें लक्ष त्यांवर केंद्रिभूत व्हावयास पाहिजे; तरच पशुंची सुधारणा होईल.

### जातिवंत सांड

जनावरांच्या शास्त्रीय पैदाशीसाठी जातिवंत सांडांची आवश्यकता असते. जातिवंत सांडांपासून जातिवंत, उत्तम व सशक्त गुरें निपजतील ह्यांत संशय नाही. त्यासाठी गांवांत चांगल्या जातिवंत सांडांची सोय केली पाहिजे. सरकारी व्हेटरीनरी खात्याकडून जातिवंत सांड मिळूं शकतो; त्यासाठी ७-८ गांवांचा एक गट

केल्यास त्यांतील प्रत्येक गांवी सांड दिले जातात. तेव्हा त्या दृष्टीने प्रयत्न करून पाहावा व आपापल्या गांवासाठी सांड मिळवावा. कोणत्या जातीचा सांड गांवांत चांगला ह्याबद्दल गुरांच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. ते तो सल्ला आनंदाने देतील. सरकारी सांड मिळाल्यास उत्तमच; त्याच्या खिलाईची सोय मात्र गांवकऱ्यांना करावी लागते. सभासदांनी गांवकऱ्यांतर्फे तें काम हातीं घ्यावें. तसा सांड न मिळाल्यास तो मिळेपर्यंत गुरांच्या डॉक्टरांच्या सल्ल्याने गावांतील सांडांमधूनच एक चांगलासा सांड निवडावा. साधारणतः ६० गायींना एक ह्या हिशेबाने गांवांतील इतरहि निवडक सांड ठेऊन बाकीचे खच्ची करून घ्यावें म्हणजे जातिवंत सांड येईपर्यंत निदान गांवांतील चांगल्या सांडांची प्रजा तरी वाढत जाईल; दुबळ्या आणि खुज्या सांडांची प्रजा निपजणार नाही. गांवांतील सांड निवडतांना गुरांच्या डॉक्टरांची मदत घेणे आवश्यक आहे; एवढ्या-करिता की साधारण लोकांची अशी कल्पना असते की सांड फक्त गलेलठ्ठ असला की झालें. ही समजूत चुकीची आहे. बाह्य शरीरयष्टीबरोबरच त्याचें कुलशील म्हणजे दूध देण्याची शक्ति चांगली असावी लागते. त्याची आई जास्त दूध देणारी असावयाला पाहिजे व त्यापासून निपजणारे गोऱ्हे शेतीसाठी चांगले उपयुक्त असावयास पाहिजेत. ह्या सर्व गोष्टी गुरांच्या डॉक्टरांच्या सल्ल्याने शक्य आहेत म्हणून त्यांचा सल्ला घेण्यास विसरूं नये.

जातिवंत सांड मिळण्याचें कार्य थोडें अवघड असलें तरी त्यापासून फायदा मात्र फार मोठा आहे. चांगल्या गुरांची पैदास करण्याचें अर्थें अधिक कार्य केल्याचें त्यामुळे समाधान पशु–सुधार समितीच्या सभासदांना मिळेल. सरकारी सांड न मिळाल्यास गांवां-तील लोकांनी मिळून एक सांड खरीदावा. गांवांत ज्यांच्याकडे जास्त गाई असतील अशा व्यक्तींनी सांड खरेदी करून त्याचा उपयोग गांवातील इतर गायींकरिता करून द्यावा.

## वासरांची निगा

त्यानंतर अशा सांडांपासून झालेल्या वासरांची योग्य निगा ठेवून त्यांना संसर्गजन्य रोगांपासून वाचविणेहि तितकेच महत्वाचें आहे. त्यासाठी प्रति वर्षात पावसाळा सुरू होण्याच्या पूर्वी गांवांतील गुरांना संसर्गजन्य रोगाची लस टोचून घ्यावी. गळसुजी, एकटांग्या, तडकफाशी इत्यादि रोग पावसाळ्यात होतात व एकदा सांथ आली की पुष्कळ गुरें दगावतात. गांवातील पशुधन म्हणजे गांवाची दौलत; तीं वाचविण्याचें कार्य, गुरांच्या डॉक्टरांना मुद्दाम बोलावून त्यांचे-कडून प्रतिबंधक लस टोचून, करवून घ्यावें व गांवांतील गुरें वाचवावीं. गांवांतील गुरांवर बारकाईने लक्ष ठेवून संसर्गजन्य रोगांचीं लक्षणें दिसून येतांच ताबडतोब तीं लक्षणें सविस्तरपणे गुरांच्या डॉक्टरांना कळवून त्यांना बोलावून घ्यावें. गुरांच्या रोगांचा रिपोर्ट करावा. ह्या बाबतींत प्रस्तुत लेखकाच्या 'पशुवैद्यक' ह्या पुस्तकाची मदत होईल. त्यांत ह्या संसर्गजन्य रोगांवर खेड्यांत मिळणारी व इतरहि औषधें दिलीं आहेत. सामान्य रोगांवर इलाज करण्याकरिता कांही खास औषधें व त्यांचे गुणधर्म शेवटी दिले आहेत. तीं सार्वजनिक वर्गणी करून आणून ठेवावीं व डॉक्टर येईपर्यंत सभासदांपैकी कोणीतरी विशेष लक्ष घालून पुस्तकाच्या साहाय्याने प्रथमोपचार करावेत. गांवांत कोणीतरी पशुवैद्यक असतोच; त्याला ह्या समितिमध्ये घ्यावें व डॉक्टरांच्याकडून त्याला कांही औषधाचा परिचय करवून द्यावा.

## चारादाण्याचा प्रश्न

ह्यानंतर चाऱ्यादाण्याचा प्रश्न हातीं घ्यावा. गांवाजवळ जंगल किंवा पडीत जमीन असेल तर तेथे गुरें चारण्यासाठी व्यवस्था करावी. सरकारी मदत गुरांच्या डॉक्टरांच्या साह्याने व शिफारसीने जंगल विभागाकडून मिळविणें शक्य असेल तर तसाहि प्रयत्न करावा. पशु–सुधार समितितर्फे केलेल्या अर्जाचा विचार सरकारतर्फे मोठ्या आदराने केला जाईल. सरकी, ढेप वगैरे हंगामांत स्वस्त मिळतात; पण नंतर त्यांची किंमत वाढते व शेतकऱ्यांना गुरांना सरकी देणें

परवडत नाही. त्यासाठी सहकारी दुकानांतून हंगामावर सरकी खरेदी करून ती सर्व वर्षभर किफायतशीर भावाने शेतकऱ्यास मिळेल अशी सोय या समितीच्या सभासदांनी पुढाकार घेऊन करावी. त्यासाठी शेअर्स काढून अशी सहकारी संस्था स्थापन करावी व तीतर्फे चारादाणा, खतें, बीं वगैरेंची विक्री करावी. ह्याच सहकारी संस्थेतर्फे १–२ कडबा कापण्याचीं यंत्रें आणावीत व तीं भाड्याने देऊन कडबा कापून गुरांना घालावा. कडब्याचे धांडे किती वाया जातात व कडबा कापून न घातल्याने किती नुकसान होतें ह्याचीहि कल्पना खेडुतांना द्यावी. कडबा कापल्याने $\frac{1}{3}$ बचत तरी नक्कीच होईल व त्यावर येणारा खर्च अतिशय कमी राहील. कडबा नीट व बारीक कापून व शक्य असेल तर त्यावर थोडेसें मिठाचें पाणी शिंपडून तो डाल्यांतून गुरांना खाऊं घातला तर त्यांना अधिक मानवेल व कडब्याची बचतहि पुष्कळच करतां येईल. पाण्याची सोय असल्यास हिरवा चारा उपजविण्यासाठी खेडुतांना प्रोत्साहन द्यावें.

**सायलेज–** गुरांसाठी जेथे मुबलक गवत मिळूं शकतें तेथे तें जमिनींत साठवून उन्हाळ्यासाठी सुद्धा हिरवें ठेवतां येतें. त्यांस सायलेज असे म्हणतात. सायलेज बनविण्यासाठी गुरांच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. गुरांचे डॉक्टर गांवीं आल्यावर त्यांचा मुक्काम होईल त्या दिवशीं समितीतर्फे खेडुतांना समजेल अशा भाषेंत डॉक्टरांना चर्चा किंवा व्याख्यान द्यावयास सांगावें म्हणजे ह्या सर्व गोष्टी गुरांचे डॉक्टर खेडुतांना नीट समजाऊन सांगतील. ह्या विषयावरील तज्ज्ञांची व्याख्यानेंहि मधून मधून समितीतर्फे ठरवावी व डॉक्टरांशी समितीच्या सभासदांनी वेळोवेळी चर्चा करून खेडुतांना मार्गदर्शन करावें.

## मेलेलीं गुरें पुरण्याची व्यवस्था

संसर्गजन्य रोगांनी मेलेल्या गुरांना पुरण्याची व्यवस्थाहि ह्याच समितीतर्फे व्हावयास पाहिजे; इतर गुरें मेल्यावरहि त्यांना वाटेल तिकडे न फाडतां ढोरफोडीची एक जागा मुकर करून तेथेच गुरें

अनुक्रम
विभाग
क्रमांक

फाडावीं. अशी जागा चराईच्या जंगलापासून व गांवापासून थोडी दूर असावी.

## इतर आनुषंगिक धंदे

ग्रामोद्योगाच्या दृष्टीनें डेअरीच्या धंद्याची सहकारी संस्था, कोंबड्या पाळण्याचा धंदा, शेळ्या-मेंढ्या पाळण्याचा धंदा वगैरे आनुषंगिक धंद्यांकडेहि पशु-सुधार-समितीचें लक्ष असावें. सहकारी तत्वावर हे धंदे या समितीला करतां येण्यासारखे आहेत. कोंबड्या पाळण्याचा धंदा कमी भांडवलांत सहकारी तत्वावर सहज करतां येण्यासारखा आहे. ह्या सर्व कार्याकडे त्यांतून मिळणाऱ्या पैशाचा विनियोग करतां येईल. डेअरीचा धंदा सहकारी तत्वावर पुष्कळ खेड्यांतून, विशेषतः जेथे चराईची चांगली सोय आहे तेथें, करतां येण्यासारखा आहे. त्यामुळे चांगलें शुद्ध दूध मिळण्याची सोय होईल. पुष्कळ दूध होणाऱ्या ठिकाणीं दुधावरची साय काढून घेऊन खेडे-गांवांतून स्वस्त दूध विकतां येण्यासारखें आहे. मलईचें लोणी करून तेंहि विकतां येईल. शहर फार दूर असून रस्ते चांगले नसले व दुधाचा खेड्यांत पाहिजे तसा खप नसला तर मलई काढून लोणी बनविण्याचा धंदा फार चांगला. सहकारी तत्वावर असें एक यंत्र गांवाकरिता खरेदी करून तें लोकांना भाड्यानें देतां येण्यासारखें आहे. हें यंत्र २५० ते ३०० रुपयांपर्यंत मिळूं शकते. ह्याकरिता प्रस्तुत लेखकाचें "डेअरीचा धंदा" हें "उद्यम" तर्फे प्रसिद्ध झालेलें पुस्तक पुष्कळच उपयोगी पडेल.

चामड्याचा धंदाहि खेडेगांवांत करतां येण्यासारखा आहे. हल्ली चांभार लोक करीत असलेल्या ह्या धंद्यांत त्या लोकांना प्रोत्साहन देऊन व नव्या शास्त्रीय गोष्टींचें ज्ञान करून देऊन त्यांत पुष्कळच सुधारणा करतां येण्यासारखी आहे. वेळोवेळीं गुरांच्या डॉक्टरांचाहि सल्ला घ्यावा. वाचनालयांतील ह्या विषयावरील पुस्तकेंहि नेहमी वाचावीत म्हणजे बरीच उपयुक्त माहिती नेहमी संग्रहीं राहते.

# प्रकरण ६ वें

# आरोग्य-समितीच्या कामाबद्दलचें मार्गदर्शन

## आरोग्य-समितीचीं कामें

आरोग्य-समितीचें कार्य शेती-सुधार-समितीच्या कामासारखेंच अत्यंत महत्वाचें व जबाबदारीचें आहे. गाव आदर्श -करण्याचें ध्येय गांवांतील लोक निरोगी व उत्साही असतील तरच साध्य होईल. लोक निरोगी असतील तरच त्यांची कामें करण्याची पात्रता वाढेल व ते आपलें ध्येय साध्य करण्यास मनापासून झटतील; उलटपक्षीं गांवांत रोगी व अस्वच्छ लोक असतील तर शारीरिक व्याधींमुळे त्यांचें कशांतच लक्ष लागणार नाहीं; ते सदा निरुत्साहीच राहातील. म्हणून गांवांत रोग पसरूं न देण्याचें व गांव स्वच्छ ठेवण्याचें महत्वाचें काम ह्या समितीनें अगदी कटाक्षपूर्वक करावयाला पाहिजे. स्वच्छता हीच आरोग्याची गुरुकिल्ली आहे ही गोष्ट ह्या समितीच्या सभासदांनी खेडुतांना नीट पटवून द्यावी आणि त्यांच्या घरांची स्वच्छता, सडकेवरील नाल्यांची स्वच्छता, सांडपाण्याची नीट व्यवस्था, शौचकूप, विहिरीजवळील जागेची स्वच्छता, पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था, रोग-प्रतिबंधक टीका व गांवांतील हॉटेलसवर देखरेख इत्यादि गोष्टींवर लक्ष ठेऊन संपूर्ण गांवाचें आरोग्य सांभाळलें पाहिजे. ठिकठिकाणीं "गांव स्वच्छ तर शहर त्यापुढे तुच्छ" किंवा "सर्व सुखाचें आगर; स्वच्छ ठेवा आपलें घर" इ. म्हणी लावून त्यांचा अर्थ गांवकऱ्यांच्या मनांवर बिंबविला पाहिजे. थोड्याशा निष्काळजीपणानें किंवा आळसानें देखील गांवांत रोग कसे पसरतात व ते निस्तरण्यासाठी किती श्रम व पैसा खेडुतांना विनाकारण खर्च करावा लागतो हें सोदाहरण खेडुतांना पटवून द्यावें.


समजा गांवांत एका गांवकऱ्याच्या घरांत आळसामुळे व नेहमीच्या गलिच्छपणामुळे सांडपाणी साठलेलें आहे, घरांतच एकीकडे

गुरें बांधलेलीं आहेत, त्यांचें मलमूत्र खळग्यांत सांचलेलें आहे, नाल्या साफ न केल्याने तें तुंबून घाण पाणी अधिकाधिक घाण होत आहे किंवा रस्त्यावर सोडून दिल्याने दारासमोरून वाहत आहे, घरासमोर सडकेवर चिखल व डबकीं सांठलेलीं आहेत, मागे परसांत वाटेल तसें गवत वाढूं दिलें आहे, त्यांतच एका बाजूला कचरा सांठविलेला आहे व तो पाण्याने वाहून सगळीकडे पसरत आहे, तो सडल्यामुळे दुर्गंधि पसरली आहे, पिण्याचें पाणी उघडेंच ठेवलें आहे व पोरें धावत येऊन त्यांत घाणेरडीं भांडीं बुडवून तें पाणी पीत आहेत, माशा सर्व घरांत घोंघावत आहेत, मुलांनी शौचास कोठे बसावें ह्याचा कांही धरबंध उरलेला नाही, म्हातारे लोक पान खाऊन वाटेल तेथे थुंकत आहेत, चिलिमीसाठी एके ठिकाणीं अखड अग्नि धुमसत आहे, घर धुराने कोंडलें आहे व चिलिमींतील राख जेथे तेथे सांडलेली आहे असें दृश्य प्रत्येक खेडेगांवांतून कांही नवीन नाही आणि तें फारसें अतिरंजीतहि नाही. अशा घराची आपल्याला किळस येते; पण जंतूंना ? छे ! त्यांना तर ती मेजवानीच असते. अशा घरांत दुनियेंतील सर्व रोग–जंतु जमा होतात. डांस आपल्या संगीताने त्या रोग–जंतूंचें स्वागत करतात. माशा विमानासारखे आपल्या पायांवर त्यांना वाहून नेतात व मग हे रोग–जंतु त्या घरांत आपलें ठाण मांडून बसतात. त्या घरांत रोग पसरूं लागतो. सांडपाण्यावर डांसांनी अंडीं घातल्याने तेथे डांसांची वाढ होऊं लागते. माशा घाणींतच आपलीं अंडीं घालतात व वाढतात. माशा व डांस हे तर रोगांचे हस्तकच होत; त्यांच्याकडूनच रोगजंतु वाढण्यास मदत होते हे खेडुतांना जितकें जास्त पटेल तितकें रोगराईपासून त्यांची मुक्तता करणें अधिक सोईचें होईल. *


*प्रस्तुत लेखकाचें "पशु–वैद्यक" नांवाचें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे, त्यांत 'जंतूंची कहाणी' ही गोष्ट आहे. तींत गोष्टीरूपाने जंतु रोग कसे उत्पन्न करतात हें मनोरंजकपणे सांगितलें आहे. तें खेडुतांना सवडीने वाचून दाखवावें.

### थोड्या शारीरिक श्रमाने सर्व शक्य आहे.

घरांत एकदा रोग–जंतु वाढूं लागले की हिंवताप सुरूं होतो. एकामागून एक घरांतील कर्ती व मिळवनीं माणसें हिंवतापानें



आजारी पडतात व त्यांचीं कामें अडून राहातात. कामांत आजारीपणामुळे खाडे पडल्याने पैशाचें नुकसान होऊन कुटुंबांतील इतर लोकांना उपास पडतात किंवा शेतीचीं कामें वेळेवर न झाल्याने नुकसान होतें. आजारी पडल्यावर औषधोपचाराची गांवांत सोय नसल्याने सावकाराचें कर्ज काढून शहरांत पळावें लागतें. शहरांत डॉक्टरांचीं इंजेक्शनें व औषधाचीं बिलें भागवावीं लागतात. ही सर्व अनर्थ–परंपरा आपलें घर स्वच्छ नसल्यामुळे निर्माण झाल्याचें खेडुतांच्या मनावर चांगलें बिंबवून द्यावें. बरें ही कारणपरंपरा नाहीशी करणें कांही पैशाचें व कष्टाचें काम असतें असेंहि नाही; फक्त आळशीपणा घालविला की सर्व कांही सुरळीत होते. घरांतील सांडपाणी बाहेर काढून लावण्यास कांही पैशाची आवश्यकता नसते. थोड्या शारीरिक श्रमाने तें सहज शक्य आहे. असें सांडपाणी नाल्या साफ करून बाहेर काढून लावलें व त्यांच्या तोंडाशी बाजूच्या आकृतींत दाखविल्याप्रमाणें एक मोकपीट बनविलें की डांसांच्या वाढीसाठी लागणारें सांड–पाणी कोठें मिळणार? त्याचप्रमाणे कचरा नेहमी काढून खतांच्या खड्ड्यांत नेऊन टाकला आणि घरांत मोकळी हवा खेळती ठेवून घर अगदी स्वच्छ ठेवले तर माशा कोठून घोंघावणार व रोग–जंतु तरी कसे वाढणार? जसें आपलें घर तशी आपली गल्ली व गांव स्वच्छ




१ मोरी. २ जाळी. ३ पन्हळ. ४ सांडपाणी. ५ तुराटचा. ६ जमीन. ७ खड्डा. ८ गोटे.

ठेवण्यासहि असाच थोडा-फार हातभार प्रत्येक खेडुताने लावला तर रोग जसा आपल्या घरांत येण्यास धजणार नाही तसाच तो गल्लीत व गांवांतहि येण्यास धजणार नाही हें ओघाने आलेंच. कोणतीहि सुधारणा करण्यास सांगितलें की नेहमी "आम्ही गरीब; आमच्या हातून काय होणार ?" असें रडगाणें गाण्याची खेडुतांना एक संवयच झालेली असते. त्यांचा हा न्यूनगंड घालविण्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन करणें व त्यांच्यांत आत्मविश्वास निर्माण करणें आरोग्य समितीचें मुख्य कर्तव्य ठरतें. अर्थात् हें काम कौशल्यानेच करावयाला पाहिजे. खेडुतांची मनें वळवितांना शक्याशक्यतेचाहि विचार नीटपणे केला पाहिजे व आपण सांगत असलेल्या गोष्टी त्यांच्या हिताच्या जरी असल्या तरी पद्धतशीरपणे सांगण्यावरहि त्या त्यांना पटणें वा न पटणें अवलंबून असते हें विसरून चालणार नाही. समजून सांगण्यांची पद्धति जर योग्य नसेल तर वेळीं साऱ्याच कामाचा विचका होण्याचा संभव असतो. उदाहरणार्थ मलेरियावर प्रतिबंधक म्हणून मच्छरदाणी वापरण्याचा उपाय योग्य आहे खरा; पण म्हणून शेतकऱ्यांना एकदम मच्छरदाण्या वापरण्यास सांगणें थोडें हास्यास्पदच नाही का होणार ? तसेंच त्यांना कांही गोष्टी सांगतांना त्यांच्यापुढे आदर्श राहण्याची आपली जबाबदारीहि आपणाला कसोशीने सांभाळावी लागेल. त्यांना काम करावयास मदत करुन त्यांच्यांत विश्वास निर्माण करण्यानेच बराचसा कार्यभाग सहजासहजी साधण्यासारखा असतो. 'आधी केलें आणि मग सांगितलें' चा प्रभाव कांही और असतो.

### प्रभातफेरीचा उपक्रम

आरोग्य-समितीच्या कार्याला सुरुवात करण्यापूर्वी ह्या सर्व गोष्टी गावकऱ्यांची सभा घेऊन त्यांना समजाऊन सांगाव्या. ही सभा ग्रामविकास मंडळातर्फे बोलवावी. सभेंत गांवांतील पुढाऱ्यांचीं ह्या विषयावर भाषणें व्हावीत व खेडुतांना आरोग्याचें महत्व समजाऊन सांगावें. त्यानंतर एक दिवस ठरवून त्या दिवशीं गांवांत प्रभातफेरी

काढावी. शाळेचीं मुलें व गांवकरी ह्यांसमवेत निघालेल्या ह्या फेरीने गांवाच्या आरोग्याची पाहाणी करावी. समितीच्या सभासदांनी ज्या घरासमोर अस्वच्छता, बुजलेली नाली वा सांडपाण्याचें डबकें वगैरे स्वरूपाची घाण दिसेल तेथे थांबून घरमालकास तें सर्व स्वच्छ करण्यास सांगावें. अशा वेळीं माणूस पाहून त्याप्रमाणे वागावें–बोलावें व स्वच्छतेचें महत्व त्यास समजावून सांगावें. ज्याला त्याच गांवांत राहावयाचें आहे तो एकाएकी एवढ्या माणसांच्या विरूद्ध जाऊन मग्रुरीचीं उत्तरें देणार नाही. पुष्कळदां तर नुसते सांगूनहि भागते. ही पद्धति अत्यंत यशस्वी ठरलेली आहे. घाण वरीच असल्यास त्याला योग्य ती मुदतहि द्यावी.

## आरोग्य–समितीच्या सभासदांची जबाबदारी


आरोग्य–समितीच्या सभासदांनी मात्र आपापल्या घरांपुढे आदर्श स्वरुपाची स्वच्छता ठेवावयास हवी; नाहीतर ते टीकेचा विषय बनतील; एवढेच नव्हे तर गांवांत त्यांचें वजनहि राहाणार नाही. उलट स्वतःचीं घरें प्रथम स्वच्छ करून नंतर प्रभातफेरीद्वारे वरील उपक्रम केल्यास तो अधिक यशस्वी होईल. वेळप्रसंगीं न चिडतां, शांत चित्ताने कोणताहि प्रश्न समाधानकारकपणे निकालांत निघतों हें लक्षात ठेवावें. टवाळी करणाऱ्याला आपल्या वागणुकीने शरमिंदा करणें हाच त्याला जिंकण्याचा योग्य उपाय होय.

**घरांची स्वच्छता**––घरें कशीं स्वच्छ ठेवावीं ह्याबद्दल सुरुवातीला सांगितलें आहेच. त्या दृष्टीने प्रारंभ करावयाचा म्हणजे नालीचें पाणी बाहेर काढून तेथे एक सोकपिट बनवावा. केर खताच्या खड्ड्यावर नेऊन टाकण्याचा सल्ला द्यावा. गुरें घरांत न बांधतां तीं अलग व शक्यतर गुरांच्या गोठ्यांतच बांधावीं. गुरांचे गोठे स्वच्छ ठेवावें. घरांत माशा जास्त असतील तर फिनेलच्या पाण्याने सारवण्यास सांगावें. वाटेल तेथे थुंकणें वा मुलांना शौचास–लघ्वीस बसविणें टाळावें. मुलांना नीट शिस्त लावल्यास ह्यांत कठीण असें

कांहींच नाही. खेडेगावांतील मोठ्या घरच्या स्त्रियांनी थोडे खालच्या वर्गातील स्त्रियांत मिसळण्याचा सराव ठेवल्यास पुष्कळच मार्गदर्शन करतां येण्यासारखे असतें. अशा स्त्रियांना आरोग्य-समितींत घेण्यास हरकत नाही. अनुभव असा आहे की खेड्यांतील मोठ्या घरची स्त्री अजूनहि आपल्या मोठेपणाला चिकटून आहे; ती मोकळेपणाने गांवांतील स्त्रियांत मिसळण्यास अजून तयार होत नाही. वेळीं शहरांतील एखादी श्रीमंत व सुशिक्षित महिला खेड्यांत जाऊन घरोघरीं प्रचारसुद्धा करील पण मोठ्या घरची खेड्यांतील स्त्री आपल्या घराचा उंबरठा ओलांडणार नाही. ही परिस्थिति पालटण्याचा प्रयत्न करावा. खेड्यांतील शिक्षिका हें काम करूं शकतील असें वाटतें. सणावाराला स्त्रियांच्या हळदी-कुंकवासारखे कार्यक्रम घडवून आणावें




व अशा प्रसंगीं घराची स्वच्छता ठेवण्याचें त्यांना जवळजवळ प्रात्यक्षिक शिक्षणच द्यावें. घराची जबाबदारी स्त्रियांवरच अधिक असते; तेव्हा तिला स्वच्छतेचें महत्व समजलेंच पाहिजे. हळदीकुंकवासारख्या उपक्रमांद्वारे हें काम जास्त चांगल्या रीतीने होऊं शकेल. घरांत नेहमी मोकळी व खेळती हवा राहावी. पूर्वी सुरक्षिततेच्या दृष्टीनें घरांना खिडक्या वगैरे नसत; आता ती परिस्थिति पालटली आहे: तेव्हा जुन्या पद्धतींना चिकटून न राहतां घरांत हवा व उजेड खेळता राहील अशी व्यवस्था करून घ्यावी. खेड्यांतील घरांतून नेहमी धूर कोंडलेला दिसतो. धूर नाहीसा करण्याच्या दृष्टीनें मगनचुला चांगला असतो; त्यांत जळणहि कमी लागतें.



**मगनचुला**--मगनचुला म्हणजे २-३ भांडीं एकदम शिजतील अशी व्यवस्था असलेली एक बंदिस्त चूल असते. तिच्या एका टोंकाला उंच धुराडें असतें. त्यांतून धूर निघून जातो.


घर स्वच्छ ठेवणें व सजविणें ही एक कला आहे. भगिनींनी ती आत्मसात् करून घेतली पाहिजे, स्वच्छ घराचें प्रात्यक्षिक आपापल्या घरांतून दाखविलें पाहिजे व मार्गदर्शनहि केलें पाहिजे. थोड्याशा मेहनतीने घर स्वच्छ राहूं शकतें व त्यामुळे बरीचशी अनर्थपरंपरा टाळतां येतें हें समजाऊन सांगावें. घर म्हणजे बंगलाच असावयाला पाहिजे असें नाही. झोपडी असली तरी ती स्वच्छ व सुंदर कशी दिसेल ह्याची खबरदारी घेतली पाहिजे म्हणजे घरांत व पर्यायाने गांवांत रोग येणार नाही. घराची दर्शनी भिंत नीट सारविलेली, घरासमोरील सडक स्वच्छ, ओटा स्वच्छ, कुंपण असेल तर तें व्यवस्थित व शक्य तर फुलांच्या वेलांनी सुशोभित ठेवण्याचा प्रयत्न सर्वांनी केला तर गांव आपोआपच सुंदर व स्वच्छ दिसेल आणि मग खरोखरीच "गांव स्वच्छ तर शहर त्यापुढे तुच्छ" असें सर्वांनाच वाटेल. आरोग्य–समितीच्या सभासदांनी महिन्यांतून ठराविक एक–दोन दिवशीं तसेच प्रत्येक सणाला आपापलीं घरें स्वच्छ करण्याचा कार्यक्रम ठरवून टाकावा.



**स्वच्छ पाण्याची व्यवस्था**---गांवांतील लोकांकरिता पिण्याच्या पाण्याची सोय आरोग्य–समितीच्या सभासदांनी करून द्यावयास हवी. घाण पाण्यापासून पटकी, हगवण, आमांश ह्यांसारखे रोग होतात हे खेडुतांना समजावून सांगावें व गांवांतील पिण्याचें पाणी नेहमी स्वच्छ राहील अशी काळजी घ्यावी. विहिरींना उंच कठडे बांधून घ्यावें. विहिरीभोंवतालचें पाणी परत विहिरींत झिरपून जाणार नाही अशी व्यवस्था करावी. विहिरीच्या भोंवतीची जागा फरशी किंवा सिमेंटने



बांधून काढावी व तीत नाली ठेवून विहिरीच्या भोंवतालीं सांडलेलें पाणी दूर वाहून जाईल असें करावें. खेडेगांवांत राहाटाविना हाताने शेंदून पाणी काढण्याची पद्धति सगळीकडे दिसून येते; ह्या पद्धतीमुळे पाण्याच्या व्राणीनें दूषित झालेलें पाणी परत विहिरींत जातें व विहिरीचें पाणी दूषित होतें. त्यासाठी विहिरीवर रहाटाची सोय करावी म्हणजे स्वच्छता राहून अपघातहि फार कमी होतात. विहिरीभोंवती घाण पाणी मुरतें व तें परत विहिरींत जातें. त्यासाठी घाण पाणी विहिरीजवळ मुरूं देवूं नये. विहिरीजवळ स्नान करण्याने एखादा माणूस रोगी असेल तर त्याच्या आंघोळीचें पाणी परत विहिरींत जावून रोग पसरण्याला मदतच होईल. तेव्हा विहिरीजवळ स्नान करणें, कपडे धुणें, गुरें धुणें वगैरेंना बंदी करावी. विहिरीचें पाणी खराब होऊं देऊं नये. पाणी पिण्याच्या खाजगी वा सार्वजनिक विहिरी महिन्याकाठी एक–दोनदां लाल औषध टाकून त्या शुद्ध कराव्या. आरोग्य–समितीच्या सभासदानी गांवांतील विहिरी वाटून घेतल्यास त्या जबाबदारीने स्वच्छ करण्याचें काम अधिक सोपें व सोयीचें होईल. गुरांसाठी पिण्याचें पाणी एका सार्वजनिक हौदांत भरून तें नेहमी पोटॅशियम परमँगनेट टाकून स्वच्छ ठेवावें.



गुरांनाहि आपणासारखेच शुद्ध पाणी लागतें ह्याची जाणीव ठेवावी. गुरें एकदम हौदांत पाणी पीत असल्यामुळे व त्यांपैकी एखादें रोगी असण्याचा संभव असल्यामुळे त्यांच्या पिण्याचें पाणी नेहमीच जंतु–रहित करीत राहणें अधिक अगत्याचें असतें.

गांवांत नदी असेल तर नदीचें व तलाव असेल तर तलावाचें पाणी खराब होऊं देऊं नये तलावांत गुरें धुणें व इतर सर्व गलिच्छ व्यवहार करणें बंद करावें. शक्यतों पिण्याकरिता तलावाचें पाणी न

वापरतां विहिरीचेंच पाणी वापरण्याचा नियम करून टाकावा. तलावाचें किंवा नदीचें पाणी औषध टाकून स्वच्छ ठेवणें शक्य नाही; तें घरींच औषध टाकून स्वच्छ केलें तरच उत्तम; नाहीपेक्षा तें घाण न होऊं देणेंच शक्य असतें. पावसाळ्यांत डबक्यांत साठलेलें पाणी जवळ मिळतें म्हणून तें पिण्याकरिता वापरलेलेंहि अनेकदां आढळून येतें. शहरांतील लोकांचा ह्यावर विश्वासहि बसणार नाही. परन्तु वस्तुस्थिति मात्र अशीच आहे. अशा परिस्थितींत आरोग्य–समितीच्या सभासदांनी प्रचार करूनच ह्या गोष्टींना आळा घालतां येईल. पाणी मनुष्यमात्राचें जीवन आहे; पण तें जर स्वच्छ व शुद्ध नसेल तर रोग जंतु पसरवून घातक ठरतें हें विसरतां कामा नये.


**अन्न**—अन्न चांगलें, ताजें व पौष्टिक खावें हें सांगणें अगदी सोपें आहे; पण अन्नान्नदशा असणाऱ्यांना पौष्टिक अन्न खावयास सांगणें म्हणजे त्यांच्या दुःखावर डागण्या देण्यासारखें आहे हें लक्षांत ठेवून आरोग्य–समितीच्या सभासदांनी समयोचित सल्ला द्यावा. "जें खावयाचें तें रुचकर करून ताजें असतांनाच खा; सडकें अन्न खाऊं नका, सडकें मांस खाऊं नका" येवढे त्यांना सांगितलें तरी पुरें.

## गांवांतील सार्वजनिक स्वच्छता

**शौचकूप**—वर्गणी करून गांवाबाहेर सार्वजनिक संडास बांधावें व तेथेंच लोकांनी शौचास गेले पाहिजे असा दंडक घालावा. त्यामुळे गांवाची स्वच्छता टिकण्यास मदत होईल व सोनखताद्वारे त्याची किंमतहि येईल. गांवांतील सार्वजनिक संडासासाठी कोणी पैसे खर्च करण्यास तयार होईल तर पहावें. तितकी किंमत पुढे खतापासून सहज येईल व ते पैसे नंतर परतहि करतां येतील. स्त्रियांसाठी अगदी दूर असे संडास असावेत तसेच पुरुषांसाठीहि दुसरीकडे दूर असे स्वतंत्र संडास असावेत. गांव मोठा असेल तर मेहेतराचें एक जोडपें संडास स्वच्छ करण्यास ठेवतां येईल. त्यांचा पगार गांवांतून वर्गणी करून व खत विकून देतां येईल. तें शक्य न झाल्यास चराचे


संडास करावेत. लांबलचक व दोन फूट रुंदीचा एक चर खोदावा व त्यावर चाकें लावलेला एक फिरता संडास ठेवावा. हा संडास जसजसा भरत जाईल तसतसा चराच्या लांबीवर सरकवीत जावें. त्यांत बाजूला माती भरून ठेवावी व शौचास जाऊन आल्यावर एका छोटयाशा हात–फावडयाने मलावर माती टाकावी. संवय होईपर्यंत सुरुवाती–सुरुवातीला लोकांना तें थोडें विचित्र वाटतें. पण एकदा संवय लागल्यावर मग त्यांत कांही वाटेनासे होतें. गांवाच्या स्वच्छतेसाठी येवढी तसदी घेणें आवश्यक आहे.

गांवकऱ्यांच्या सल्ल्याने गांवापासून दूर अंतरावर झेंडे लावावें व "त्यांच्या आंत कोणीहि शौचास बसूं नये" अशी जाहीर सूचना काढावी. ह्या झेंडयांच्या आंत कोणी शौचास बसल्यास त्याला २ आणे दंड करण्यांत येईल असें जाहीर करावें.



ते पैसे पकडून देणाऱ्यांना देऊं करावें. पुराव्यासाठी त्या माणसाला पचासमोर उभे करणें किंवा त्याचा लोटा उचलून आणणें आवश्यक आहे. ह्या गोष्टींचा निकाल आरोग्य–समितीच्या सभासदांनी करावा. ही व्यवस्था गांवांत संडास झाल्यावरच करणें चांगलें; त्यामुळे लोकाना संडासांतच शौचाला जाण्याची संवय लागेल किंवा झेंडयांपलीकडे दूर जावें लागेल. ह्यामुळे गांवांत घाण होणार नाही. अनुभवांतीं लोटा उचलून आणण्याची पद्धति अत्यंत यशस्वी ठरली आहे. आणखी थोडें खोलांत जावयाचें असेल तर अशा लोकांचीं नांवें रोज बोर्डावर जाहीर करावीत म्हणजे लाजेस्तव गांवाच्या हद्दींत कोणी घाण करण्यास धजावणार नाही. एकदां ह्या उपायाचा अवलंब करण्याचें ठरविल्यावर सर्व गांवकऱ्यांनी खेळाडु वृत्ति मात्र दाखवावयाला शिकलें पाहिजे. गांवाच्या सोयीचें जें जें म्हणून ठरेल तें तें "पांचा मुखीं परमेश्वर"

ह्या न्यायानें मूकाट्यानें व खेळीमेळीनें मान्य केलें पाहिजे. मुलांना बक्षीसें व मोकळीक दिल्यास तीं हें काम पाळत ठेवून अत्यंत दक्षतापूर्वक करतात असा अनुभव आहे.




गांवांत सार्वजनिक मूत्रीघरेंहि बांधावींत. एका मूत्रीघरासाठी साधारणपणें २–२॥ रु. पेक्षा जास्त खर्च येत नाही. सार्वजनिक चावडी, बाजार वगैरे ठिकाणीं तर अशीं मूत्रीघरें अवश्य असावयाला पाहिजेत.

**उजेडाची सोय**––गांवांत कंदील लावून अंधाऱ्या रात्रीं उजेडाची सोयहि आरोग्य–समितीच्या सभासदांनीच करावयाला पाहिजे.

**पाणपोई**––उन्हाळ्यांत वाटसरूंकरिता व बाजाराच्या दिवशीं इतर खेडुतांकरिता थंड व स्वच्छ पाण्याची सोय ह्या समितीच्या सभासदांनी करावी.


**कचऱ्याच्या पेट्या**––गांवांत वार्डावार्डांत कचरा–पेट्या ठेवाव्यात व त्यांत कचरा साठवून मग तो गांवाबाहेर खताच्या खड्ड्यावर नेऊन टाकावा. त्यापासून खताचें उत्पन्न होईल. ग्रामसफाईचा कार्यक्रम महिन्यांतून २–४ वेळां तरी करावा व त्याच वेळीं कचरा–पेट्या रिकाम्या कराव्यात. गांवांतील हें सर्व खत वाहून नेण्याकरिता एखाद्या शेतकऱ्यानें कायमची गाडी देऊं केली तर तशी व्यवस्था करावी व त्या शेतकऱ्याला त्या खताचा फायदा द्यावा. गाडीचें काम दिवसाकाठी फार तर अर्धा तास पडेल पण खत त्यामानानें पुष्कळ मिळून गाडी देणाऱ्याचा शेवटी फायदाच होईल व गांव–सफाईच्या कामाचें श्रेयहि त्याच्या पदरांत पडेल.



वार्डांतील पुढाऱ्यांनी आपापल्या वार्डांतील लोकांच्या साह्यानें ग्रामसफाईचें काम उरकावें. व कचरा त्यांकरिता नियुक्त पेट्यांतून जमा करावा. कचरा मोकळा करण्याचें काम फक्त गाडीवाला करेल अशी योजना आखावी.

**रोग-प्रतिबंधक टीका**—प्रतिबंधक म्हणून पावसाळ्याच्या तोंडीं गांवांतील लोकांना कॉलऱ्याच्या टीका डॉक्टरांकडून लावून घेण्याची व्यवस्था ह्या आरोग्य-समितीच्या सभासदांनी करून द्यावी. डॉक्टरांना गांवांत बोलावून त्यांचें व्याख्यान करावें व गांवकऱ्यांना टीका लावण्याचें महत्वहि डॉक्टरांच्याकडूनच पटवून सांगावें. समितीच्या लोकांनी पुढाकार घेऊन व स्वतः प्रथम टीका लावून गांवांतील सर्व लोकांना टीका लावून घेण्यास उत्तेजन द्यावें. गांवांत रोग आल्यास प्रतिबंधक व निवारक कोणकोणती काळजी घ्यावयास हवी तेंहि समजाऊन सांगण्याची डॉक्टरांना विनंति करावी. समितीच्या लोकांनीहि महत्वाच्या गोष्टींची नोंद करून ठेवावी. प्रतिबंधक आणि उपचाराकरिता म्हणून अवश्य असणारी टॉम्स कॉलरा मिक्श्चर, सल्फो-गायनेडीन गोळ्या ह्यांसारखीं रामबाण औषधें संग्रहीं ठेवावींत. समितीच्या एखाद्या सभासदानें डॉक्टरांच्याजवळून त्यांचे उपयोग समजावून घ्यावें. प्रथमोपचारासाठी लागणाऱ्या बेडपॅन, थर्मामिटर वगैरेंचीहि वर्गणीच्या पैशांतून सोय करावी व गांवकऱ्यांना गरजेच्या वेळीं त्यांचा फायदा द्यावा. कोणी आजारी पडल्यास त्याची काळजीने विचारपूस करावी. आजार किरकोळ स्वरूपाचा असेल तर इलाज सुचवावा किंवा डॉक्टरांचा सल्ला मिळवून द्यावा. अशा वेळीं स्वतःला पडणारे शारीरिक कष्ट किंवा आर्थिक झीज ह्यांकडे विशेष लक्ष देऊं नये. आजाऱ्याची प्रेमानें शुश्रुषा करावी. खेडुतांचीं मने वळविण्याची ही सुवर्णसंधि कधीहि गमावूं नये. अशा वेळीं खेडुतांस प्रेमळ सल्ला व धीर दिल्यास ते समिती-सभासदांच्या हाकेला केव्हांहि ओ देतील व गांवाच्या कार्यात आस्थेने हातभार लावतील. उलटपक्षी अशा वेळीं खेडुतांची अनास्था झाली तर ते तुमच्या कार्यांत कधीच हातभार लावणार नाहीत व तुमचें सारे थोतांड आहे असें समजून तुमची टवाळी व निंदा करण्याचाहि संभव आहे. मलेरियावर आता पेल्युड्रीनसारखीं हुकुमी औषधें निघालीं आहेत, तीं संग्रहीं ठेवावी व रोग्याला डॉक्टरांच्या सल्ल्याने इलाज करावा.

**गांवांतील हॉटेलांवर देखरेख**--आज लहानापासून मोठ्या खेड्यांपर्यंत बहुतेक ठिकाणीं हॉटेलें निघालीं आहेत. सडकेवरील खेड्यांत तर त्याचें प्रमाण अधिक दिसून येतें. अशा हॉटेलांतून चहा व शेव-भजी ह्यांसारखे तळपट व अस्वच्छ पदार्थ विकत मिळतात. हे पदार्थ कसल्या तरी डब्यांत उघडे पडलेले असतात आणि ते नेहमीच अगदी शिळे असतात. गांवांतील आरोग्य बिघडविण्याचें हें अड्डेच समजावयास हरकत नाही. साऱ्या गांवच्या निंदा आणि कुचाळ्या येथें चाललेल्या असतात. गांवांतील खुशालचेंडू व गांवगुंड ह्यांचेहि अड्डे येथेंच असतात. अशा हॉटेलांतून क्वचित् सट्टा व जुगारहि चाललेला दिसतो. या सर्व गोष्टींवर व विशेषतः हॉटेल-मधील स्वच्छतेवर आरोग्य-समितीच्या सभासदांनी लक्ष ठेवणें फार



महत्वाचें आहे. गांवांतील लोकांचीं मनें वळवून व हॉटेलवाल्यांची समजूत घालून त्यांचें नीट मार्गदर्शन करावें. ह्या उपायानें हॉटेलांमधील अस्वच्छता नाहीशी करतां येण्यासारखी आहे. अशा हॉटेलांचें उत्पन्न बेताचेंच असतें म्हणून त्यांना कांचेच्या आलमाऱ्या, टेबलें, खुर्च्या वगैरे ठेवण्यास सांगणें शहाणपणाचें होणार नाही. परन्तु त्यांना सर्व पदार्थ झाकून ठेवण्यास सांगणें, सांडपाण्याची नीट व्यवस्था करावयास लावणें, माशा न होण्यासाठी हॉटेल स्वच्छ ठेवावयास लावणें, खरकटें नीट एका डब्यांत जमा करुन ठेवावयास सांगणें व वाटेल तिकडे फेकूं न देणें, वाटेल तेथें हात धुवून पाणी सांडू न देणें वगैरे गोष्टी त्यांच्याकडून करुन घेण्यासारख्या आहेत. तसेच गांवांतील आखाड्यांना पोषक असें वातावरण तेथें सहज उत्पन्न करतां येण्यासारखें आहे. ह्या हॉटेलांतून कांही सुधारणा करुन गांवांचें आरोग्य नीट राखण्यास आरोग्य-समितीच्या लोकांनी प्रयत्न केले पाहिजेत त्या दृष्टीने पुढीलप्रमाणे आरोग्य-समितीच्या लोकांना मार्गदर्शन करतां येण्यासारखें आहे.

## हॉटेलवाल्यांना मार्गदर्शन

(१) हॉटेलांत अश्लिल फोटो न लावतां पहिलवानांचे व देशभक्तांचे फोटो लावून तेथील वातावरण पवित्र करावें.

(२) हॉटेलांत तळके व शिळे पदार्थ न ठेवतां पौष्टिक व ताजे पदार्थ विकावयास ठेवावें. उदाहरणार्थ–चण्याची गरम उसळ, शेंगदाण्याची उसळ, इतर कडधान्यांच्या ताज्या गरम उसळी, पेढे, बर्फी, खवा वगैरे दुधाचे पदार्थ, ताजें आम्लेट बनवून देण्याची सोय इ.

(३) दूध पुष्कळ मिळत असल्यास गरम दुधाचीहि सोय करावी.

(४) शेंगदाणे व गूळ, गूळखोबरें, चणे, मुरमुरे, डाळे, भाजलेल्या शेंगा वगैरे पदार्थ मिळण्याची सोय असावी.

(५) शेव, डाळ, चिवडा वगैरे विकणें कांही दिवस आवश्यक असेल तर ते सुद्धा ताजे साध्या, स्वच्छ टिनाच्या डब्यांत ठेवून त्या डब्यांना एका बाजूला कांच बसवून घ्यावी; म्हणजे माशा बसणार नाहीत व कांचेंतून मालहि दिसेल.

(६) चहा, कॉफी एकदम बंद करतां येण्यासारखी नसेल तर कपबशा स्वच्छ विसळण्याची नीट खबरदारी घ्यावी. एकाच बादलींत तेच तेच कप पुन्हा पुन्हा विसळल्याने एकाचे रोग–जंतु दुसऱ्यापर्यंत पसरण्याचा धोका असतो. विसळण्याचें तसें नाटक न करतां नीट स्वच्छता पाळण्याविषयी हॉटेलवाल्यांना समज द्यावी व त्यांच्यावर आरोग्य–समितीच्या सभासदांनी पाळत ठेवावी.

(७) पिण्याच्या पाण्यांत पोटॅशिअम परमँगनेट किंवा क्लोरोजेन सारखीं जंतु–नाशकें घातलेलीं असावींत व ग्लास वगैरे स्वच्छ धुवून ठेवावेत.

(८) अस्पृश्यांना हॉटेलांत प्रवेश द्यावा.

अशा रीतीने लोकांना व हॉटेलच्या मालकांना आरोग्य समितीच्या सभासदांनी समज द्यावी व नेहमी देखरेख ठेवून व तेथे

बसून चांगल्या संवयी लावाव्या. हॉटेलांतील वातावरणहि शुद्ध राखण्याचा प्रयत्न करावा. कोणास शक्य असेल तर ह्या नव्या धर्तीवर हॉटेल सुरूं करावें व या चांगल्या गोष्टींची लोकांना संवय लावावी. मुलांच्या शाळेजवळ हॉटेल नसावें व घाणेरडे पदार्थ विकणाऱ्या फेरीवाल्यांना मास्तरांनी शाळेजवळ फिरकूं देवूं नये.

---

## प्रकरण ७ वें

# शिक्षण व मनोरंजन--समितीचें कार्य व मार्गदर्शन

### शिक्षणाची हेळसांड




खेड्यांतून शिक्षणाची बरीच आबाळ होत असलेली दिसून येते. पुष्कळ ठिकाणीं तर शाळाच नसतात व मग तेथील मुलें ढोरा-

रच्या गावीं असलेल्या शाळेंत शिकावयास जातात. ह्या मुलांना रोज ४–५ मैलांची तरी रपेट होते. जेथे शाळा असतात तेथे शाळेची इमारत अपूरी असते. मुलें दाटीवाटीने जणूं कांही एकमेकांच्या मांडीवर बसलेलीं दिसतात. पुरेसे शिक्षकहि नसतात; एकेका शिक्षकाला २–३ वर्ग एकदम चालवावे लागतात. शिक्षकांचे पगार अगदी कमी व तेहि महिन्याच्या महिन्याला मिळाले तर अधिकाऱ्यांची मोठीच मेहेरबानी. कधी कधी पगार २–४ महिन्यांनी मिळतात. तोपर्यंत शाळेंत शिक्षक घरच्या प्रपंचाची व आर्थिक अडचणींची बेरीज करीत असतात. कधीकधी दुसऱ्या गांवाहून येऊन शिक्षक शाळा घेतात व शाळा सुटतांच आपल्या गांवीं परत जातात. त्यांच्या बदलीचें तंत्र जनपद–मेंबरांच्या राजकारणावर अवलंबून असतें. सारांश मुलांच्या शिक्षणाची खेड्यांतून आधीच सोय कमी आणि जेथे सोय असेल तेथे अनेक अडचणींमुळे शिक्षकांचे शिकविण्यांत लक्ष कमी. जेथे शिक्षक व शाळा असेल तेथे शाळेंत जाणारीं मुलें कमी अशी अत्यंत कींव येण्यासारखी खेड्यांतील शिक्षणाची परिस्थिति आढळून येते.

वास्तविक पाहातां खेडूत जमिनीचा कर भरतो व सरकारी तिजोरींतील बराचसा पैसा करांच्या रुपाने खेड्यांतूनच येतो. तेव्हा खेड्यांतील मुलांच्या शिक्षणाची सोय करून घेण्याचा हक्क खेडुतांनाच अधिक आहे; पण ते ह्या कामीं लक्ष घालीत नाहीत व मुलांना शाळेंत पाठविण्यासहि फारसे उत्सुक नसतात. त्यामुळे त्यांच्यावर अनेक अनर्थपरंपरा कोसळतात. अज्ञानामुळे शेतीचें नुकसान होतें, रोग पसरतात, निरनिराळीं व्यसनें लागतात व शेवटी शेतकरी कर्जबाजारी होतो. वऱ्हाडसारखा संपन्न प्रदेश सुद्धा अज्ञानामुळे व शिक्षणाच्या अभावीं दरिद्री झाला आहे. तेथे पूर्वी सुबत्ता होती. खेडेगांवांतील पाटील आपल्या पोराला म्हणावयाचे, "बाबू ! कशाला

शाळेंत जातोस ? शिकून तुला काय नोकरी करावयाची आहे ? तुझी ४ तिफण जमीन आहे, तुला काय कमी आहे ?" ह्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. शिक्षण नसल्यामुळे होती ती ४ तिफण जमीनहि बाबूला सांभाळतां आली नाही व ती कर्जापायीं सावकाराच्या घशांत गेली. आतां लोकांचे डोळे उघडले आहेत; पण फार उशीरा. जी स्थिति वऱ्हाडची तीच जवळ जवळ भारतांतील सर्व खेड्यांची झाली आहे. शिक्षणाच्या अभावीं सारसर्वस्व गमाविल्यावर मजुरी-साठी खेडुत शहराकडे पळतात व खेडीं उजाड पडूं लागतात.

## खेड्यांतील शिक्षण

खेड्यांतील आजचें शिक्षण शेतकऱ्यांच्या मुलांना फारसें उप-योगीं असतें असें नाही. त्याच्या पुढील जीवनांत त्याचा त्याला फारसा उपयोग होत नाही. ५–६ वर्ग झालेला खेडुताचा मुलगा कांही कारणानें किंवा पैशाच्या अभावीं घरीं बसला तर तो शेतकऱ्याला डोईजड होतो. त्याच्या संवयी व गरजा वाढलेल्या असतात. शेतांत नांगर धरणें त्याला कमीपणाचें वाटतें किंवहुना नांगर त्याला पेलतच नाही. गांवांत कोणती पिकें केव्हा पेरतात ह्याचेंहि त्याला ज्ञान नसतें; त्यामुळे शेतकऱ्याचा मुलगा शिकून एकतर शहरांत नोकरीसाठी हिंडतो किंवा नुसता घरीं बसून त्याला डोईजड होतो.

अशा ह्या परिस्थितींत शिक्षण–समितीला काय करतां येईल हें पाहिलें पाहिजे.

खेड्यांतील शाळा–मास्तर ह्या शि. स. त असल्यामुळे त्यांच्या अडचणी त्यांच्याकडूनच समजावून घ्याव्या व त्या दूर करण्याचा प्रयत्न करावा. मास्तरांचें लक्ष शाळेंतच राहील असें वातावरण निर्माण करावें. गांवाबद्दल मास्तरांना कळकळ असलीच पाहिजे; कारण त्याची सुधारणा घडवून आणण्यांत त्यांचा मोठाच वाटा

असतो. शाळेच्या इमारतीची दुरुस्ती, शाळेची अपूरी जागा इ. प्रश्न विकास–मंडळाने हातीं घ्यावेत. शाळेची दुरुस्ती श्रमदान–यज्ञाद्वारे गावकऱ्यांकडूनच करून घेतां येण्यासारखी आहे. शाळेची जागा कमी पडत असेल तर गांवकऱ्यांनी वर्गणी करून नवीन शाळा बांधण्याचा उपक्रम करावा. शाळेंत प्रत्येकाचा कोणी ना कोणी शिकत असतोच; तेव्हा शाळेची गरज आज ना उद्या सर्वांना असणारच हें लोकांना पटवून द्यावें; म्हणजे पुरेशी वर्गणी जमविणें अधिक सोयीचें होईल. गरिबांकडून वर्गणी पैशाच्या रुपांत न घेतां श्रमदानाच्या रुपांत घ्यावी. वर्गणीचा उपयोग शक्यतों इमारतीचें लांकूड, विटा वगैरे सामान खरेदी करण्याकडे करावा. सर्वांनी श्रम करून बांधलेल्या शाळेचें महत्वं कांहीं निराळेंच असतें. गावांतील एकजूट, समता, परोपकार–बुद्धि व संघशक्ति ह्यांचें तें एक जिवंत स्मारकच दिसेल. असें स्मारक म्हणजे गावाचें भूषण ! शाळेसाठी मदत करण्यास सहसा कोणी कुरकुर करीत नाहीत असा अनुभव आहे.



## प्रसन्न वातावरणाची आवश्यकता

शि. स. च्या सभासदांनी शाळेचें वातावरण प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करावा; म्हणजे मुलांना शाळेसंबंधी एक प्रकारचें आकर्षण वाटेल. शाळेभोंवती मुलांना एक बाग करावयास लावावी, शाळा स्वच्छ ठेवण्याचीहि मुलांना संवय लावावी, मुलांना बसावयास तरटें वगैरे आणून द्यावीत, निरनिराळ्या खेळांचीं साधनें मुलांना उपलब्ध करून द्यावींत व त्यांच्या कामांत–खेळांतच नव्हे तर प्रत्येक उप-


क्रमांत वेळोवेळीं उत्तेजन देऊन त्यांचा उत्साह वाढवावा. अनुभव असा आहे की गावांतील पुढाऱ्यांचें शाळेकडे लक्ष नसतें; फक्त प्रभात-फेरी किंवा इतर वेळीं, जेव्हा जास्त उपस्थितीची आवश्यकता असते तेव्हा, हक्काची उपस्थिति म्हणून मुलांना आणून सभेंत बसवावयाचें किंवा प्रभात-फेरींत नेऊन आरडाओरडा करावयास लावावयाचें हें कटु सत्य आहे. मुलें बसतात कोठे, त्यांना बसावयास भरपूर जागा आहे किंवा नाही, खेळांचीं कोणतीं साधनें त्यांचे जवळ आहेत, मास्तरांच्या कांहीं अडचणी आहेत काय ह्यांकडे शि. स. च्या सभासदांनी बारकाईने लक्ष द्यावयाला पाहिजे.

## शिक्षणाची आवड वाढवा

शाळेची व शाळा-मास्तरांची अडचण दूर केल्यावर लोकांना मुलें शाळेंत पाठविण्यास सांगावें. ७ वर्षांवरील मुलगा घरीं राहूं नये असा दंडकच घालून द्यावा. गावकऱ्यांच्या सभेंत ह्यावर जोर द्यावा. ७ वर्षांवरील शाळेंत न येणाऱ्या मुलांची यादी करून त्यांना नियमीतपणे शाळेंत पाठविण्याविषयी त्यांच्या आईबापांचीं मनें वळवावींत. ह्याप्रमाणे गावांतील सर्व मुलें शाळेंत येतील असें उत्साह-वर्धक वातावरण निर्माण करावें. सणावाराला मुलांना खाऊ द्यावा. त्यांच्या हस्तकलेचें, चित्रकलेचें, गाण्याचें, अभिनयाचें व खेळांचें प्रदर्शन भरवून बक्षीसें वाटावींत. अशीं बक्षिसें किमती नसलीं तरी चालतील; गावांतील मोठ्या लोकांकडून त्यांची सोय करावी. ह्या उपक्रमाने मुलांचा हुरूप वाढेल व तीं अधिक उत्साहाने शिकण्यांत लक्ष घालतील.

शाळेसाठी पडीत जमीन मिळवितां आल्यास उत्तमच; मात्र ती शाळेपासून फार दूर असूं नये. शाळेंतील मुलांना नेहमी त्या जमिनीवर नेतां यावें. तेथे शेतीचीं प्रात्यक्षिकें त्यांना दाखविण्याची व्यवस्था करावी. मास्तरांनी निदान एक-दोन तास तरी त्यांना

शेतावर नेऊन तेथेच आपले वर्ग घ्यावेत, शेतकामांची माहिती सांगावी व तासभर शारीरिक श्रमहि करवून घ्यावेत. लहान लहान प्लॉट्स पाडून त्या प्लॉट्सची जबाबदारी एकेका वर्गाकडे




सोंपवावी. अगदी खालच्या वर्गांतील मुलें नुसतें अवलोकन करून शिकतील व चौथीपासून सातवीपर्यंतचीं मुलें जबाबदारीने एकेका प्लॉटची शेती करतील अशी योजना आंखावी. प्रत्येक प्लॉटमध्ये निरनिराळ्या प्रकारचें खत घालावें. वेळ उरल्यास गांवांतील गरीब शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन काम करावयास वा चांगल्या चांगल्या शेतांचें निरीक्षण करण्यास हरकत नाही.

**परिश्रमाचा मोबदला**---वर्गांतील ३० मुलांनी एक तास निंदण केल्यास गरीब शेतकरी सुद्धा त्यांना खाऊच्या स्वरुपांत, फूल ना फुलांची पाकळी, थोडाफार मोबदला देऊं शकेल. शेतकरी बऱ्यापैकी असल्यास पूर्ण मोबदला घ्यावा व तो पैसा कधी शाळेकडे लावावा तर कधी मुलांना स्वतःकरिता खर्च करूं द्यावा; म्हणजे शिकतां शिकतां कमाई करण्याचा आनंदहि त्यांना लाभेल.

मुलांना सुरुवाती सुरुवातीला नांगर पेलणें जमणार नाही; तशी अपेक्षाहि नाही; पण संवयीने त्यांना तें शिकतां येईल, पेरणी करतां येईल, निंदण करतां येईल, कपाशी वेचतां येईल, ज्वारी खुडतां येईल व मळणी करतां येईल. सारांश शाळेंत शिक्षण घेत असतांनाच खेडुतांचा मुख्य धंदा जो शेती त्याची माहिती त्यांच्या मुलांना झाल्यास प्रसंगीं त्यांना घरीं बसावें लागलें तरी शारीरिक श्रमाची संवय कायम राखल्यामुळे त्यांना कोणतेंहि काम जड जाणार नाही. हंगामाचीं सर्व कामेंहि मुलांनी शाळेच्या वा इतर शेतांतून

प्लॉटवरच प्रत्यक्ष अभ्यासावीत. उघड्यावर प्रत्यक्ष १–२ तास घालविल्यास त्यांच्या आरोग्यांतहि सुधारणा होईल. स्वावलंबनाची संवय लागेल ती वेगळीच. मधून मधून शेती–खात्याचे तज्ञ आणून मुलांना शेतीबद्दलची शास्त्रीय माहितीहि करून द्यावी.

## सामाजिक कार्याची गोडी

ह्यानंतर मुलांचें लक्ष विकास–मंडळाच्या कार्याकडे वळवावें आणि गांवांत चाललेल्या एकंदर सुधारणेचें त्यांना ज्ञान करून द्यावें. स्वतःचा गांव आदर्श करण्याच्या दृष्टीने त्यांच्या मनांत आस्था उत्पन्न करावी. प्रभात–फेरी, गांव–सफाई आदि कार्यक्रमांद्वारे मुलांत सामाजिक कार्यासंबंधी गोडी उत्पन्न करावी; म्हणजे पुढे ते बहुसंख्येने गावांची उन्नति करण्यास मनःपूर्वक हातभार लावतील.

## ग्रामोद्योगाच्या शिक्षणाची सोय

मुलांची सर्वांगीण प्रगति करण्यासाठी त्यांना आपल्या गांवांत चालणाऱ्या ग्रामोद्योगांची माहिती करून देणें आवश्यक आहे. मुलांच्या कलानुसार जें शिकतां येईल तें शिकण्याची सोयहि शि. म. च्या सभासदांनी करावयास पाहिजे. गावांतील हुशार मुलें धंदेशिक्षण घेण्यासाठी बाहेरगावीं पाठविण्याकरिता वर्गणीद्वारे त्यासंबंधीचा खर्च गावाने उचलावा. शिकून आल्यावर त्यांनी स्वतः घेतलेलें शिक्षण गावांतील आणखी ४–५ मुलांना तरी दिलेंच पाहिजे असें बंधन त्यांच्यावर घालावें. ह्या उपक्रमाद्वारे गांवांत निरनिराळ्या धंद्यांची वाढ होण्यास मदत होईल.

## शारीरिक विकासाची जोड

शाळेंतील बौद्धिक शिक्षणाबरोबरच निरनिराळ्या खेळांसाठी त्यांचे संघहि तयार करावे; म्हणजे त्यांचा शारीरिक विकास होऊन संघशक्तिबरोबरच चुरस व खेळाडुपणाहि वाढीला लागण्यास मदत होईल. जिल्ह्यांमध्ये अशा संघाचे आंतर्सामने ठेवून पारितोषिकें


देण्याचा उपक्रम करतां आल्यास उत्तमच. आपल्या गांवांतील मुलांचा संघ मेहनत घेऊन तयार करण्याचा प्रयत्न शि. स. च्या सभासदांनी व शिक्षकांनी चुरशीने करावा. गावांत मारुतीचें देऊळ असेल तर आखाडा तयार करून मुलांना कुस्ती, मल्लखांब वगैरे शिकवून तयार करावे. शि. स. च्या सभासदांनी एकदां हें शिक्षणविषयक काम पत्करल्यावर तनमनधनपूर्वक तें यशस्वी करून दाखवावें. शाळेच्या कामांत ढवळाढवळ न करतां मुलांमध्ये मिसळून, त्यांच्याबरोबर खेळ खेळून त्यांच्याशी समरस व्हावें व उद्दिष्ट कार्य त्यांच्याकडून करून घ्यावें. ह्या समितींत शिक्षकांचा समावेश करावा; म्हणजे गावाच्या व विकास–मंडळाच्या मदतीने त्यांनाहि आपापलें कौशल्य दाखविण्याची संधि मिळेल.

सुट्टीच्या दिवशीं मुलांच्या सहली काढणें, त्यांना निरनिराळ्या यात्रेंत नेऊन त्यांच्याकडून स्वयंसेवकांचीं कामें करून घेणें, गावांतून हिंडवून गावांची स्वच्छता कशी ठेवावी ह्यांचें त्यांना शिक्षण देणें, ग्रामसेनेसारखी त्यांची गावांसाठी एक सेना तयार करणें इ. शेकडों कामें त्यांच्या कडून करून घेतां येण्यासारखीं आहेत. त्यांच्याशी प्रेमाने वागून, त्यांच्या गुणांचें कौतुक करून, मधून मधून सणावाराला त्यांना कांही खाऊ देवून हीं कामें करावयाला उद्युक्त करणें ह्या स. च्या सभासदांचें मुख्य काम ठरतें. गावांतील पुढाऱ्यांबद्दल लहान पिढींत प्रेम व आदर वाढीला लागल्यास त्यांच्याकडून पुढे आदर्श गांवासाठी कितीतरी कामें करून घेतां येतील. त्यांना हंसत–खेळत शिस्तीचें शिक्षण मिळून पुढील आयुष्यांत जबाबदारीने कामें करण्याची संवय लागेल. चांदण्या रात्रीं गप्पा–गोष्टीद्वारे त्यांचें देशप्रेम व शील वाढीला लावावें. वाचनालयांतील पुस्तकें वाचावयास देवून त्यांचा वाचनाचा छंद वाढवावा. करमणुकीसाठी लहान लहान नाट्यप्रसंग, गाणीं, प्रहसनें, पोवाडे वगैरेंचें शिक्षण देवून त्यांच्यांतील सुप्त नाट्यगुण वाढवावें व त्यायोगे खेडुतांत ज्ञानाचा प्रसार करावा.

निरनिराळे शाहीर, नकलाकार वगैरे कलावंतांचे खेडुतांसाठी कार्यक्रम घडवून आणावें. सामुदायिक प्रार्थना, भजनमंडळें वगैरेंमध्ये त्यांना हौसेनें भाग घेण्यास उद्युक्त करावें; म्हणजे त्यांच्या उपजत गुणांचा विकास खेळीमेळीनें होत राहील. सार्वजनिक उत्सव, जयन्त्या वगैरे प्रसंगीं त्यांच्यावर जबाबदारीचीं कामें सोंपवून तीं पार पाडण्याची संवय लावावी.

## स्त्री–शिक्षण

खेडेगावांत मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्या शिक्षणा-बद्दलहि कळकळ वाढवावी. सुरुवातीला मुलांच्या शाळेंतूनच मुलींच्या शिक्षणाची सोय करावी. पहिल्या चार वर्गांपर्यंतचें मुलामुलींचें शिक्षण एकत्रित व्हावयास हरकत नाही. त्यानंतर मात्र मुलींच्या शिक्षणाची दिशा बदलवून त्या आदर्श गृहिणी कशा होतील ह्याकडे लक्ष द्यावयाला पाहिजे. घराची स्वच्छता, मुलाबाळांची स्वच्छता, त्यांचे नीटनेटके व स्वच्छ कपडे, आजारांतील प्रथमो-पचार, मितव्यय, घराची सजावट वगैरेंचा स्त्री–शिक्षणांत समावेश करावयाला पाहिजे; तरच आजची मुलगी उद्याची आदर्श गृहिणी बनून त्यांचे संसार



सुखाचे होतील. शाळेंतील शिक्षणा–व्यतिरिक्त खाजगीरित्या एखाद्या घरीं गृह–शिक्षण मिळण्याची व्यवस्था करतां आल्यास उत्तमच. गावांतील सुशिक्षित गृहिणींनी आपापल्या घरीं मुलींचे वर्ग घेतल्यास त्यांना स्वयंपाक, आरोग्य, निवडणें–टिपणें, शिवणकाम, भरतकाम, मुलांचें आरोग्य सांभाळणें वगैरे बद्दलचें शिक्षण देतां येईल. स्त्री–शिक्षिकेवर ह्यासंबंधीची सर्व जबाबदारी सोंपवावी.




सणावारीं स्त्रियांचें सम्मेलन बोलावून हळदी–कुंकवासारखे समारंभ करावे. व्याख्यानांद्वारे वा प्रात्यक्षिकांद्वारे घाणीपासून रोगजंतु कसे निर्माण होतात व त्यांवर कोणते प्रतिबंधक व निवारक उपाय योजावेत हें मुलींना व इतरहि स्त्रियांना समजून सांगावें. प्रौढ मुलींना पुरुषाच्या कमाईचा संसारांत काटकसरीने कसा उपयोग करावा व घरांतील आनंद कसा वाढवावा ह्यांचे पाठ सोदाहरण द्यावयाला हवेत. घरगुती गोष्टीं-व्यतिरिक्त स्वसंरक्षण, खेळ, व्यायाम वगैरे मैदानी गोष्टींतहि त्यांना उत्तेजन द्यावें; म्हणजे त्यांचा आत्मविश्वास वाढीला लागेल. स्त्री-शिक्षिका निवडतांना शक्यतर शाळा–मास्तरांच्या पत्नीला प्रथम संधि द्यावी. पति–पत्नि दोघेहि शिक्षक असतील तर परस्परांचें काम एकमेकांना पूरक ठरेल. हें न जमल्यास मास्तरांच्या पत्नीकडे गावांतील मुलींच्या गृहशिक्षणाची जबाबदारी तरी सोंपवावयास मुळीच हरकत नाही. वेळीं मास्तरहि आपल्या पत्नीचें योग्य प्रकारें मार्गदर्शन करूं शकतील. ज्या लहान गावांत शाळा नसतील तेथें त्या सुरूं करण्याचा प्रयत्न शि. स. ने करावा. अशा शाळा सुरूं होईपर्यंत गावांतील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी शि. स. च्या सभासदांनी व गावांतील सुखवस्तु लोकांनी उचलावी. शिक्षणासारखें पवित्र काम ह्यांनीं घेतल्याने सुखवस्तु लोकांचा वेळ सत्कारणीं लागेल ह्यांत संशय नाही. देवाने त्यांना जें उदंड आयुष्य दिलें तें सार्थकीं लागेल.

## प्रौढ–शिक्षण

प्रौढ–शिक्षणाचें काम अत्यंत चिकाटीचें आहे. प्रौढांत साक्षरता निर्माण करण्यासाठी पुष्कळच प्रयत्न करावा लागतो. त्यांचे कामधंदे व इतर उद्योग सोडून विश्रांतीचा वेळ ते असल्या कामांत घालवूं इच्छित नाहीत. ह्यासाठी प्रौढ–शिक्षणाचे वर्ग घेतांना खेडुतांची


भरपूर करमणूक होईल व त्याबरोबरच त्यांचें मनोरंजनहि होईल अशी कांहीतरी व्यवस्था करून मग त्यांतूनच थोडीशी अक्षरओळख करून द्यावी. खेड्यांतील लोकांचा धार्मिक गोष्टींकडे फार कल असतो. ह्या त्यांच्या उपजत कलाचा फायदा घेऊन सुरुवातीला रामायण किंवा तत्सम कोणत्यातरी धार्मिक ग्रंथाचें वाचन सुरूं करून लोकांना एकत्रित जमण्याची संवय लावावी. ह्यासाठी सोयीची वेळ रात्री साडेआठ ते दहापर्यंतची. एखाद्या सामुदायिक ठिकाणीं (देवळांत, चावडीवर किंवा खुल्या मैदानांत) प्रथम सामुदायिक प्रार्थनेपासून सुरुवात करावी; म्हणजे एकप्रकारचें पवित्र वातावरण निर्माण होण्यास मदत होईल.

त्यानंतर एखादें चांगलेसें वर्तमानपत्र मागवून त्यांतील ठळक ठळक मजकूर खेडुतांना वाचून दाखवावा व अशा रीतीने गांवा-



बाहेरच्या जगाची थोडीफार तोंडओळख करून द्यावी. शक्यतर जिल्ह्यांतील वार्तापत्र बोलवावें व आपल्या तालुक्यांत व जिल्ह्यांत काय चाललें आहे ह्याची त्यांना कल्पना द्यावी. मासिकांतील एखादी गोष्ट, उपयुक्त मजकूर, शेती–उद्योगधंद्यांची माहिती वगैरे वाचून दाखविण्याचाहि परिपाठ ठेवावा. पोवाडे, गाणीं–भजन म्हणण्यासहि उत्तेजन द्यावें. त्यांतूनच पुढे गावासाठी कलापथक निवडावें. साक्षरता–प्रसाराच्या दृष्टीने उपयुक्त असे संवाद त्यासाठी गावठी भाषेंत बसवून घ्यावेत. ह्या सर्वांचा साक्षरतेची आवड निर्माण होण्याकरिता उपयोग होईल.

लोकांना एकत्रित जमण्याची संवय लागल्या-वर फळा वगैरे ठेऊन रोज, अगदी थोडा वेळ कां होईना, साक्षरतेचे धडे द्यावे. गावासाठी एक वार्ताफलक तयार करावा व त्यावर विकास मंडळाच्या सूचना, देशांतील ठळक बातम्या वगैरे जाड व मोठ्या अक्षरांत लिहून ठेवण्याचा



उपक्रम सुरूं करावा. हे सर्व लोक हौसेनें वाचतील आणि वाचतां न येणाऱ्यांत वाचावयाला शिकण्याची इर्ष्या निर्माण होईल.

### प्रौढशिक्षणाची व्यापकता

प्रौढांना शिकवितांना ते फक्त निरक्षर आहेत; त्यांना लिहितां व वाचतां येत नसले तरी त्यांचें व्यवहारज्ञान पुष्कळदां बिनतोड असतें हें विसरूं नये. वेळीं आपणासच त्यांच्याकडून तें शिकण्यासारखें असतें. साधे हिशेब त्यांना समजतात, करतां येतात. त्यांच्याशी सभ्यतेने व आदरपूर्वक बोलावें, वागावें व प्रेमळपणे आपलेसें करावें. नुसतीं अक्षरें लिहिणें-वाचणें हेंच कांही प्रौढशिक्षण नव्हे. आरोग्य, शेती-उद्योगधंदे, संशोधन, समयोचित राजकारण ह्या सर्वांचा प्रौढशिक्षणांत समावेश करावा. ह्या सर्वांची त्यांच्यांत साक्षरतेची आवड निर्माण होण्यास मदत होईल. हें काम अत्यंत चिकाटीचें व मेहनतीचें आहे; त्याबद्दल कळकळ व जिव्हाळा असल्याशिवाय तें तडीस जाणार नाही. निरक्षरांच्या वर्गाच्या वेळीं समितीच्या सभासदांनी स्वत:च्या उपस्थितीने त्यांना प्रोत्साहन द्यावें आणि बोलण्या-चालण्याने त्यांच्यांत आत्मविश्वास निर्माण करीत असावें. त्यांच्यापैकी कोणीहि मूर्ख नाही; सारे शहाणे आहेत व प्रयत्नपूर्वक त्यांना सहज साक्षर होतां येईल एवढी त्यांच्या मनाची तयारी झाली की पुढील काम विशेष कठीण नाही. एकंदरींत प्रौढ-शिक्षणाचा वर्ग म्हणजे गावांतील लोक-शिक्षणाचें व्यासपीठच समजावें. तज्ञांचीं व्याख्यानें, कलापथकांचे कार्यक्रम, प्रचार-कार्य वगैरे येथेच व्हावींत व रोजच्या कार्यक्रमांत नाविन्य आणीत असावें. इतर समितींच्या सभासदांनीहि आपापले प्रचाराचे कार्यक्रम, व्याख्यानें वगैरे येथेच करावींत. गावांत एकदा एक गट शिकवून तयार झाला की साक्षरतेचें लोण आपोआप पसरत जातें. प्रथम-प्रथमच लोक जमण्यास व पहिला गट साक्षर होण्यासच वेळ लागतो.

### वाचनाची गोडी

गावांतील इतर लोकांना मदतीला घेऊन ४-६ वर्ग चाल-

विण्यासहि हरकत नाही. स्त्रियांसाठी स्वतंत्र वर्ग व तेहि शक्यतो स्त्रियांकडूनच चालवावेत. वाढत्या साक्षरतेच्या जोडीला वाचनालयांतील सोपीं सोपीं पुस्तकें ठेवावींत; म्हणजे साक्षरता आत्मसात् होण्यास मदत होते व वाचनाचीहि गोडी लागते. निरक्षर लोकांना शिकवितांनाच नव-साक्षर लोकांना अलग बसवून वाचनाची गोडी लावण्याचेहि प्रयत्न चालू असावेत. ह्या कामाकरिता शेतकऱ्यांच्या फुरसतीच्या काळाचा (उन्हाळ्याचा) उपयोग करावा. शाळांतील मुलांच्या पाट्या-पुस्तकेंहि ह्या दिवसांत वापरावयास मिळवितां येण्यासारखीं आहेत. दिवाबत्तीचा खर्च वर्गणी जमवून वा एखाद्या श्रीमंत नागरिकाकडून भागवावा.

## मनोरंजन-समितीचें कार्य

शिक्षण-समितींत मनोरंजन समितीचाहि अंतर्भाव अशासाठीं केला आहे की मनोरंजनांद्वारेच शक्यतो शिक्षण व्हावें व त्याचा प्रचारहि करतां यावा. प्रत्येक गावांत भजनी लोक असतातच; त्यांना मनोरंजन-समितींत घ्यावें. सरकारी समाज-शिक्षण-खात्यातर्फे चालविलेल्या कलापथकाकडूनहि ह्या बाबतींत बरेंच मार्गदर्शन होऊं शकेल. कलापथकासाठी उपयुक्त पोवाडे, संवाद, गाणीं वगैरे वाचनालयासाठी सुचविलेल्या पुस्तकांतून गोळा करावीत किंवा समाज-शिक्षण-खात्यातर्फे मिळवावें. गावठी भाषेंत तीं खेड्यांतहि तयार करून घेतां येतील. तमाशासारखें लोकरंजनाचें अत्यंत यशस्वी साधन, त्यांतील अश्लील भाग वगळून, प्रचारासाठी उपयोगांत आणतां येईल. ह्या कला-पथकाचे कार्यक्रम शेजारच्या खेड्यांतून, यात्रेच्या प्रसंगी वगैरे ठिकाणीं करतां येतील व त्यांतून मिळणाऱ्या मुशाहिऱ्यांत प्रयोगासाठी लागणारें नेपथ्याचें सामानहि घेतां येईल. ह्याच मनोरंजनाच्या कार्यक्रमांत कीर्तनें, भजनें, नाटकें वगैरे प्रकारांच्या दृष्टीनें इष्ट असे कार्यक्रम ठेवतां येण्यासारखे आहेत.

**वार्ताफलकाची उपयुक्तता**—गावांत प्रमुख जागीं किंवा चावडी-

जवळ एक स्थायी वार्ताफलक तयार करून घ्यावा. भिंतीवर सिमेंटचें प्लास्टर केल्यास उत्तम वार्ताफलक तयार होतील. भिंतीवर ३–४ फूट सिमेंटचा थर देऊन त्यावर फळ्याला लावावयाचा काळा रंग लावावा; म्हणजे त्यावर खडूने लिहितां येईल. ह्याकरिता साधारणत: ५ रुपये खर्च येतो; तो विकास–मंडळाने वर्गणींतून करावा.

**रेडिओची सोय––**सरकारकडून समाज शि. केंद्रातर्फे कांही गावांत रेडिओ–सेट्सहि दिले गेले आहेत. त्यांपैकी एखादा रेडिओ आपल्या गावाकरिता मिळविण्याचा प्रयत्न करावा किंवा खेड्यांत कोणाकडे रेडिओ असल्यास खेडुतांच्या मनोरंजनासाठी त्याचा उपयोग करावा. मुंबई व नागपूर केंद्रांवरून सायंकाळीं खेडुतांसाठी खास कार्यक्रम होतात; ते खेडुतांना ऐकवावें. शक्य झाल्यास विकास मंडळानेहि रेडिओ खरेदी करण्यास हरकत नाही. रेडिओच्या कार्यक्रमांना हजर राहणाऱ्यांचें एक उपस्थितिपत्रकहि तयार करावें; म्हणजे गावांत नियमीत किती लोक रेडिओ ऐकावयास येतात हें समजून त्यांच्यांतील जिज्ञासा वाढीला लावण्याचे प्रयत्न करतां येतील. रेडिओ–केंद्रांना त्यांवर होणाऱ्या उपयुक्त कार्यक्रमांसंबंधी नेहमी आपलीं मतें कळवावींत; आपल्या गावाची प्रगतीहि कळवावी. आवश्यक वाटल्यास सल्ला विचारावा व विधायक सूचनाहि कराव्यात. रेडिओवरील बातम्या लोकांना ऐकवाव्या व जगांत काय चाललें आहे ह्याचें त्यांना सोप्या शब्दांत ज्ञान करून द्यावें. यापैकीच्या ठळक ठळक बातम्या वार्ताफलकावरहि लिहाव्यात.

**सामाजिक व नैतिक विकास––**लोक–शिक्षणाचा एक भाग म्हणून समितीच्या लोकांनी सर्वसाधारण जनतेंत सत्य, शील, उद्योगप्रियता वगैरे सामाजिक व नैतिक गुणांचा विकास घडवून आणावयास हवा. आपल्या उत्तम व प्रेमळ वागणुकीने ह्या सभासदांनी इतरांना धडा घालून द्यावा. जुगार, आजकाल गावोगावीं बोकाळलेला सट्टा, दारूबाजी व इतर सर्व दुर्व्यसनांपासून आपलें गांव अलिप्त

ठेवण्याचा प्रयत्न करावा. परस्परांविषयी विश्वासाचें व आदराचें वातावरण निर्माण करावें. भांडणें वगैरे शक्य तो होऊं देऊं नयेत व झाल्यास प्रेमाने व निःपक्षपातीपणाने तीं निकालांत काढावीत.

**वाचनाकरिता पुस्तकांची सोय व व्यवस्था**--वाचनालयांतील पुस्तकांत साक्षरता, सामान्यज्ञान, आरोग्य, शेती, जनावरांची जोपासना, ग्रामोद्योग वगैरे खेडुतांना उपयुक्त अशा पुस्तकांचा समावेश करावा. त्याशिवाय प्रचारात्मक पोवाडे, नाटिका, संवाद वगैरे संबंधीहि पुस्तकें संग्रहीं ठेवावींत. वर्गणी जमेल त्याप्रमाणे पुस्तकें गटागटानें खरेदी करावीं व त्यांचें पद्धतशीर रजिस्टर ठेवून खेडुतांना पुस्तकें जपून वापरण्यास शिकवावें. शक्यतर दैनिक वर्तमान-पत्र बोलवावें, साप्ताहिक पत्रें व उद्यमसारखीं खेडुतांना उपयुक्त मासिकेंहि मागवावींत. गावांत कोणाकडे कांही मासिकें येत असतील तर तीं सर्वांच्या वाचनासाठी उपयोगांत आणावींत. स्वतंत्र वाचना-लयाची सोय नसल्यास सार्वजनिक जागेवर, शाळेंतून किंवा इतर सोयीस्कर जागीं, वर्तमानपत्रें ठेवावींत व पुस्तकें शि. स. च्या एखाद्या सभासदाकडे ठेवून व तीं रजिस्टरमध्ये नोंदून लोकांना वाचावयास द्यावींत. सार्वजनिक जागींहि प्रौढ-शिक्षणाचे वेळीं तीं वाचावयास ठेवावीं. हें काम एखाद्या मास्तरकडे सोंपविल्यास अधिक सोयीचें होईल.

## प्रकरण ८ वें

# स्थापत्य–समितीचीं कामें व त्यांसंबंधीचें मार्गदर्शन

### एक पंथ दो काज

स्थापत्य किंवा बांधकाम–समितीला मुख्यतः खालील कामें गांवकऱ्यांकडून करून घ्यावयाचीं आहेत––

(१) सांडपाणी शोषणारे खड्डे (सोकपिट्स) (२) संडास (३) गुरांचे गोठे (४) मुत्रीगृहें (५) आदर्श घर (६) गांवांतील सडका (७) गांवाकडे येणाऱ्या प्रवेश–सडका [मोठ्या सडकेस जोडणाऱ्या (Approach Roads)] (८) दवाखाना (९) पशु–औषधालय (१०) विकाससभेची कचेरी (११) अतिथीगृह (१२) सूतिकागृह (१३) शाळा (१४) विहीर (१५) वाचनमंदिर (१५) सार्वजनिक मंदिर इ.

यापैकी कांही कामें केवळ खाजगी स्वरुपाचीं आहेत व त्यांचा सर्व खर्च ज्यांना त्यांनीच करावयाचा आहे. स्थापत्य–समितींतील लोकांनी फक्त पुढाकार घेऊन कमी खर्चांत त्यांचीं कामें अधिक उपयुक्त आणि सोयीचीं कशीं होतील याकडे लक्ष द्यावयास हवें व त्या बाबतींत खेडुतांना प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन करावयास हवें.

या समितींत गांवांतील मुख्यतः गवंडी, सुतार, कुंभार, मजूर वगैरे लोक व कांही सुशिक्षित लोक यांचा भरणा असावा. म्हणजे गावांतील सर्व दर्जाच्या लोकांना गांवाच्या उन्नतींत आपला वाटा उचलतां येईल व त्यांना कामधंदाहि मिळेल. आपल्या गांवांतील संपत्ति आपलीच आहे; ती गांवाच्या बाहेर शक्यतो न जाऊं देतां

सचोटीने मार्गदर्शन केलें तर पुष्कळ लोक त्यांचें मार्गदर्शन तर स्विकारतीलच; पण शक्य तितक्या कमी पैशांत खेडुतांचीं कामें उपयुक्तता व कलेच्या दृष्टीने उत्तम ठरल्यास त्यांच्या कलेचें एक प्रकारचें प्रदर्शन होऊन इतर गांवांतहि त्यांना भरपूर काम मिळेल.

## समितीच्या सभासदांची पात्रता

सार्वजनिक इमारतींचीं कामें खेडयांतून यशस्वी रीतीने पार पाडून दाखविणें फार अवघड आहे. अठराविश्वे दारिद्र्यामुळे पैशाची मुख्य अडचण, एकमेकांतील खाजगी भांडणें व पक्ष यांमुळे एकमेकां-वरील अविश्वास, विश्वासू, आस्थेवाइक व सचोटीने काम करणाऱ्या माणसांचा अभाव यांमुळे या समितीचें काम सर्वांत अवघड व मोठ्या जिकीरीचें आहे. तें काम यशस्वी रीतीने, गांवांत कसलाहि वाईटपणा किंवा पैशाच्या बाबतीत अफरातफरीचे लोकापवाद निर्माण न होतां करावयाचें म्हणजे त्यासाठी हिशेब अगदी स्वच्छ ठेवणारे व काटेकोर-पणाने खर्च करणारे, तसेंच प्रसंगीं स्वत: झीज सोसण्याची तयारी असलेलेच सभासद या समितीत पाहिजेत. नाहीपेक्षा या समितीमुळे इतर ग्रामविकासाच्या कामांत अडचणी व आपापसांतील वाईटपणा वाढण्याची शक्यताच जास्त. या गोष्टीची जाणीव या समितीतील सभासदांनी ठेवून आपलें काम चोख बजाविलें पाहिजे.

## मदतीचे मार्ग

सार्वजनिक बांधकाम हातीं घेतांना त्या व्यवसायांतील तज्ञां-कडून त्याच्या खर्चाचा अंदाज घ्यावा. जनपदचे ओव्हरसीयर हे काम सहज करूं शकतील. बांधकाम हातीं घेतांना उपयुक्ततेच्या दृष्टीने त्याला प्राधान्य द्यावें. समजा गांवांत शाळा नाही, मुलांचें शिक्षण होऊं शकत नाही अशा वेळीं शाळेस प्राधान्य द्यावयास नको का ?

सार्वजनिक काम हातीं घेतांना मुख्य अडचण पैशाची येते. त्यासाठी गांवांतील एखादा सत्य संकल्पाचा दाता भेटल्यास त्याचें मन प्रेमाने जिंकून व गांवाची प्रतिष्ठा वाढली म्हणजे गांवकऱ्यांचीहि

वाढली अशी त्याची समजूत घालून त्याच्याकडून सार्वजनिक इमारतीसाठी कांही रक्कम मिळवावी. त्याची इच्छा असेल तर त्याचें नांव इमारतीस देण्यास हरकत नाही. मात्र अशा वेळीं इमारतीसाठी लागणारी संपूर्ण रक्कम नांवाशी संबंधित असलेल्या एका माणसानें किंवा त्याच्या कुटुंबांतील व्यक्तींनी मिळून द्यावी.

सार्वजनिक इमारतीच्या मदतीसाठी गांवांत कोणी दाता न भेटल्यास गांवांतील कांही सुखवस्तु लोकांकडून वर्गणी जमवून पैसे मिळविण्याचा एक मार्ग अवलंबितां आला तर पाहावा. अशा वेळीं गांवांतील फक्त सुखवस्तु लोकांचेंच हें काम आहे असें समजून मध्यमवर्गीयांना किंवा मजूरवर्गीयांना नुसती मजा पाहात राहणेंहि फारसें चांगले नाही. सार्वजनिक कामांत एखाद्यास पैशाची मदत करतां येणें गरिबीमुळे शक्य नसेल; पण गांवाच्या उन्नतीची जर खरी तळमळ त्याला असेल तर श्रमदानासारखें कांही काम करून त्याबद्दलची मजूरी तो मागणार नाही. त्याचे हें श्रमदान श्रीमंताच्या पैशाइतकेच मोलाचे आहे अशी समज व शिकवण गांवकऱ्यांना द्यावी, म्हणजे श्रीमंत–गरिबांचें भांडण या सार्वजनिक कामांत विघ्न म्हणून येणार नाही व सर्वांच्याच श्रमाचें दृश्य फळ म्हणून गांवांत एखादी उपयुक्त अशी सार्वजनिक इमारत दृश्यमान होवून साऱ्या गांवकऱ्यांच्या श्रमाची व एकीची ग्वाही इतर गांवकऱ्यांना देईल व त्यांच्यांतहि ही नवी प्रेरणा व नवशक्ति निर्माण करील.


## श्रमदानाची थोरवी

श्रमदानाचें हें तत्व देवाच्या पूजेइतकें श्रेष्ठ व अभिमानास्पद आहे याची जाणीव खेडुतांना भाषणांतून, पद्यांतून, संभाषणांतून किंवा मनोरंजन-मंडळाच्या कार्यक्रमांतून करून द्यावी. श्रमदानामध्ये आपण दुसऱ्यासाठी कांही करीत आहों ही जाणीव मनाला सात्विक आनंद देते. खरें पाहिलें तर त्यांत स्वतःचा स्वार्थहि आहेच. समजा गांवांतील एखादी सडक बांधतांना किंवा दवाखाना बांधतांना एखाद्या

खेडुताने श्रमदान केलें तर तें सार्वजनिक काम खरेंच; पण तयार होणाऱ्या रस्त्यावरून हा खेडूत चिखलाने पाय न भरवितां सुखाने जाणार, बैलाला चाबूक न मारतां आपली धान्याने भरलेली गाडी हाकणार किंवा दवाखान्याचा स्वत:साठी किंवा बायकामुलांसाठी फायदा घेणारच. जी गोष्ट एकट्याने शक्य नाही ती थोड्याशा एकीने व संघशक्तीने श्रमदानामुळेच शक्य होते एवढें एकदा खेडु-ताच्या मनांत रुजलें की चावडीवर एकमेकांच्या कुटाळक्या करीत न बसतां तो चांदण्या रात्रीं, फावल्या वेळी किंवा प्रसगीं आपलें काम बाजूला सारूनहि श्रमदानांत भाग घेईल. मात्र त्याला मार्गदर्शन करणारे व विश्वासांत घेऊन त्याला श्रमदानाचें महत्त्व पटविण्याचें काम कुशलतेने करणारे सभासद या समितीत असावयास हवेत.

## पैसा उभारणें

सार्वजनिक कामासाठी पैसे मिळविण्याचा एक उपाय म्हणजे आपल्यावर गांवांतील लोकांनी एकमताने निरनिराळे कर लादून घेणें हा होय. त्या पैशांतून सार्वजनिक इमारती बांधाव्यात. उदा. खेडुताने आपल्या घरचें एक पायली धान्य विकलें की एक आणा ग्रामविकास-फंड भरावा, एक खंडी कापूस विकला की एक रुपया ग्रामविकास-फंडांत भरावा. मोटारीचा रस्ता गांवांतून जात असेल तर गांवाच्या स्टँडवर मिळणाऱ्या भाड्याच्या उत्पन्नावर प्रत्येक रुपयास एक आणा याप्रमाणे मोटार-मालकां-कडून ग्राम विकास-फंड घ्यावा. हे तिन्ही उपाय दर्यापूर तालुक्यांतील येवदा या गांवी सुरू केले असून




त्यामुळे पुष्कळच फंड गोळा होत आहे. मोटार-मालकांनीहि एजंटला कमिशन देतांना रुपयास एक आणा या फंडांत वर्गणी देणें सुरू केलें आहे.

आणखी एक उपाय म्हणजे मनोरंजन–समितीतर्फे नाटक किंवा मनोरंजनाचे खेळ करून त्याचें उत्पन्न सार्वजनिक इमारतीच्या फंडाला द्यावयाचें हा होय. अशा वेळीं मनोरंजन–समितीने प्रयत्नांची शिकस्त केल्यास पुष्कळ पैसे गोळा होतात असा अनुभव आहे. संच मात्र उत्तम असावयास हवा. इतर खेडोपाडींहि प्रचार करावयास हवा व साऱ्यांनी गांवाचें काम म्हणून आत्मीयतेने झटावयास हवें. सार्वजनिक इमारतीसाठी गावकऱ्यांनी एखादा धंदा करून त्यांत मिळणाऱ्या फायद्याचा गांवाच्या सार्वजनिक इमारतीसाठी उपयोग करतां येतो. त्या दृष्टीने विटा बनविणें, कोंबड्या पाळणें, डेअरी चालविणें, गांवांत तलाव असल्यास मासे पाळणें यांसारखे उद्योग करून गांवकऱ्यांना पैसे मिळवितां येतील.

सार्वजनिक इमारतीसाठी फंड गोळा करण्याचे हे उपाय येथे सुचविले आहेत. गांवोगांवच्या परिस्थितिनुरूप योग्य ते उपाय योजून या समितींतील लोकांनी पैसा उभा करावा. उपयुक्ततेच्या दृष्टीने कामास प्राधान्य द्यावें. पैशाचा अंदाज तज्ञांकडून आखून घ्यावा, इमारतीचा नकाशा काढून घ्यावा व नंतर कामास सुरुवात करावी. पैशाचा हिशेब नीट ठेवून व काटकसरीने योग्य तो पैसा खर्च करून खेडुतांचा या समितींतील लोकांनी आपल्यावरील विश्वास वाढवावा; म्हणजे लोकांकडून योग्य ती मदत मिळून सार्वजनिक इमारतीचे काम व्यवस्थित हाताळतां येईल व इतर गांवकऱ्यांना धडा घालून दिल्याचें श्रेय लाभेल. उलटपक्षीं लोकांना संशयास्पद वाटेल अशा हिशेबामुळे किंवा अन्य व्यवहारांनी या समितींतील लोकांवरील खेडुतांचा विश्वास नाहीसा होऊन गांवांत अविश्वासाचें वातावरण उत्पन्न होईल व त्यामुळे इतर गांवांच्या लोकांनाहि निरुत्साह वाटेल व त्यांना अत्यंत वाईट धडा घालून दिल्यासारखें होईल. या समिती-तील सभासदांनी ह्या गोष्टी सतत डोळ्यांपुढे ठेवल्या पाहिजेत व आपल्या स्वार्थामुळे स्वतःचें, गांवाचें व पर्यायाने राष्ट्राचें नुकसान


आपल्या हातून होणार नाही याची डोळ्यांत तेल घालून खबरदारी घेतली पाहिजे.

### गांवांतील सडका


खेडेगांवांत प्रवेश करतांच या सडकांच्या घाणेरडेपणामुळे माणसाला एक प्रकारची किळस येईल इतक्या त्या घाणेरड्या असतात. सडका स्वच्छ व पद्धतशीर बांधलेल्या असतील तर गांवाचें स्वरूप एकदम बदलून जाईल व खरोखरीच शहर खेड्यापुढे तुच्छ ठरेल. त्या स्वच्छ व पद्धतशीर बांधलेल्या, सांडपाण्याची नीट व्यवस्था असलेल्या, रस्त्यांत घाण नसलेल्या अशा असावयास पाहिजेत. पावसाळ्यांत त्यांवर गुडघाभर चिखल नसावा व खेडूत आणि त्यांचीं गुरेढोरें त्यांवरून सुखाने जावींत अशी कोणत्या खेडुताची इच्छा नसेल ? फक्त समितीतील लोकांनी पुढाकार घेऊन त्यांचें मार्गदर्शन करावयास हवें. प्रथम एखाद्या मोहल्ल्यांतील सडक त्या मोहल्ल्यांतील लोकांच्या मदतीने करावयास घ्यावी. आपल्या घरापुढील सडक स्वच्छ असेल तर घाण येणार नाही. जंतु वाढणार नाहीत व मलेरियासारखे रोग फैलावणार नाहीत याची खेडुतांना जाणीव करून द्यावी. एखाद्या मोहल्ल्यांतील सडक अशी फारशी लांब नसणार. त्या मोहल्ल्यांत राहाणाऱ्या लोकांस तें काम फारसें जडहि जाणार नाही. सर्वांनी श्रमदानाच्या भावनेने खपल्यास, ज्याच्याजवळ गाडी आहे त्याने गाडी-बैल दिल्यास, जो सधन आहे त्याने आर्थिक मदत केल्यास हें सार्वजनिक काम तेव्हाच हातावेगळें करतां येईल.

**आखणी**--जी सडक तयार करावयाची ती प्रथम आखून घ्यावी. मध्ये कोणाची पायरी, रस्त्यावर टाकलेलीं लाकडें किंवा अशी कांही अडचण असेल तर सामोपचाराने मालकाला समजावून सांगावें व ती घरासमोरील अडगळ दूर करावी. नंतर बाजूची किंवा अन्य जागेची माती आणून त्या सडकेवर सहा इंची थर द्यावा. जेथे रस्ता अरुंद असेल तेथे नाली काढण्याच्या भानगडींत पडूं नये, कारण त्यामुळे आधीच अरुंद असलेला रस्ता आणखी अरुंद होईल

आणि गाडी वगैरे जाण्यास अडचण पडेल. खेडेगांवांतील रस्त्याच्या मध्यावर पाणी जावयास खोल रस्ता करतात किंवा झालेला असतो; तसा तो नसावा. खालील चित्रांत दाखविल्याप्रमाणे रस्ता मध्ये साधारणपणे १ फूट उंच व दोन्ही बाजूस उतार असलेला असा असावा. रस्त्याचें पाणी बाजूच्या भिंतींवर वाहून जाऊन त्या खचूं नयेत म्हणून ज्यांनी त्यांनी, आपापल्या भिंतींशी थोडे दगड रचून व माती टाकून थोडें उंचवट्यासारखें करावें म्हणजे रस्त्यांतील पाणी भिंतीपासून





थोड्या अंतरावरून वाहून जाईल. रस्ता मध्ये उंच करण्यासाठी १:३६ या प्रमाणांत म्हणजे ३ फुटास १ इंच याप्रमाणे रस्त्याच्या दोन्ही बाजूस उतार ठेवावा. उदा. रस्ता ९ फूट रुंद असेल तर मध्यंतरी दोन्ही बाजूंपेक्षा ३ इंच उंच ठेवून रस्त्याच्या बाजूंना उतार करावा. जमिनीवर माती टाकतांना किंवा रस्त्यावर टोळ, गिट्टी व मुरुम टाकून रस्ता तयार होतांना या प्रमाणांत उतार राहून रस्ता तयार होईल अशी खबरदारी घ्यावी.




अ. मुरुम, ब गिट्टी, क. मोठाले गोटे, ड. माती.

**बांधणी**—प्रथम सहा इंच मातीचा थर, नंतर मोठाल्या गोट्यांचा सहा इंची थर, त्यावर वारीक गिट्टीचा सहा इंची थर आणि वर तीन इंची मुरुम टाकून आणि प्रत्येक वेळीं पाणी टाकून रूळ फिरवावा व रस्ता तयार करावा (बाजूची आ. पाहा). सर्वच गांवांतून टोळ, गिट्टी किंवा मुरुम मिळणार नाही. तर जेथे जें मिळेल त्याचाच उपयोग करावा. टोळ व गिट्टी यांच्याऐवजी साधारण लहान–मोठ्या आकाराचे दगड, मोठे दगड खाली व लहान वर याप्रमाणे बसवून मुरुम न मिळाल्यास पिवळी माती किंवा

मुरुमाड मातीचा थर द्यावा. यांपैकी कांहीहि शक्य नसेल तर सहा इंच मातीचा थर देऊन त्यावर सहा इंच वाळूचा थर द्यावा (बाजूची आकृति पाहा). खूप पाणी टाकून रोलर फिरवावा. त्यामुळे मातींत वाळू सिमेंटसारखी रुतून बसेल व साधारण प्रकारचा रस्ता अल्प किमतींत तयार होईल.




अ. वाळू, ब. माती.

सडका तयार करण्यास पाण्याची टंचाई नेहमीच भासते. यासाठी पावसाळ्याच्या सुरुवातीस हें काम हातीं घ्यावें म्हणजे पाण्याची अडचण दूर होऊन खर्चाची बचत होईल. गांवांत शक्य असेल त्या मोहल्ल्यांत अशी एक चांगली सडक तयार झाली की तिच्यापासून मिळणारें 'सुख' व सोय गांवकऱ्यांच्या चट्कन मनांत भरतात. आपल्या मोहल्ल्यांतहि अशीच सडक असावी असें इतरांना वाटूं लागते व ते त्वरीत कामास लागतात असा अनुभव आहे. अशा रीतीने हें लोण सर्व गांवांत पसरतें व गांवांतील सडका आपोआप तयार होतात.

**मोठ्या सडका**–(गांवापर्यंत येणाऱ्या प्रवेश–सडका)


ह्या मात्र गांवांतील सडका तयार झाल्यावर हें काम हातीं घ्यावें; म्हणजे गांवांतील इतर सडका करतांना मिळालेला अनुभव उपयोगीं पडेल. या सडकांना गांवकऱ्यांनी श्रमदान करूनहि बराच खर्च येईल. त्यासाठी त्या सडकांच्या खर्चाचें अंदाजपत्रक तज्ञाकडून करून घ्यावें व प्रथम खर्चाची सोय करून नंतरच त्या सडकांचें काम हातीं घ्यावें. विकास योजनेच्या क्षेत्रांत या सडकांना लागणाऱ्या खर्चाची अर्धी रक्कम विकास योजनेकडून मिळते. असा फायदा ज्यांना घेतां येईल त्यांचें खरोखरीच सुदैव. पण आपण या योजनेचा-सुद्धा घ्यावा तसा फायदा घेत नाही. सडका तयार झाल्यावर आपला शेतीचा माल वाटेल तेव्हा बाजारांत नेणें सोयीचें व किफायतशीर




होईल ही गोष्ट खेडुतांच्या मनावर समितीच्या लोकांनी बिंबवावी व त्यांना असल्या कामांत आर्थिक व इतर साहाय्य देण्यास उद्युक्त करावें. गांवांतील प्रवेश–रस्त्याची प्रथम तज्ञाकडून आखणी करून घ्यावी व रस्ता कोणाच्या शेतांतून येत असल्यास त्याची लेखी परवानगी स्था. स. च्या सभासदांनी त्यांस विनंती करून सामोपचाराने मिळवावी.

रस्ता चांगला रुंद करावा. साधारण १८ फुटांपेक्षा तो कमी रुंद नसावा. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी, साधारणतः दीड ते दोन फूट रुंद व १ फूट खोल नाली असावी. मध्यंतरी रस्त्याची उंची १ : ३६ या प्रमाणांत असावी. उंच रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी सारखा उतार असावा म्हणजे पाणी नाल्यांतून वाहून जाण्यास मदत होईल (वरील आकृति पाहा). रस्त्यावर प्रथम ६ इंच मातीचा थर, ६ ते ९ इंच टोळ (मोठे दगड), ६ इंच गिट्टी व तीवर २ इंच मुरुम असा क्रम असावा. नाल्या खोदून जमिनीवर तीच माती पसरावी. टोळ न मिळाल्यास नदींतील मोठे गोटे आणावें. मुरुम न मिळाल्यास पिवळी माती उपयोगांत आणावी. गिट्टी टाकल्यावर रोलर, मिळाल्यास इंजीनचा किंवा बैलांचा, फिरवावा व नंतर मुरूम व पाणी टाकून पुन्हा रोलर फिरवावा. कित्येक ठिकाणीं दगडांचा फारच तुटवडा असतो. अशा ठिकाणी नदी जवळच असेल तर स्वस्तांत थोड्या हलक्या प्रतीची पक्की सडक करतां येणें शक्य आहे. प्रथम सडकेवर त्यासाठी ६ ते ९ इंच मातीचा थर देऊन त्यावर ३ इंच वाळूचा थर द्यावा व पाणी टाकून रोलर फिरवावा. पुन्हा ३ इंच वाळूचा थर देऊन पाणी टाकून रोलर फिरवावा. त्यामुळे मातींत

वाळू चांगली आवळून बसते व छान रस्ता तयार होतो.




झाडांची सावली

हीं कामें पावसाच्या सुरुवातीस सुरू केल्यास पाण्याचें दुर्भिक्ष टाळतां येईल व खर्चहि कमी येईल. या सडकांच्या दोन्ही बाजूंना निंब, आंबे वगैरे जातीच्या झाडांची लागवड करावी; म्हणजे सडकेवर सावली राहील (बाजूची आ. पाहा).

## सार्वजनिक व खाजगी संडास

सार्वजनिक संडास गांवाच्या बाहेर ज्या दिशेने वारा वाहतो त्याच्या विरुद्ध दिशेस असावे म्हणजे दुर्गंध वाऱ्याबरोबर गांवांत येणार नाही. संडास साधारण उंचावर असावे. नाहीपेक्षा पाण्याने भरून सर्वत्र घाण होण्याचा संभव असतो. स्त्रियांकरिता दूर अंतरावर वेगळे संडास असावे. गांवांत सर्व गांवकऱ्यांनी मिळून एक भंगी-जोडपें ठेवल्यास तें गांवाचें काम सांभाळूं शकतें. गांवाबाहेर खताचे खड्डे करून त्यांत हा मळ नेऊन टाकण्याची सोय केली व या खताचा दर वर्षीं लिलाव केला तर भंग्यांच्या पगाराचा बराचसा हिस्सा त्यांतून वसूल होतो असा अनुभव आहे. स्था. स. ने आरोग्य स. च्या मदतीने असे पक्के संडास व मळ नेऊन टाकण्यास खताचे खड्डे तयार करवून घ्यावे. हे संडास पक्के बांधतां येतील किंवा चराचे संडास कच्च्या स्वरुपांतहि बांधतां येतील. स्वत:च्या घरीं संडास करावयाचा असल्यास तो पुढील दारीं न करतां मागील दारीं करावयास हवा व गांवांत भंग्यांची सोय करावयास हवी. भंग्यांची सोय नसेल तर चरांचे संडास उत्तम. त्यासाठी २ ते २।। फूट रुंद, ३ ते ४ फूट खोल व २० फूट लांब असा चर खणावा. त्या चरावर सेवाग्राम पद्धतीचे चाकें लावलेले फिरते संडास ठेवावें. संडास भरत आल्यावर तो चराच्या लांबीच्या बाजूने पुढे सरकवावयाचा असतो. अशा रीतीने चर भरल्यावर त्यावर माती टाकून सोनखत तयार होण्यास मदत


## फिरते संडास




करावी. या पद्धतीत भंग्यांची आवश्यकता नाही. मात्र हे खड्डे पाण्याने किंवा मातीने भरून जाणार नाहीत अशी दक्षता घ्यावी.

**सामुग्री**—४ इंची ६ वल्ल्या, मध्यंतरी आधारासाठी पडपें व डांवरांत रेती फसविलेले तट्टे, खिळे, मजुरी, खालच्या बाजूस संडास सरकविण्यासाठी चाकें इ. सामुग्री लागते.

हा संडास ४० ते ५० रुपयांत खेडेगांवी सुतार बनवू शकेल. गांवातील धनिक लोकांनी हे संडास तयार करून दिल्यास एकावरच भार न पडतां हें काम सहज शक्य आहे. सुरुवातीला स्त्रियांसाठी ४ व पुरुषासाठी ४ असे निदान ८ तरी संडास असावे, पुढे शक्य होईल तशी त्यांची संख्या वाढवावी. पक्के संडास बांधावयाचे असल्यास ४ संडास एकास एक लागून बांधावे. अशा चार संडासांना एक गट ठेवावा. अशा ४ संडासांच्या गटास अंदाजे रु. ५०० खर्च येईल. पक्की भिंत न बांधतां पडपें ठोकून त्यावरून डांबर लावलेला तट्टा ठोकल्यास ४ संडासांच्या एका गटास २०० रु. पर्यंत खर्च येईल




अ. अंगण, ग. गोठा, क–ख कोठी, द. दिवाणखाना,
श. शयनगृह, प. पडवी, ड. खाजगी खोली,
– स. स्वयंपाकघर, म. मोरी.




उभी बाजू
(Cross Section)


**आदर्श किसानगृह**—खेड्यांतील शेतकऱ्यांच्या गरजा लक्षांत घेऊन पुढे आदर्श घराचा एक नमूना सुचविला आहे (वरील नकाशा पाहा).


घर बांधावयाचें म्हणजे त्याला खर्च हा लागणारच. शेतकरी एका लहानशा झोपडींतहि आपला गुजारा करूं शकतो. पण खेडीं आदर्श करावयाचीं म्हणजे तेथे आजच्या युगांतील विज्ञानाचा शक्यतो फायदा घेऊन शेतकऱ्यांनाहि राहावयास किमान ऐसपैस घर असावें. तें स्वच्छ असावें व शेतीच्या सर्व काम–काजाचा वापर त्याला त्या घरांत करतां यावा. किमतींत काटकसर करावयाची तर तें मातीचें बांधतां येईल किंवा पडपें ठोकूनहि करतां येईल. पण अशा घरास

वारंवार दुरुस्ती लागेल व तीं फार तर २५–३० वर्षेपर्यंत टिकतील. घराचा नकाशा येथें सुचविला आहे. ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणें त्यांत आर्थिक दृष्टचा सोयीस्कर व त्या गावांत स्वस्त मिळणारा माल वापरून असें घर बांधतां येईल. त्यांत जागेच्या दृष्टीनेहि फेरफार करतां येईल. सर्व गांवाला सोयीस्कर असा नकाशा सुचविणें फारच अवघड आहे. या घरांत एक मोठा दिवाणखाना, आल्या–गेल्यासाठी एक खाजगी खोली, स्त्रियांची खोली, स्वयंपाकघर, मोरी, शेतीचें सामान ठेवण्यास कोठी, शेतींतून आलेला माल वाळत घालण्यास अंगण, तो माल साफ करण्यास पडवी व जनावरें बांधण्यास गोठा इ. सोयी आहेत.


**गुरांचे गोठे**––हे बांधतांना स्वच्छ व मलमूत्र वाहून नेण्यास उताराची जमीन, वाऱ्याचा झोत गुरांच्या अंगावर येणार नाही अशा प्रकारे खेळती हवा, उजेड, थंडी आणि पाऊस यांपासून संरक्षण करणाऱ्या गव्हाणी इतक्या आवश्यक गोष्टी विचारांत घ्याव्या लागतात.


**पशु–औषधालय, ग्रामविकास कचेरी व दवाखाना**––पैशाची बचत करण्याकरिता ही एका छपराखालीच घेतली आहेत. खालील आकृतीवरून याची स्पष्ट कल्पना येईलच. भोवताली अंगण सोडलें आहे.




उभी बाजु
(Cross Section)









उभी बाजु
(Cross
Section)

**शाळा**--खेड्यांतील मुलांची उपस्थिति लक्षांत घेऊन कमी खर्चांत इमारत व्हावी म्हणून एकाच छपराखाली सहा वर्गांची सोय करण्यांत आली आहे (वरील चित्र पाहा). त्यापैकी ४ वर्ग बंदिस्त अशा मोकळ्या हवेच्या पडव्यांत आहेत व मधल्या खोल्यांत २ वर्गांची सोय केली आहे. मधल्या खोल्यांत उजेड राहावा म्हणून बाजूने खिडक्या व छपरापाशीं उजेडासाठी थोडा भाग बंदिस्त पण जाळी लावून तयार केला आहे. जेथे शक्य असेल तेथे मोठी प्रशस्त शाळा बांधतां येईलच.

**सार्वजनिक मंदिर**--हें बहुधा प्रत्येक खेड्यांत असतेंच येथे

दिलेली मंदिराची कल्पना थोडी वेगळी आहे. मंदिरासाठी एक बंदिस्त जागा बांधून त्यापुढे दीड फूट उंचीचा व ४०–२० फूट एवढ्या लांबी–रुंदीचा ओटा असावा. मंदिरांतील सामुदायिक प्रार्थना, भजन वगैरे कार्यक्रम पाऊस नसतांना खेडूत या ओट्यावर बसून ऐकूं शकतील व तेथे सर्व धर्मांचे लोकहि आनंदाने बसूं शकतील. मंदिरांत मूर्ति न ठेवतां भाविकांनी आपली इष्ट देवता कल्पावयाची आहे, त्यामुळे कोणत्याहि धर्माच्या माणसाला तेथे प्रवेश राहून बंधुभावाची भावना जागृत राहील. मनोरंजनाचे व प्रचाराचे कार्यक्रमहि इथे चांगले होऊं शकतील आणि मंदिराच्या सान्निध्यामुळे तेथील वातावरणहि पवित्र राहील. गांवाच्या हिताचें व पर्यायाने राष्ट्रहिताचें पवित्र कार्य या मंदिरात व्हावें व देशबांधवांच्या राष्ट्रप्रेमाची प्रचाररूपी पूजा या मंदिरांत व्हावी.







**अतिथी–गृह**––हें पाहुण्यांच्या सोयीसाठी आहे. हे पाहुणे गांवांत गांवहिताच्या निरनिराळ्या गोष्टींसाठी सल्ला देण्यास येणारे सरकारी कर्मचारी, प्रचार करणारे व गांवाच्या हितासाठी मार्गदर्शन करणारे असावेत. तेथे उतरल्याने खेड्यांतील जीवनाची त्यांना जाणीव व्हावी अशी तेथील व्यवस्था असावी. खेड्यांतील वाचनालयहि तेथेच ठेवण्यास हरकत नाही. तेथे गांवाची एकंदर परिस्थिति व प्रगति पाहुण्यांना दिसून येईल असे तक्ते लावलेले असावेत (वरील चित्र पाहा).

**सूतिकागृह**––४ बाळंतिणींची सोय होऊं शकेल एवढे तें असावें. स्वतंत्र न्हाणीघर, स्वयंपाकाची खोली व कचेरी एवढ्या गोष्टींचा समावेश त्यांत असावा.

**बाजार**—प्रत्येक खेड्यांत रोज लहानशी गुजरी साधारणत: भरते. त्याची सोय स्थापत्य–समितीने करून द्यावयास हवी. विकणाऱ्यांना व गिऱ्हाइकांना उन्हापावसाचा त्रास होणार नाही या दृष्टीने बाजाराची आखणी करावी. बाजारांत विक्रीस बसणाऱ्यांकडून दर महिना कांही भाडें घेतलें तर कांही वर्षांनी इमारतीची रक्कम वसूल होणें शक्य आहे. गावांत आठवड्याचा मोठा बाजार भरत असेल तर तेथील जागांना अधिक भाडें येऊं शकेल.

**सार्वजनिक विहीर**—सार्वजनिक विहिरीवर गुरांच्या पाणी पिण्याची व्यवस्था असावी. त्यासाठी एका बाजूस पाण्याचें टाकें बांधावें. विहिरीजवळच सहकारी तत्वावर पिठाची एक गिरणी उघडावी व त्याच एंजिनवर पाण्याचा पंप बसवावा. या पंपाच्या साह्याने गुरांसाठी पिण्याचें पाणी रोज टाकींत भरतां येईल व त्याच वेळीं गिरणी चालू असल्यामुळे त्याबद्दल खर्च लागणार नाही. पाणी ओढून काढण्यासाठी रहाट बसवावें व बायकांना बसण्यासाठी एक बांकहि ठेवावें (खालील आकृति पाहा).



...4335...

## प्रकरण ९ वें

# ग्रामोद्योग–समिति

### ग्रामोद्योग–समितीचीं कामें

ग्रामोद्योग–समितीला मुख्यतः गांवांतील आर्थिक गोष्टींकडे लक्ष देऊन लोकांचें दैन्य कसें कमी करतां येईल, आर्थिक दृष्टीनें गांव कसा भरभराटीस येईल, तसेच लोक कसे सुखी होतील ह्यांसंबंधी विचार करावयाचा आहे. गांवांतील लोक जर आर्थिक दृष्ट्या सुखी झाले तर गांव आदर्श करण्याचा प्रश्न सहज सुटण्यासारखा आहे.

### शेती व ग्रामोद्योगांची सद्यःस्थिति

आजकाल ग्रामोद्योग फारसे राहिले नाहीत. गांवांतील मुख्य धंदा शेतीचा होऊन बसला आहे व शेती करतांना खेडुतांना पैशाची पदोपदीं नड भासत आहे. ही नड भागविण्यासाठी सरकार तऱ्हेतऱ्हेने मदत करण्याचा प्रयत्न करीत असलें तरी प्रत्यक्षांत ती अत्यंत अपुरी वाटते. शेतीवर मरमर काम करून तयार मालाची पूर्ण व वाजवी किंमत शेतकऱ्यांच्या हातांत पडत नाही. शहरांत विक्रीसाठी गेलेलें धान्य किंवा कापूस दलाल पाडून मागतात व मग येईल ती किंमत घेऊन निराशेनें शेतकऱ्यांना गांवाकडे परत जावें लागते. त्यांतून अवर्षणामुळे नापिकी वगैरे झाली तर शेतकऱ्यांच्या हालांना सीमाच राहात नाही. खेड्यांतील ग्रामोद्योगहि आज पूर्णतः मोडकळीस आलेले आहेत. पूर्वीं भारतांतील खेडीं आपल्या गरजा ग्रामोद्योगांवरच भागवीत होतीं, परंतु आता एकतर खेडुतांच्या गरजा वाढल्या आहेत आणि दुसरें यंत्रांचा प्रचार झाल्यापासून खेड्यांतील उद्योगधंदे बसून गेले आहेत. मिलमध्ये तयार होणाऱ्या तलम व स्वस्त कापडामुळे विणकर स्पर्धेत टिकाव धरूं शकला नाही. केरोसीन

वापरूं लागल्यामुळे गळिताच्या धान्यांपासून तेल काढणाऱ्या तेल्यांचा धंदा मंदावला, विदेशांतून सुबक कातडीं येऊं लागल्यामुळे चांभारांचा धंदा बसला, एनॅमल व ॲल्युमिनियमच्या स्वस्त व सुंदर भांड्यांमुळे कुंभारांचा धंदा डबघाईस आला, परदेशांतील ट्रॅक्टर्स वगैरेंमुळे लोहार व सुतारांचा धंदा मोडकळीस आला. अशा रीतीने यंत्रांच्या युगांत खेड्यांतील ग्रामोद्योग करणाऱ्या कारागिरांना बेकारीचे दिवस प्राप्त झाले.

## समितीचें व्यापक कार्यक्षेत्र

अशा ह्या हलाखीच्या परिस्थितींत ग्रामोद्योग–समितीला खेड्यांतून आर्थिक परिस्थिति सुधारण्याचें अवघड काम करावयाचें आहे. त्यासाठी मूलग्राही अशीं पुढील कामें करावयास हवींत——

(१) खेड्यांतील मुख्य धंदा जो शेती त्यासाठी लागणाऱ्या पैशाची तरतूद कर्ज किंवा तकावीच्या रुपाने शेती–समितीच्या मध्यस्थीने प्राप्त करून देणें. त्यासाठी सहकारी पतपेढ्या स्थापन करणें.

(२) शेतींतून निघणाऱ्या मालाची सहकारी तत्वावर विक्री करून शेतकऱ्यांस त्यांच्या मालाची पुरेपूर किंमत मिळवून देणें.

(३) शेतकऱ्यांना लागणारीं खतें, बीं–बियाणें, जंतुनाशक औषधें वगैरे गांवांतच सहकारी संस्था स्थापून त्यांमार्फत प्राप्त करून देणें.

(४) शेतीला जोडधंदे होऊं शकतील अशा ग्रामोद्योगांचें शास्त्रीय शिक्षण खेडुतांना देणें.

(५) ग्रामोद्योगांना उत्तेजन देणें व कच्चा माल वगैरेंची सोय पाहून नवे ग्रामोद्योग सुरूं करणें.

(६) ग्रामोद्योगांतील मालाचें प्रदर्शन भरवून मालाची जाहिरात करणें व कारागिरांना उत्तेजन देणें.

(७) सहकारी संस्थांतर्फे ग्रामोद्योगांत तयार होणाऱ्या मालाची योग्य किमतींत शहरांतून विक्री करणें.

(८) गांवांत सहकारी तत्वावर सामुदायिक धंदे सुरू करणें व गांवाचा एकंदर आर्थिक दर्जा वाढविण्याचा प्रयत्न करणें.

(९) गांवांतील कर, बाजार वगैरे उत्पन्नाच्या बाबी वाढवून त्यांचा गांवांत गांवकऱ्यांकरिता योग्य विनियोग करणें.

## तकावीचा योग्य विनियोग

खेड्यांत मुख्य धंदा शेतीचा आहे. तो धंदा करणाऱ्या खेडुतांना शेतीच्या खर्चासाठी लागणाऱ्या पैशाची नेहमीच टंचाई भासत असते. ही टंचाई अल्प प्रमाणावर भागविण्यासाठी सरकारतर्फे शेतकऱ्यांना तकावी देण्याची प्रथा आज पुष्कळ दिवसांपासून आहे; पण तिचाहि योग्य उपयोग करून घेतला जात नाही हें कटु सत्य आहे. तकावीचा उपयोग योग्य प्रकारे व ठराविक मुदतींत केल्यास पैशावद्दलची पुष्कळशी टंचाई तर दूर होईलच, पण जमिनीची उत्तम मशागत होऊन शेतकऱ्यांची स्थिति पुष्कळच सुधारेल. यावर सरकारची देखरेख मात्र असावी. पण तकावीचें तत्व कितीहि सुंदर असलें तरी तपशील मात्र तितकासा ठीक नाही. तकावी योग्य ठिकाणीं खर्च न झाल्यास कांही शिक्षा होईल, पुनः तकावी मिळणार नाही असा धाक शेतकऱ्यांना वाटावयास हवा. तकावी ज्या कारणासाठी द्यावयाची त्याच्या थोडी आधी ती वाटली जाईल अशी सरकारनेहि दक्षता घ्यावयास हवी. तकावी वेळेवर मिळवून देऊन व तिच्या योग्य अथवा अयोग्य विनियोगावर शेती–समितीच्या साह्याने ग्रामोद्योग–समितींतील लोकांनी लक्ष ठेवून इतर गांवांना आदर्श घालून द्यावा.

## पतपेढ्यांद्वारे कर्जाची सोय

तकावीशिवाय शेतकऱ्यांना शेतीच्या इतर खर्चाकरिताहि कर्जाची गरज लागते. हें कर्ज गांवांत पतपेढी स्थापून तींतून

## सहकारी पतपेढी



ग्रामोद्योग–समितीच्या लोकांनी मिळवून देण्याची व्यवस्था करावी व त्याचा योग्य कारणासाठी विनियोग होतो किंवा नाही यासंबंधी दक्षता बाळगावी. पतपेढी ही सहकारी तत्वावर उभारलेली व कर्ज देणारी एक सहकारी संस्था आहे. या संस्थेच्या स्थापनेसाठी कमीत कमी १० सभासद असावे लागतात. पतपेढ्यांचें भांडवल सभासदांचे शेअर्स, सभासदांच्या ठेवी व तालुक्याच्या सेंट्रल बँकेकडून मिळणारें कर्ज इ. वर उभारलेलें असतें. सेंट्रल बँकेला ४ टक्के व्याजाने जें कर्ज मिळतें तें सेंट्रल बँक ७ टक्के व्याजाने पतपेढीस देतें व पतपेढी ९ टक्के व्याजाने सभासदांस देते. २० रु. एकरप्रमाणे जास्तीत जास्त ७५० रु. पर्यंत हें कर्ज मिळतें. या कर्जासाठी जमीन पतपेढीकडे गहाण करून द्यावी लागते व पतपेढी अशी जमीन सेंट्रल बँकेकडे गहाण ठेवते असा हा क्रम आहे. यासंबंधी अधिक माहिती ग्रामोद्योग-समितीने गांवांत सेंट्रल बँकेच्या प्रतिनिधींचें व्याख्यान करवून गांवकऱ्यांना द्यावी. पतपेढ्यांकडून कर्ज काढल्याने फसवणूक होण्याची भीति नसते; कारण त्यांचे हिशेब सरकारी ऑडिटरकडून तपासले जातात; त्यामुळे सर्व व्यवहार सुरक्षित व चोख असतात. सावकाराकडून कर्ज काढल्यामुळे होणारे तोटे सर्वांच्या चांगल्याच परिचयाचे आहेत.

### कर्जाचा योग्य विनियोग

या पतपेढ्यांकडून मिळणाऱ्या कर्जाचा तगावीप्रमाणेच

## अनर्थपरंपरा




१. तकावी मिळते. २. लग्नकार्यांत खर्च होते. ३. शेतीची मशागत होत नाही. ४. हंगामावर पीक कमी, पैसे परत करतां येत नाहीत. ५. जमीन विकण्याची पाळी.

---

दुरुपयोग होण्याचा संभव असतो; म्हणून ग्रामोद्योग-समितीच्या लोकांनी हें कर्ज खेडुतांना मिळवून देतांना तें हप्त्या-हप्त्यानें व योग्य कारण दाखविल्यानंतर पण वेळेवर मिळेल अशी सोय केली तर खेडुतांचें कल्याणच होईल. एकदम हातीं आलेली रक्कम कर्जाऊ असल्याचें भान अडचणींत सांपडलेल्या शेतकऱ्यांस राहात नाही व त्यामुळे ती योग्य कारणाम्तव खर्च होत नाही असा अनुभव आहे. ग्रामोद्योग-समितीच्या लोकांनी लोकांत आपल्या सचोटीच्या वागण्यानें विश्वास उत्पन्न करून या रकमेचा योग्य वेळीं व योग्य

ठिकाणीं विनियोग खेडुतांकडून करवावा; म्हणजे शेतीच्या खर्चाचा हा प्रश्न सहज सुटण्यासारखा आहे. नेहमीचा अनुभव असा आहे की पुष्कळ वेळां तकावीची रक्कम शेतीच्या कामीं न लागतां लग्नकार्यांत अवास्तव खर्च होते, त्यामुळे शेतीची मशागत ठीक होत नाही, पीक नीट येत नाही व कर्जाऊ घेतलेली रक्कम हंगामावर न फिटतां कर्जाच्या व व्याजाच्या रुपाने कायमची मानगुटीवर बसते. एकदा ही अनर्थपरंपरा सुरू झाली व त्यांतून एखादें नापिकीचें वर्ष आलें की शेतकरी कायमचा नाडला जातो ही गोष्ट शेतकऱ्यांच्या मनावर ठसविण्याचें काम ग्रामोद्योग–समितींतील लोकांचें आहे.


## शेतकऱ्यांची असहाय्य परिस्थिति

त्यानंतरचा प्रश्न शेतांतील माल शेतकऱ्यांस अधिकाधिक किंमत मिळून कसा विकतां येईल याविषयींचा आहे. नेहमीचा अनुभव असा आहे की पैशाची तंगी भागविण्यासाठी शेतकऱ्यांस वेळीं अवेळीं–मालाला भाव नसतांनासुद्धा– नाइलाजाने आपला माल विकावा लागतो, दलाल लोक शेतकऱ्यांच्या या असहाय्य परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेतात व त्यांचा माल कमी किंमतींत विकत घेतात. याकरिता आपण सरकीचेंच उदाहरण घेवूं या. स्वतःच्या शेतींत पिकलेला कापूस येईल ती किंमत घेऊन शेतकरी व्यापाऱ्यांस विकतो व त्या कापसांतील सरकी पुढे हंगाम नसतांना वाटेल ती किंमत देऊन आपल्या गुरांसाठी विकत घेतो. हंगामावर सरकीचा भाव फार कमी असतो पग पुढे तो इतका वाढतो की शेतकऱ्यांस गुरांसाठी सरकी घेणेंहि कधी कधी परवडत नाही व त्यामुळे दुभत्या जनावरांचें दूध कमी होतें व शेतकऱ्यांचें आर्थिक नुकसान होतें. ही परंपरा नष्ट करण्यासाठी ग्रामोद्योग–समितीने प्रयत्न केले पाहिजेत.

## एक योजना

ग्रामोद्योग–समितीने तालुक्याच्या शेतकी सहकारी संस्थेशी पत्रव्यवहार करून गांवाचा शेतींतील माल विकण्याची एखादी

## सामुदायिक ज्वारी–विक्रीसाठी



योजना आखली तर खात्रीने तें फायद्याचें व शेतकऱ्यांच्या हिताचें होईल. ग्रामोद्योग–समितीने स्थानिक तालुक्याच्या सहकारी शेतकी संस्थेशी विचारविनिमय करून एका ठराविक दिवशीं गांवची ज्वारी विक्रीसाठी शेतकी सहकारी संस्थेच्या ताब्यांत दिली व शेकडा कांही रक्कम अनामत घेऊन शेतकऱ्यांना वाटली तर त्या ज्वारीची सामुदायिक विक्री मोठ्या व्यापाऱ्यांस करणें सोयीचें जाईल व मालास किंमत चांगली येईल. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांची तातडीची अडचण भागेल. शेती–सुधारणा–समितीच्या सभासदांनीहि या कामांत लक्ष घालणें जरूर आहे.

## सहकारी दुकानांची आवश्यकता

तिसरी बाब शेतकऱ्यांच्या शेतीस व प्रपंचास लागणाऱ्या नित्याच्या वस्तू म्हणजे सुधारलेलीं बी–बियाणें, खतें, जंतुनाशक औषधें, संसारोपयोगी वस्तु योग्य त्या किंमतीस मिळवून देणें ही होय. शेतकऱ्यांस आपल्या मालाची किंमत जशी भरपूर मिळत नाही त्याचप्रमाणे त्याला लागणाऱ्या जीवनोपयोगी व शेतीच्या कामाच्या वस्तू योग्य व किफायतशीर भावांत मिळत नाहीत. या बाबतींत व्यापारी लोक त्यांच्या अज्ञानाचा भरपूर फायदा घेतात. ही गोष्ट लक्षांत घेऊन ग्रामोद्योग–समितीच्या सदस्यांनी विविध उद्देशीय सहकारी दुकानें गांवांत उघडलीं पाहिजेत. या सहकारी दुकानांत किफायतशीर भावाने शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या

व इतरहि जीवनोपयोगी वस्तू विकावयास ठेवाव्या. या दुकानासाठी भांडवल सहकारी तत्वावर शेअर्सच्या रुपाने जमा केलें जातें. अशा दुकानांचे हिशेब सहकारी खात्याकडून सरकारीरित्या तपासले जातात व योग्य त्या सूचना सहकारी खात्याकडून दिल्या जातात. अडचण आहे ती फक्त या कामांत लक्ष घालून प्रामाणिकपणाने काम करणाऱ्या लोकांची. ही अडचण ग्रामोद्योग–समितीच्या लोकांनी पुढे होऊन गांवाच्या एकूण कल्याणासाठी दूर केली पाहिजे.

याप्रमाणे खेड्यांतील शेतीविषयक आर्थिक अडचणींचा विचार केल्यावर ग्रामोद्योगासंबंधी ग्रामोद्योग–समितीने विचार करावयास हवा. ग्रामोद्योग मुख्यतः तीन प्रकारचे असतात––

(१) शेतीस पूरक होणारे ग्रामोद्योग.

(२) व्यावसायिक स्वरुपाचे वंशपरंपरागत ग्रामोद्योग.

(३) कोणालाहि करतां येण्यासारखे कुटीरोद्योग.

**ग्रामोद्योगांकरिता पूर्वतयारी**

हे धंदे गांवांत सुरू करावयाच्या आधी खालील गोष्टींचा विचार करावयास पाहिजे––

(१) ग्रामोद्योगांसाठी लागणाऱ्या साधनांची मुबलकता व तीं [illegible]

(२) शेतीस पूरक होतील असेच धंदे शेतकऱ्यांना शिकवावयास पाहिजेत.

(३) ग्रामोद्योगांतील अद्यावत् साधनें व अद्यावत् माहिती खेडुतांना करून द्यावयास पाहिजे.

(४) ग्रामोद्योगांचें अद्यावत् शिक्षण घेण्यास शिष्यवृत्ति देऊन विद्यार्थी पाठविण्याची सोय करावयास पाहिजे.

(५) ग्रामोद्योगांत तयार झालेल्या मालाची विक्री करण्याची सोय करावयास पाहिजे.

(६) ग्रामोद्योगांत तयार झालेल्या मालाचें प्रदर्शन भरवून व कोणत्या मालाची जास्त मागणी आहे त्याची नोंद ठेवून त्या मालाचें उत्पादन वाढविलें पाहिजे.

ग्रामोद्योगांसाठी गांवांत जो कच्चा माल ज्या प्रमाणांत उपलब्ध व स्वस्त असेल त्या प्रमाणांत तयार माल विकणें परवडेल. उदाहरणार्थ–नदीच्या काठीं विटाचा धंदा, बदकें पाळण्याचा धंदा, तळ्याच्या काठीं शिंगाडयांच्या लागवडीचा धंदा किंवा मासे पाळण्याचा धंदा, फळांच्या बागा असतील तर फळांचीं लोणचीं व सरबतें करण्याचा धंदा, जंगल असेल तर गवत वाळवून व त्याच्या गाठीं बांधून त्या शहरांत विकण्याचा धंदा, डेअरीचा धंदा किंवा लाखेचा धंदा, जळाऊ लाकडें विकण्याचा धंदा असे निरनिराळे धंदे त्या त्या गांवांतील परिस्थितिनुरूप करतां येतील.

### ग्रामोद्योगांचें महत्त्व

शेतकऱ्याला शेतीच्या कामाव्यतिरिक्त मुबलक वेळ सापडतो. शेतीच्या मालाचा फायदा घेतां येईल असे पुष्कळ धंदे त्याला करतां येतील. त्या धंद्यांची माहिती व प्रात्यक्षिकें त्याला ग्रामोद्योग समितीच्या सभासदांनी द्यावयास पाहिजेत व आपला फावला वेळ दुसऱ्याची कुटाळकी न करण्याऐवजी ग्रामोद्योगात खर्च करण्यास त्याला प्रवृत्त केलें पाहिजे. या वेळांत कोंबड्या पाळणें, बकऱ्या पाळणें, मेंढ्या पाळणें, डेअरीचा धंदा, मधमाशा पाळणें, झाडांचीं कलमें करणें व तीं विकणें, निरनिराळ्या प्रकारच्या डाळी तयार करणें व त्या विकणें, मिरच्या दळून व त्यांचें तिखट करून विकणें वगैरे धंदे शेतकऱ्याला सहज करतां येण्यासारखे आहेत. डाळी तयार करण्याचा धंदा व्यापारी लोक करतात हें खरोखरच आश्चर्य आहे. वास्तविक हा धंदा शेतकऱ्याला किफायतशीर रीतीने सहज करतां येण्यासारखा आहे. अशा स्वरुपाचे आणखी कितीतरी धंदे शेतकऱ्यांना करतां येतील व ते त्यांच्या शेतीच्या धंद्यास पूरकहि ठरतील. असे



धंदे प्रथम कोणातरी धंदेवाईक माणसाकडून प्रात्यक्षिकाच्या रुपाने शेतकऱ्यांना शिकवावें. सरकारी तज्ञ अधिकाऱ्यांकडून किंवा खाजगी तज्ञांकडून हे धंदे शिकतां येतील. या धंद्यांपासून होणारा आर्थिक फायदा हिशेब दाखवून ग्रामोद्योग समितीच्या लोकांनी शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकाच्या रुपाने पटवून दिला तर विशेष फायदा होईल. शेतकऱ्यांच्या फुरसतीच्या दिवसांत गांवांत असे तज्ञ कांही दिवस बोलावून त्यांच्या जेवणाची व राहण्याची सोय पाळीपाळीने करतां आली किंवा एखाद्या श्रीमंताकडे करतां आली तर हे धंदे सहज शिकून घेतां येतील व ते प्रत्यक्ष केल्याने अनुभवहि वाढेल. प्रमुख धंदा शेतीचा असणाऱ्या शेतकऱ्याला शेतीला पूरक असे ग्रामोद्योग करण्यास उत्तेजन दिलें पाहिजे. हा मुख्य मुद्दा लक्षांत असावा. या सर्व धंद्यांचें शिक्षण देणारीं पुस्तकें "उद्यम" तर्फे प्रसिद्ध झालीं आहेत. तीं वाचनालयांत ठेवावीं व चांदण्यांत किंवा इतर फुरसतीच्या वेळीं शेतकऱ्यांना शिक्षण समितीतर्फे वाचून दाखविण्यांत यावीं.

## यांत्रिक युगाचें प्राबल्य

कांही लोक वंशपरंपरा ग्रामोद्योगच करीत असतात. उदाहरणार्थ–सोनार, शिंपी, कुंभार, बुरूड, सुतार, गवंडीकाम करणारे, लोहार, चांभार, धोबी, तेली, माळी, कोष्टी वगैरे. खेडेगांवीं हे लोक वंशपरंपरा आपला धंदा करीत आले आहेत. जुन्या काळीं खेडीं जेव्हा स्वयंपूर्ण होतीं व लोकांच्या गरजा वाढलेल्या नव्हत्या त्यावेळीं

अनुक्रम
विभाग
क्रमांक

या लोकांचे धंदे भरभराटींत होते. वंशपरंपरा धंदा करीत आल्यामुळे त्यांचें कसबहि असाधारण होतें. डाक्याची मलमल, निरनिराळ्या मंदिरांतील नक्षीकाम, सुंदर मूर्ती, ताजमहालासारखें जगप्रसिद्ध बांधकाम हें त्या त्या धंद्यांतील कसबी लोकांचे नमूने आजहि आपल्याला पाहावयास मिळतात. पण यांत्रिक युग सुरू झाल्यापासून या लोकांची अत्यंत दैना झाली आहे. अशा वेळीं त्यांच्या धंद्यांत त्यांना लक्ष घालावयास लावून व नवीं साधनें उपलब्ध करून देऊन सध्याच्या परिस्थितींत उपयोगी होणारा माल त्यांच्याकडून पिकवून घेतला पाहिजे; तसेच त्याच्या विक्रीची सोय पण केली पाहिजे. आर्थिक दृष्ट्या परवडतील अशीं निरनिराळीं पिकें काढण्यास त्यांना उद्युक्त केलें पाहिजे.

### जुनें तेंच सोनें

असा अनुभव आहे की या लोकांचें त्या त्या धंद्यांतील ज्ञान अद्यावत् नसतें. त्यांचीं आयुधेंहि विशेष कार्यक्षम व अद्यावत् नसतात आणि मुख्य म्हणजे जुनें सोडून जगाबरोबर पुढे धावण्याची त्यांची तयारी व कुवतहि नसतें. उदाहरणार्थ–खेड्यांतील चांभार जुन्या थाटाचीं पादत्राणें बनवील पण सूटकेसेस्, मनीबॅग्स किंवा आजकाल सर्वत्र प्रचारांत असलेल्या चामड्याच्या इतर वस्तु तो बनविणार नाही. त्याकरिता त्याच्यांत कुवत किंवा कार्यक्षमता नसतेच असें नाही; पण तो अशा गोष्टींत लक्ष घालण्यास उत्सुक




अ– सुतारी-साठी शिष्यवृत्ति.
ब– लोहारी.
क– चर्मकला.
ड– शिवण–काम.

नसतो. तीच गोष्ट सुताराची. त्याला माहीत असलेल्या वस्तूंपेक्षा तो इतर कांहीं तयार करण्याचा प्रयत्नच करणार नाही. तें त्याला जमणार नसेल तर फारसें वाईट वाटण्याचें कारण नाही. पण बहुधा त्याच्यामध्ये आस्थेने लक्ष घालण्याच्या मनोवृत्तीची वाणच दिसून येते. ही वृत्ति घातुक आहे व प्रगतीस आळा घालणारी आहे. म्हणून ती नाहीशी झाली पाहिजे. जगापुढे शक्य नसेल पण कोणत्याहि धंद्यांत जगाबरोबर तरी धावावयास आपण तयार असावयास पाहिजे. ग्रामोद्योग समितीच्या लोकांनी नवीं साधनें मिळवून देऊन नव्या वस्तु तयार करण्याची वृत्ति या धंदेवाईक लोकांत निर्माण करण्याचें काम आस्थेने करावयास पाहिजे. आज ज्या उत्साहानें विकास योजनेचें काम चालू आहे तो उत्साह कायम टिकला तर थोड्याच दिवसांत भारतांत खेडोपाडीं वीज मिळू शकेल. तेव्हा विजेच्या साह्याने ग्रामोद्योगास खचित उर्जितावस्था येईल. तशी परिस्थिति व नवचैतन्य या धंदेवाईकांत व त्यांच्या पुढील पिढ्यांत ग्रा. स. च्या कार्यकर्त्यांनी निर्माण करावयास पाहिजे. अशा धंद्यांतील अद्यावत् साधनांचा उपयोग व धंदेशिक्षण देणारीं नवीं नवीं केंद्रें भारतांत उघडत आहेत. तें शिक्षण घेण्यास ग्रामोद्योग समितीच्या लोकांनी गांवांतील होतकरू मुलांना पाठवावें व त्या मुलांना शक्य तर शिष्यवृत्तिहि द्यावी. शिकून आल्यावर गांवांतील आणखी १० लोकांना तरी तो धंदा शिकविण्याची अट त्या विद्यार्थ्यांना घालावी. अशा तऱ्हेने काम केल्यास असल्या शिक्षणाचीं केंद्रें कांहीं दिवसांनी खेडेगांवातच होतील यांत शंका नाही. अशा रीतीने हें लोण खेडोपाडी पसरत जाईल.

कांहीं ग्रामोद्योग तर, थोडेसें ज्ञान मिळाल्यास, खेड्यांमधील सामान्य माणसालाहि सहजसाध्य आहेत. या ग्रामोद्योगांत निरनिराळीं तेलें तयार करणें, मसाले, लोणचीं, पापड वगैरे तयार करणें, सरबतें तयार करणें, उदबत्त्या तयार करणें इ. कुटीरोद्योगांचा अंतर्भाव होतो. जपानमध्ये असले कुटीरोद्योग खेड्यापाड्यांतून

पुष्कळ चालतात. त्यांसाठी अगदी मामुली स्वरुपाची यंत्रसामुग्रीहि उपयोगांत आणली जाते. घरोघरीं कुटुंबांतील माणसांस फावल्या वेळीं त्यांत भाग घेतां येतो. आपल्याला साधेल, झेपेल आवडेल असा–कुटीरोद्योग प्रत्येकाने निवडावा व आपला फावला वेळ, अशा रीतीने सदुपयोगीं लावावा. ग्रामोद्योग समितीच्या लोकांनी असल्या धंद्याचें शिक्षण व प्रात्यक्षिक आपल्या गांवीं मिळण्याची सोय करावी. या धंदेशिक्षणाविषयी बरीच माहिती उद्यममधून वेळोवेळीं प्रसिद्ध झाली आहे व होत आहे; ती खेडुतांना वाचून दाखवावी. असले कांही धंदे गावांत सहकारी तत्वावरहि करतां येण्यासारखे आहेत. गांवांतील कच्चा माल मिळण्याची सोय पाहून असे कांही धंदे गांवांत ग्रामोद्योग समितीच्या लोकांनी सहकारी तत्वावर सुरू करण्याचे प्रयत्न करावें.

## कारागिरांना उत्तेजन द्या

ग्रामोद्योगांत तयार झालेल्या मालाचें सणावारांच्या दिवशीं वारंवार प्रदर्शन भरवीत जावें व चांगल्या मालाला बक्षिसें देत जावीं. असा माल तयार करणाऱ्या कलावंतांचा जाहीर सत्कारहि करावा. त्यामुळे गांवांतील कारागिरांना उत्तेजन मिळून ग्रामोद्योग वाढीला लागतील. अशा वेळीं शक्य तर शहरांतील लोक बोलावून त्यांच्या हातून बक्षिसें वाटावीं; म्हणजे मालाची जाहिरात शहरांत



पोहोंचेल. शहरांत सहकारी संस्थेंत किंवा अन्य चांगल्या ठिकाणीं माल ठेवतां येण्याची सोय करावी व कारागिरांना त्या मालाच्या किंमतीपैकी कांही रक्कम त्वरित मिळण्याची व्यवस्था व्हावी. असा माल विक्रीस ठेवण्याची व्यवस्था व्हावी. त्यासाठी आता मोठ्या शहरांतून सरकारी डेपो उघडले जात आहेत. त्यांचा फायदा ग्रामोद्योग समितीच्या लोकांनी कारागिरांना मिळवून द्यावा. शेजारच्या मोठमोठ्या यात्रा, औद्योगिक प्रदर्शनें वगैरेंमध्येहि हा माल ठेवून मालाची जाहिरात करावी म्हणजे विलायती तेवढेंच चांगलें असा ग्रह करून बसलेल्या शहरांतील सुशिक्षितांना आपल्या खेडुत बांधवांची कला दिसेल व त्यामुळे त्यांचे डोळे दिपतील. आपल्या खेडुत बांधवांबद्दल त्यांना आपुलकी व प्रेम वाटून खेड्यां-बद्दल त्यांची जिज्ञासा वाढेल.

### मानवाचा शत्रु : आळस

आपण आळस टाकून उद्योगाची चिकाटीने पूजा केली तर आपल्याला असाध्य असें कांहीच नाही. असो. ग्रामोद्योग समितीने असा माल तयार करतांना लोकांच्या आवडी व गरजा लक्षांत घेऊन माल तयार केला व त्यांच्या चांगलेपणाची व टिकाऊपणाची एकदा खात्री पटली की माल खपणें कांही विशेष अवघड नाही. परंतु सचोटीने वागून टिकाऊ माल तयार करण्याचें व त्या मालाचा दर्जा शेवटपर्यंत टिकविण्याचें धोरण कायम ठेविलें पाहिजे. व्यापारांतील हीं आत्मसात करण्यासारखीं तत्वें, ग्रामोद्योग करणाऱ्यांना समजावून सांगितलीं पाहिजेत. तें काम ग्रामोद्योग समितीच्या लोकांचें आहे. नागपुरी लुगडीं, बनारसी शालु, सातारी पेढे, सातारी जर्दा, कोल्हापुरी चिवडा असल्या लहान–मोठ्या मालावरून त्या त्या गांवांचीं नांवें आपल्या डोळ्यांपुढे येतात. त्या त्या कलावंतांनी आपल्या गांवाचीं नांवें आपल्या उच्च प्रतीच्या मालांनी त्या त्या धंद्यांत श्रेष्ठ प्रतीचीं ठरविलीं. तसेंच खेडुतांनाहि आपल्या गांवाचें नांव आपल्या श्रेष्ठ कलाकृतींनी आदर्श करतां येणार नाही काय ?

असा युक्तिवाद करून ग्रामोद्योग समितीच्या लोकांनी कलावंतांना व त्यांच्या धंद्यांना उत्तेजन दिलें पाहिजे.

ग्रामोद्योगाच्या मालाला तो टिकाऊ व अस्सल म्हणून आता एक प्रकारचें महत्त्व येत चाललें आहे. सरकार ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी तो माल सरकारी डेपो उघडून शहरांत विक्रीस ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा वेळीं आपल्या गांवांत शहरांतील लोकांच्या अडचणी व आवडी ओळखून नवे नवे धंदे सुरूं केले तर ग्रामोद्योगांना विशेष चालना मिळून ते भरभराटीस येतील व या भारतवर्षाचें भाग्य पुन्हा ऊर्जितावस्थेस येईल. खेड्याखेड्यांत ग्रामोद्योग समित्या स्थापून ग्रामोद्योग समितीच्या लोकांनी चिकाटीनें प्रयत्न करावयास हवेत.

ग्रामविकास मंडळाने या सर्व समितींच्या कामावर लक्ष ठेवून त्या त्या समित्यांना वेळोवेळीं मार्गदर्शन करीत जावें व सर्वांनी मिळून गांवाची सेवा करून आपला गांव आदर्श करावा. गांव सुखी झाला की आपला देश पर्यायाने सुखी होईल आणि आपण सारे सुखी होऊं.

# नित्योपयोगी वस्तुपाठ

## ( Collection of Useful Formulas )

किंमत रु. २–८–०; म. ऑ. ने रु. ३–२–० पाठ-विल्यास पुस्तक रजिस्टर पोस्टानें पाठवूं व्हीं पी. ने मागविल्यास रु. ३–३–० पडतील.

लेखक–**श्री. भा. स. करमळकर**, एम्. एस्सी.

प्रस्तुत पुस्तकांत



अल्प भांडवलांत फायदेशीर उद्योगधंदे करण्याची माहिती दिलेली आहे. उदा. साबण तयार करण्याचे विविध पाठ, उदबत्त्या, दंतमंजनें, सुगंधी तेलें, स्नो, पावडर, क्रीम, लिपस्टिक, नेलपॉलिश, कुंकु, गंध, पानविड्याचे मसाले, तंबाखू व त्याचे पदार्थ, बूट–पॉलिशचे विविध प्रकार, सर्व प्रकारच्या शाई, टिकाऊ गोंद व खळ, शिवयाची लाख, मेणबत्त्या, आरसे, लांकूड, धातु, कांच, फर्निचरसाठी लुकणें, वार्निश व पॉलिश, केस काळे करण्याचा कल्प, कीडनाशकें व जन्तुनाशकें, शालोपयोगी वस्तु तयार करणें, फटाके, कांही औषधें इ. तयार करण्याचे पाठ दिलेले आहेत.

–**उद्यम प्रकाशन**, धर्मपेठ, नागपूर.

# प्रकरण १० वें

# ग्राम पंचायतीचे कार्य व महत्व

आपल्या देशात खेडेगाव हा पूर्वीच्या काळी स्वयंपूर्ण घटक होता. खेड्यांतील गरजा खेड्यांतच, खेड्यांतील लोकांकडून पुरविल्या जात असत. जातिवार कामाची निवड व व्यवस्था असे. कुंभार मातीची भांडी पुरवीत असे, लोहार लोखंडी काम करी, सुतार शेतीस व घरास लागणारी लाकडी कामें करी, विणकर, कोष्टी कपडे तयार करी, शेतकरी धान्य उपजवे, चांभार कातडी सामान तयार करी, तेली तेल काढीत असे याप्रमाणे पिढी-जात चालत आलेल्या धंद्यानी, ग्रामोद्योग चालत असत व पिढ्यान पिढ्या चालत आलेल्या कारागिरीमुळें भारतांतील कारागिरांचे नावहि अजरामर झाले. खेडुतांच्या सर्व गरजा या धंदेवाईक जाति-संस्थेवर आधारलेल्या कारागिराकडून पुऱ्या केल्या जात. या जाती किंवा जमातींचा गट असें व त्यांतील कर्त्या लोकांची पंचायत त्या त्या जातितील भांडणांचा निर्णय करी व त्यांच्या फायद्यासाठी संघटीत प्रयत्न करी. या पंचायतीचा आदेश त्या त्या जातिच्या लोकांना मानावा लागत असे व असें आदेश न पाळणारास जातिबाह्य राहून अपमानाचें जिणे जगावे लागत असे. जातिबाह्य राहाणे त्याकाळी अत्यंत नामुष्कीचे समजण्यात येई व त्या भीतीनें पंचायतीचे आदेश निमुटपणें मानले जात असत. गावच्या एकंदर हिताविषयी कांही प्रश्न निघाल्यास या निरनिराळ्या जातितील पंचायतीचे प्रमुख एकत्र जमून विचार करीत व गावच्या हिताच्या दृष्टीनें निर्णय घेत. ते प्रत्येक जातितील लोकांना बंधनकारक असत. अर्थात् पर्यायानें गावालाच बंधन कारक ठरत. हीच आदर्श कल्पना आजच्या ग्रामपंचायती स्थापण्यासाठीं मूलभूत मानण्यांत आली आहे. जातिवर आधारलेल्या ग्रामोद्योगाची आजच्या परिस्थितींत वासलात लागली

आहे. याविषयीं मागे विवेचन आलेच आहे. आर्थिक मंदी, दळणवळणाची साधनें, नवीन कायदे, वाढत्या गरजा व यांत्रिक युग यामुळे खेडे आता स्वयंपूर्ण राहिले नाहीं, खेड्यातील कारागीर, यांत्रिक साधनांच्या उत्पादनामुळें डबघाईस आले आहेत. अशा परिस्थितीत खेड्यांतील लोकांनी नव्या लोकशाहीच्या तत्वानुसार मतदान करून, निवडलेल्या खेड्यांतील पंचानी, शिक्षण, आरोग्य, शेती–सुधारणा, लहान सहान गुन्ह्याची चौकशी, दिवाबत्तीची सोय वगैरे गावच्या हिताच्या गोष्टींत लक्ष घालून सरकारी अधिकाऱ्यांना मदत करावी, व गावच्या लोकांना सरकारी अधिकाऱ्यांकडून गावाच्या हितासाठीं सहाय्य मिळवून द्यावे अशी सर्वसाधारण रूपरेषा मान्य करून ग्रामपंचायतीबद्दलचे नियम भारतांतील प्रत्येक राज्यास योग्य वाटतील त्याप्रमाणे तेथील परिस्थितिनुसार कायद्याचे स्वरुप देऊन त्या त्या राज्यांनीं निश्चित केले आहेत.

ग्रामपंचायतीचें कार्य व महत्व समजून घेण्याच्या दृष्टीनें थोडे खोलात शिरुन त्याविषयीचें ज्ञान करून घेणे इष्ट होईल. या पुस्तकांस "ग्रामपंचायत" असे नाव न देता "ग्रामविकास मंडळ" असे नाव देऊन खेडे सुधारण्यासाठीं आवश्यक त्या गोष्टींचा पूर्ण ओहापोह आतापर्यन्त केलाच आहे. त्याच बहुतेक गोष्टी सुसूत्र रुपाने कायद्याच्या चौकटींत बसवून राज्य सरकारांनी त्या विषयीचे कायदे तयार केले आहेत. आतापर्यंत या पुस्तकांत वर्णन केलेले "ग्राम विकास मंडळ" खेडुतांनी स्वयंस्फूर्तिने गावच्या हिताची कळकळ मनांत बाळगून स्थापन करावयाचे आहे. त्यासाठी गावांतील जनसंख्या कितीहि लहान असली तरी चालेल फक्त गाव सुधारण्याची कळकळ खेडुतामध्ये पाहिजे. ग्रामपंचायतीचें आता नियम तयार झाले आहेत व त्यामुळें ते पाळण्याचें बंधनहि आवश्यक आहे. सरकारी यंत्रणेतील योजना खेडेगावापर्यंत नेऊन पोचविण्याची ग्रामपंचायत हे एक साधन झाले आहे. ग्रामसेवक नव्या कायद्याप्रमाणें या ग्रामपंचायतीचा

पदसिद्ध सेक्रेटरी निश्चित करण्यात आला आहे. या ग्रामसेवकानें गावाच्या हिताच्या गोष्टी करतांना कसे वागावे, तपशिलात शिरून काम करतांना अडचणींना कसें तोंड द्यावें, वगैरे गोष्टी विस्तारानें आतापर्यन्त या पुस्तकांत निवेदन केल्या आहेत. आता ग्रामपंचायतीची घटना, कार्यपद्धति व महत्व याविषयी थोडी माहिती मिळवू या. भारतातील प्रत्येक खेड्यांत आज ना उद्या ग्रामपंचायती येणारच आहेत. भारतातील प्रत्येक राज्यात वरील सर्वसाधारण तत्वें मान्य करून तपशिलात त्या त्या राज्यांतील परिस्थितिनुरूप थोडे भिन्न भिन्न कायदे करण्यात आले आहेत, म्हणून ग्रामपंचायतीच्या कायद्यांचा शब्दशः कीस न पाडता साधारणतः ग्रामपंचायतीच्या कार्याची ओळख करुन घेऊ. "मध्यप्रान्त आणि विदर्भ पंचायतीचे नियम" या सरकारी पुस्तकांत ग्रामपंचायतीच्या नियमांची संपूर्ण माहिती आहे.

**ग्रामपंचायतीची स्थापना**——१००० पेक्षा कमी वस्ती नसलेल्या खेड्यांत ग्रामपंचायत स्थापन केलीच पाहिजे, याशिवाय प्रांतिक सरकारास योग्य वाटेल त्या खेड्यांत किंवा खेड्यांच्या गटांत ग्रामपंचायत स्थापन करण्याचा हक्क प्रांतिक सरकारला आहे. ग्रामपंचायत खेड्यांच्या गटाचीही स्थापना करता येते.

**घटना**——त्याच गांवातील मतदारांनी निवडून दिलेले ५ ते १५ सभासद ग्रामपंचायतीचें काम पहातात. याच सभासदांना "पंच" असें म्हणतात. गावाचे वार्ड पाडून त्या त्या वार्डाने निवडावयाची पंचाची संख्या प्रांतिक सरकार ठरवून देते. मतदाराचे हक्क असणाऱ्या मतदारांनी पंचातून किंवा गावांतील अन्य मतदारांतून सरपंच निवडून घ्यावयाचा असतो. हा सरपंच, ग्रामपंचायतीच्या सदस्यातून (पंच) किंवा मतदानाचें अधिकार असलेल्या मतदारातून प्रति-सरपंच नियुक्त करतो. सरपंचाने नेमून दिलेली कामें त्याला करावी लागतात. नवीन नियमाप्रमाणें सरकारनें नेमून दिलेला ग्रामसहाय्यक हा त्या त्या विभागातील ग्राम पंचायतींचा पदसिद्ध चिटणीस राहील

व त्यास चिटणिसाची कामें करावी लागतील. ग्रामपंचायतीसाठी लागणारा इतर नोकर वर्ग नेमण्याचा ग्रामपंचायतीस अधिकार राहील, पण त्यासाठी नेमणूक, कर्तव्ये, मोबदला, सुट्टी, शिस्त वगैरे बद्दलचे सरकारनें केलेलें नियम या नोकर वर्गास पाळावे लागतील, आणि या नोकर वर्गाचा खर्च मात्र एकंदर उत्पन्नाच्या $\frac{1}{8}$ पेक्षा अधिक होता कामा नये. अशा प्रकारे सरपंच, प्रतिसरपंच, सरकार नियुक्त ग्रामसहाय्यकाच्या जागेवरील चिटणीस व इतर ग्रामपंचायतीनें नेमलेला नोकरवर्ग ग्रामपंचायतीची सर्व कामे नीट चालण्यास सहाय्य करतील. पंच, सरपंच व प्रतिसरपंच हे पाच वर्षे अधिकार पदावर राहातील व त्यानंतर पुन्हा निवडणुकी होतील. सरपंच आणि प्रतिसरपंच यासह वेळोवेळीं ग्रामपंचायतीत असलेल्या दोन तृतीयांश पंचाच्या बहुमतानें सरपंचावर अविश्वासाचा ठराव पास झाल्यास त्याला आपले पद राजिनामा देऊन रिकामे करावे लागेल, त्याचप्रमाणे सरपंच व प्रतिसरपंच यासह वेळोवेळी ग्रामपंचायतीत हजर असलेल्या $\frac{2}{3}$ पंचाच्या बहुमतानें ठराव पास केल्यास प्रतिसरपंचास त्याच्या जागेवरून काढून टाकण्याचा अधिकार आहे.

## मतदाराची पात्रता व मतदान

ग्रामपंचायतीच्या हद्दीत मतदानाच्या आदल्या कॅलेंडरी वर्षामध्ये कमीत कमी १८० दिवस रहाणाऱ्या २१ वर्षें वरील वयाच्या व्यक्तिस मतदानाचा हक्क राहील. अर्थात् तो इसम वेडा नसावा, सरकारी नोकरीतून गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ झालेला नसावा, राजकीय गुन्ह्याव्यतिरिक्त सजा पावलेला नसावा, महारोगासारख्या कोणत्याहि सांसर्गिक प्रकारानें पिडीत नसावा वगैरें अन्य गोष्टी विचारांत घेतल्या जातीलच. वरील प्रमाणे लायक असलेल्या मतदारास त्याचें वय २५ च्या आत नसेल तर पंचाच्या किंवा सरपंचाच्या निवडणूकीस उभे राहण्याचा हक्क आहे. नवीन नियमाप्रमाणे वऱ्हाडात राजस्व पाटलाचे वेळोवेळीं पद धारण करणारा प्रत्येक

इसम हा त्या गावच्या ग्रामपंचायतीच्या कक्षेत पदसिद्ध पंच म्हणून राहतो. कोणत्याहि इसमानें एकाहून अधिक ग्रामपंचायतीवर अधिकाराची जागा घेता कामा नये असा नियम आहे. गावातील मतदारांना फक्त आपल्या वार्डात उभे रहाणाऱ्या उमेदवारासच मत देण्याचा हक्क आहे. जर एखादा मतदार अधिक वार्डात आपली मते देईल तर त्याची सर्व मतें नियमबाह्य ठरविण्यांत येतील. नियमाप्रमाणे पात्र असलेल्या उमेदवारास 'पंचा' च्या निवडणुकी-करिता कोठल्याहि वार्डातून उभे रहाता येते.

**उपसमित्या नेमणे**--ग्रामपंचायतीच्या कायद्यात पंचायतीतील पंचांच्या ५ हून अधिक सभासद नसलेल्या उपसमित्या नेमण्याची तरतूद आहे. ही विशेष महत्वाची गोष्ट समजून या पुस्तकांत सुचविलेल्या समित्या ग्रामपंचायतीतील लोकांनी नेमल्या तर सर्व पंचाना त्याच्या योग्यतेप्रमाणें काम मिळून गावाच्या कामांत मदत करता येईल व सर्वांना सेवा करण्याची संधि मिळेल. या उपसमित्यांना ग्रामपंचायतीने नेमून दिलेलें अधिकार वापरता येतील व उपसमित्या-वर पंचायतीचें सर्वसाधारण नियंत्रण राहील.

## ग्रामपंचायतीची कर्तव्यें

या कामाचे दोन भाग पाडता येतील. काही कामें आवश्यक व दुसरी कामें ऐच्छिक स्वरुपाची आहेत.

### आवश्यक कामें

(१) गावांतील रस्ते झाडण्यापासूनची गावाची स्वच्छता व साफसफाई (याबद्दलचे विवेचन पृष्ठ १३, व ६४–६६ वर पहा).

(२) वैद्यकीय मदत व प्रथमोपचार (आरोग्य समिति पृष्ठ ६७ वर पहा).

(३) पाण्याचा पुरवठा व स्वच्छता (पृष्ठ ६२–६३ पहा).

(४) जन्म, मृत्यु, विवाह याची नोंद ठेवणे व बालविवाहाची खबर सरकारांत देणे.

(५) सांसर्गिक रोगावर प्रतिबंधक इलाज करणे (पृष्ठ ५७ पहा).
(६) गावातील रस्ते बांधणे व त्यांची डागडुजी करणे (पृष्ठ ९०–९३ पहा).
(७) पिकाबद्दल प्रयोग करणे (शेती सु. स. ची. कामें पृष्ठ ३१ पहा).
(८) रस्ते व सार्वजनिक स्थानें यावरील अतिक्रमण सरकारांत कळविणे.

या सर्व गोष्टींचे विवेचन व तपशील प्रस्तुत पुस्तकांत विस्तारानें आलेच आहे. पंचाना त्यापासून मार्गदर्शन होईल असा विश्वास वाटतो.

याशिवाय पंचानी बहुमतानी ठरविल्यास किंवा प्रांतिक सरकारनें आदेश दिल्यास खालील गोष्टीविषयी नियंत्रण करण्याचा, कारभार चालविण्याचा व जबाबदारी स्विकारण्याचा ग्रामपंचायतीस अधिकार आहे. या गोष्टींत लक्ष घालून पंचायतीनी त्या विषयींची जबाबदारी हळूहळू स्विकारावी. त्या गोष्टी अशा––

(१) शेतकी सुधारणा (पान ३१ ते ५० पहा).
(२) सहकारी शेतीस उत्तेजन.
(३) गुरांची जातिवंत निपज, व संगोपन (पान ५१ ते ५३ पहा).
(४) धान्याची कोठारे स्थापणे.
(५) ग्रंथालये व वाचनालये उघडणे (पान ८४ पहा).
(६) पतपेढीची स्थापन करणे (पान १०३ पहा).
(७) क्रिडांगणे व सार्वजनिक बागा निर्माण करणे (पान ९७ पहा).
(८) घरगती धंद्याची वाढ करणे (पान १०९ पहा).
(९) कोंडवाडे व बाजार यावर नियंत्रण.

(१०) शिक्षणाचा प्रसार करणे (पान ७८–८२ पहा).
(११) शेतकी व औद्योगिक प्रदर्शन भरविणे (पान ११३ पहा).
(१२) गुरास व माणसास लस टोचून घेणे (पान ५३ व ६७ पहा).
(१३) सूतिकागृहे बांधणे व चालविणे (पान ९९ पहा).
(१४) रस्त्यावर उजेडाची सोय (पान १६ पहा).
(१५) बाजार स्थापणे व चालविणे.
(१६) नैसर्गिक आपत्तीत गावकऱ्यांना मदत करणे.

वगैरे कामें ऐच्छिक असून ती पंचाच्या बहुमताने हाती घेऊन पार पाडावयाची आहेत. ही कामे हाती घेतांना या पुस्तकातील मार्गदर्शन उपयोगी पडेल. प्रथम जी सहज करता येतील, आर्थिक दृष्टचा परवडतील, तीच कामें हाती घेणें चांगले. व जे हाती घ्यावयाचे ते तडीस निश्चयानें न्यावयाचे असा संकल्प करूनच हाती काम घेतलेले बरे. वरील ऐच्छिक कामापैकी कांहीं कामें जनपद करीत असेल तर त्या कामासाठी जनपदची परवानगी घ्यावयास हवी. ग्रामपंचायतीनें कोणतेहि काम करण्यापूर्वी ते सभेंत मंजूर झाले पाहिजे. सभा वारंवार बोलावता येतात पण सभा महिन्यातून एकदा तरी झालीच पाहिजे व महिन्यात झालेला खर्च तपासून पाहून त्यास सभेनें बहुमतानें मंजुरी दिली पाहिजे. सर्वसाधारण सभेचे निमंत्रण ४ दिवस आधी व खास सभेचे निमंत्रण २४ तास आधी, जागा, वेळ, व विषय याचेसह खुलासेवार प्रत्येक पंचास पोहोचले पाहिजे. सरपंच व प्रतिसरपंच धरून ⅓ पंच सभेस हजर असतील तीच सभा कायदेशीर ठरेल. सभेंत पास झालेलें ठराव पुस्तकांत लिहून त्यावर सरपंच व प्रतिसरपंच यांनी सह्या केल्या पाहिजेत व पंचाची हजेरी हजेरी पुस्तकांत नमूद करून ठेवली पाहिजे.

## ग्रामपंचायतीचें उत्पन्न

ग्रामपंचायत गावांत सुरु होते तेव्हा प्रथम सरकार त्या ग्रामपंचायतीस २०० रुपये मदत म्हणून देते. या मदतीतून ग्रामपंचायत

चालू करण्यास सतरंजी, आलमारी, डेस्क, रजिस्टरे, पुस्तके, स्टेशनरी वगैरे घेता येईल व ग्रामपंचायतीचें काम सुरु करता येईल. ग्रामपंचायतीचें पुढील कार्यासाठी ग्रामपंचायत गावावर कर लादते व त्यातून ग्रामपंचायतीचा खर्च चालतो. हे कर सक्तिचे व ऐच्छिक असतात.

**सक्तिचे कर (१) घरावरील कर**--ग्रामपंचायतीच्या हद्दीतील शेतीव्यतिरिक्त पडीत जागा व घरे याची किमत ठरवून त्यावर ग्रामपंचायत कर वसूल करते. ३०० रु. किमतीच्या पुढे हा कर सुरू होतो ३०० ते ५०० किमतीच्या घरावर वार्षिक कर २ रु. ;५०० ते १००० रु. किमतीवर ४ रु; १००१ ते २००० किमतीवर ७ रु., २००१ ते ५००० रु. किमतीवर १५ रु.; ५००१ ते १०००० रु. किमतीवर ३० रु.; १०००१ ते १५००० रु. किमतीवर ६० रु. व १५००१ चे वरील किमतीवर ८० रु. असे कराचे प्रमाण असते. सरकारी इमारतीवर हा कर आकारता येत नाहीं. हे कर ३ महिन्यांच्या हप्त्यांनी घेता येतील.

**(२) वायद्यावरील कर**---ग्रामपंचायतीच्या हद्दीतील शेतकऱ्यास त्यास भराव्या लागणाऱ्या वायद्यावर प्रत्येक रुपयास अर्धा आणा प्रमाणे कर द्यावा लागतो. व हा कर गावचा पाटील किंवा मुकदम ग्रामपंचायतीस वसूल करून देतो.

**(३) परवाना कर**--ग्रामपंचायत हद्दीत दलाली करणारावर कर आकारता येतो. खेड्यांत साधारण गुरे, कापूस, धान्य यांचे दलाल असतात, त्यांना ४ रु. वार्षिक कर आकारता येतो.

**(४) धंदा कर**--व्यापार करणारावर हा कर आकारता येतो. वार्षिक उत्पन्न १५० रु. पुढे असेल, त्यांच्या वरच हा कर आकारला जातो. १००० पेक्षा वार्षिक उत्पन्न कमी असेल तर त्यांना वार्षिक २ रु. कर व १००० पेक्षा जास्त असेल तर वार्षिक ५ रु. कर द्यावा लागतो. मोटार ड्रायव्हर, टांगेवाला व गाडीवाला यांना २ रु. कर, सुतार लोहार, सोनार यांना १ रु. व इतराना ८ आणे

वार्षिक कर. या सर्व करावर ग्रा. पं. तीचें काम चालत नसेल तर ग्रा. पं. गाव सुधारणेची कामें हाती घ्यावयास जनपदची मंजुरी घेऊन आणखी ऐच्छिक कर आकारूं शकते. या शिवाय शेतसाऱ्यावरील शे. ५ टक्के मदत, जिल्हाधिशाकडे जनपदमार्फत अर्ज करून ग्रा. पंचायतीस मिळविता येईल. सहकारी दुकाने, धान्य भंडार, कंपोस्ट खताचा लिलाव, मच्छीपालन वगैरें धंदे करून ग्रा. पंचायतीचे उत्पन्न वाढविता येईल. ग्रा. पंचायतीच्या हद्दीत बाजार भरवून त्यावर कर आकारणी करता येईल, गावातील लग्न, मुंज वगैरे समारंभाप्रित्यर्थ देणग्या गावातील लोकाकडून ग्रामपंचायतीस स्विकारता येतील. ग्रा. पंचायतीकडे जंगले व तलाव यांचा कारभार देण्याचाहि पुढें सरकारचा विचार आहे. हें कर आकारतांना पंचानी सचोटी दाखवून, समतोलपणा राखला पाहिजे. वैयक्तिक हेवे दाव्यांनी या कर आकारणीत अन्याय करता कामा नये. व सर्वापेक्षा गावाचे हित श्रेष्ठ मानून गावाच्या हितासाठी झटले पाहिजे व संघटीत होऊन गावाचा कारभार चालविला पाहिजे.

कर वसुली करताना लोकांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजेत व कराच्या मोबदल्यांत शक्य तर काम करून घेण्याची सवलत अंगिकारली पाहिजे. अशा वेळी कर मिळाल्याची पावती देऊन, काम केल्याच्या मोबदल्याबद्दल कराइतकी रक्कम मिळाली अशी पावती घेतली की काम भागण्यासारखे आहे. प्रत्येक वेळी कायद्याचा कीस न पाडतां समजुतदारपणाने काम केले तर ग्रामपंचायत व कार्यकर्ते पंच अधिक लोकप्रिय होतील. कराच्या रूपानें जमविलेला निधि सार्वजनिक असल्यामुळें तो जपून वापरला पाहिजे व गाव सुधारण्याकडेच खर्च केला पाहिजे. २५ रु. पेक्षा किंवा एकूण रकमेच्या $\frac{१}{२}$ पेक्षा कमी रक्कम सरपंचाजवळ ठेवता येईल. बाकीची रक्कम पोस्टांत किंवा बँकेंत ठेवून ग्रामपंचायतीनें ठराव करून वेळोवेळी काढण्यास सरपंचास परवानगी दिली पाहिजे. पोस्ट किंवा

बँक जवळ नसेल तर गावांतील प्रामाणिक व सधन माणसास खजांची नेमून पोस्ट ऑफीसप्रमाणें पास बुक ठेवून त्याच्या जवळ ठेवलेली व त्याजवळून घेतलेली रक्कम त्यात सरपंचानें वेळोवेळी नमूद करून घेतली पाहिजे. जमाखर्च नीट ठेवून प्रत्येक महिन्यास तो सभेपुढें ठेवून त्या प्रत्येक महिन्यास मंजुरी घेतली पाहिजे, व शिलकेची तपशील सभेस दाखविला पाहिजे.

ग्रामपंचायती आता सर्वत्र होणार असल्यामुळें त्यांच्या उन्नतिसाठी मध्यप्रदेश प्रांतिक सरकारनें "समाज सेवा विभाग" नावाचें खाते उघडले आहे त्या खात्यात नेमलेलें 'जिल्हा सेवाधिकारी' व समाजसेवा निरिक्षक हे अधिकारी ग्रामपंचायतींचा हिशेब तपासून योग्य ते मार्गदर्शन करतील. ग्राम पंचायतीच्या कार्याचें निरिक्षण जनपद अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्य व उपकार्यपालनाधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदार मध्यप्रदेशांत करू शकतात.

## ग्रामपंचायती आदर्श बनवा

याप्रमाणें मध्यप्रदेशातील ग्रामपंचायतींचे कार्याविषयी येथे थोडे विवेचन केले आहे. गाव सुधारण्याची खरी कळकळ मनांत बाळगून वैयक्तिक हेवेदावे मनांत न ठेवता, सचोटीनें व प्रामाणिकपणानें कार्य करणारे कार्यकर्ते गावाच्या उन्नतिसाठीं पुढे आले तर ग्रामपंचायत एक आदर्श संस्था ठरेल यात संशय नाही. गावातील लोकानी एकमतानें पंच नेमून दिले तर निवडणुकीतील कटुता नाहीशी होऊन निवडणुकीचा त्रास व खर्च वाचून एकमतानें निवडणूक झाल्याची घोषणा करता येईल, व गावास ती गोष्ट भूषणावह ठरेल तसा आदर्श अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्याच्या ज्या नुकत्याच निवडणुकी झाल्या त्यातील पुष्कळ गावांनी घालून दिला आहे. निवडणुकी झाल्या तरी त्यातील स्पर्धा निवडणुकीनंतर लगेच थांबावयास पाहिजे. निवडणुकीत प्रतिस्पर्धी विजयी झाल्यावर त्याचे लगेच अभिनंदन करून त्याच्या कामांत मदत करण्याचे त्याला

अभिवचन देण्याची खेळाडू वृत्ति आपण दाखविण्यास आता शिकले पाहिजे. आपला देश आता स्वतंत्र झाला आहे. आपला देश असंख्य खेड्यांनी बनला. ही खेडी सुखी झाली तर देश सुखी होईल व भारतवर्ष पुन्हा सुखसमृद्धिनी सुखावेल. शेवटी तेच इच्छूं या–

सर्वेऽपि सुखिनः संतु
सर्वे संतु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ।।

---


# दुसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली !

## बागाईत भाग १ ला

# भाजीपाल्यांची लागवड

किमत रु. २–०–०; म. ऑ. ने रु. २–९–० पाठविल्यास पुस्तक रजिस्टर पोस्टाने पाठवूं. व्ही. पी. ने मागविल्यास रु. २–१०–० पडतील.

**प्रस्तुत पुस्तकांत**

टोमॅटो, वांगीं, फुलकोबी, नोलकोल, भेंडी, बटाटे, घुईंयां, कांदा, मुळे, गाजर, चुकंदर वगैरे कंद–फळ–भाज्या व सर्व प्रकारच्या पालेभाज्यांच्या लागवडीची माहिती पाहा.

भाज्यांच्या लागवडीसाठी जमिनीची निवड, मळ्याची रचना, खतें, रोपें तयार करणें, ओलीताची व्यवस्था, भाज्यांचे फेरपालट कसे करावें इत्यादि माहिती आली आहे. प्रत्येक शेती–बागाईतदाराला उपयुक्त असें हें पुस्तक आहे. आपली प्रत तावडतोब मागवा. **– उद्यम प्रकाशन**, धर्मपेठ, नागपूर.

...२८९३०
का. वा.
१९७२
ता. दि. ३।१३।७५
... शाळा
...

# ग्रामपंचायतीची ऐच्छिक कामें

**शेती विषयक**--सहकारी शेती, शेती सुधारणा, सार्वजनिक जमिनीची व्यवस्था, शेतकी प्रदर्शन.

**आरोग्य विषयक**--अनाथ आजारी यांना मदत करणे,अस्वच्छता नष्ट करणे, माणसास व गुरास प्रतिबंधक लस टोचणे, सूतिकागृहे स्थापन करणे, सार्वजनिक संडासाची सोय, रस्त्यावर उजेडाची सोय.

**शिक्षण विषयक**--ग्रंथालये व वाचनालये उघडणे, खेळण्याची क्रिडांगणे व सार्वजनिक बागा, शिक्षणाचा प्रसार करणे.

**बांधकाम विषयक**--धान्याच्या वखारी बांधणे, वाचनालये बांधणे, सावलीसाठी झाडे लावणे, बाजार, सराया, धर्मशाळा, डाकबंगले, गावाबाहेरील रस्ते बांधणे वगैरे, सूतिकागृहे, सार्वजनिक संडास.

**यासंबंधीची माहिती त्या त्या अनुषंगानें पुस्तकांत दिलेली आहे.**

# गावातील प्रगती दाखविणारा तक्ता.

खालील विषयावर दर महिन्याला काय काम केले त्याची दर महिन्यास नोंद ठेवावीं व गावाच्या विकासाचा आराखडा तयार करावा. तो पाहून गावकऱ्यांना आनंद होईलच पण इतर गावकऱ्यांना तो पाहून स्वकाम करण्यास हुरप येईल व उत्तेजन मिळेल.

१ सोकपिट
२. भिंतीवरील म्हणी
३. मूत्रीगृहे
४. संडास
५. कचरापेट्या
६. घरावरील पाट्या
७. खताचे खड्डे
८. विहिरी नव्या
९. ,, दुरुस्ती
१०. सार्वजनिक विहिरी
११ कंदील
१२ वाचनालय पुस्तके
१३. औषधालय
१४. प्रथमोपचार पशुना
१५. ,, मनुष्ये
१६. गुरांना टीका
१७. मनुष्याना टीका
१८. विहिरींची शुद्धि
१९. सांडांची गावात सोय
२०. गायी धना गेल्या
२१. मुर्गीपालन केंद्र
२२. सार्वजनिक मंदीर
२३. रेडिओची सोय
२४. रेडिओ उपस्थिति
२५. सहकारी दुकान
२६. ,, विक्री
२७. धान्य भांडार
२८. रस्ते नवे : फूट
२९. ,, दुरुस्ती : फूट
३०. स्मशान भूमि
३१. ढोर फोडी
३२. व्याख्याने
३३. वार्ताफलक
३४. करमणूक, किर्तने, भजने, नाटके व इतर.
३५. थोरांच्या भेटी व मार्गदर्शन
३६. शेतीचे सरासरी एकरी उत्पन्न

३७. शाळेतील मुले
३८. सरासरी उपस्थिति
३९. गावातील साक्षर
४०. „ निरक्षर
४१. सूतिकागृह
४२. सूतिकांची संख्या
४३. घरे बांधण्यास सल्ला दिला
४४. कडबा कापण्याचे यंत्र किती लोक वापरतात ?
४५. शेती सु. स. ने निवडलेले बी बियाणे किती लोकानी वापरले ?
४६. जंतुनाशके बियाना लावून किती लोकानी पेरणी केली ?
४७. प्रभात फेऱ्या किती काढल्या ?
४८. सार्वजनिक समारंभ व प्रचार
४९. पशुना पाण्याची सोय. हौद किती ?
५०. ग्रामसफाई किती वेळा केली ?
५१. ग्रामोद्योग किती ? कोणते ?
५२. नवे किती सुरू केले ? कोणते ?
५३. अतिथी गृह आहे काय ?
५४. ग्रामविकास कचेरी आहे काय ?

अनुक्रम २८५३० विभाग वा.वा. क्रमांक १९०२ नों. दि. ३/१३/८०
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
वा. क्र. ५३३६ नों.
वि. वा. वा. क्र.
IRBK-0105336
IRBK-0105336

उपहारगृह - व्यवसायेच्छूंना मार्गदर्शक
पुस्तक प्रसिद्ध झालें

# उपहारगृहांचा धंदा

लेखक—श्री. एन्. जी. वीरकर.

किंमत रु. २–०–०. म ऑ. ने रु. २–१०–० पाठविल्यास पुस्तक रजिस्टर्ड पोष्टानें पाठवूं. व्ही. पी. ने मागविल्यास रु. २–११–० पडतील.

— प्रस्तुत पुस्तकांत —

धंद्यांत प्रवेश करण्यापूर्वीच्या तयारीपासून तो उपहारगृहांकरिता आवश्यक भांडवल, उपहारगृहां-संबंधीचे कायदे, शरीरपोषक अन्न, विविध खाद्य पदार्थ तयार करण्याची माहिती, आरोग्यदक्षता, उपहारगृहांचें बहिरंग व अंतरंग, हिशेब–व्यवस्था, उपहारगृहांच्या यशासाठी आवश्यक मनोवृत्ति, व्यवसायांतील यशाचें मर्म इ. माहिती सचित्र व अत्यंत सोप्या भाषेंत दिलेली आहे. लहान–मोठ्या शहरांतील हॉटेल–चालक व कामगारवर्गासाठी खास लिहिलेलें हें पुस्तक अवश्य वाचा.

—उद्यम प्रकाशन, धर्मपेठ, नागपूर १.